नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १६ * अंक ३१२ * * भंडारा * शुक्रवार, दिनांक ९ मे २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## ७ राज्यांमधील २७ विमानतळे ९ मेपर्यंत बंद

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ८ :**
पाकिस्तानवरील हवाई हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, केंद्राने ९ मे पर्यंत ७ राज्यांमधील २७ विमानतळ बंद केले आहेत. ही राज्ये जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आहेत.

प्रमुख विमानतळांमध्ये श्रीनगर, जम्मू, लेह, चंदीगड, जोधपूर, राजकोट, धर्मशाला, अमृतसर, भुज आणि जामनगर यांचा समावेश आहे. हे विमानतळ पाकिस्तान सीमेला लागून आहेत. मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर विमानतळ आणि उत्तर प्रदेशातील हिंडन विमानतळावरील कामकाज देखील बंद आहे.

अग्राग्रलेख


## खरीखरी..

## पाकिस्तान नव्हे नर्कीस्तान

काल भारताने पाकिस्तानातील नऊ आतंकी अड्ड्यांवर हल्ला करून आतंक वाद्यांचे कंबरडे मोडण्याचा भीम पराक्रम केला. ते झाल्यावर पाकिस्तानकडून बदला घेण्याची भाषा करण्यात आली. त्याप्रमाणे आज अगदी पहाटे किंवा काल रात्री अगदी तारखेनुसार बोलायचे. तर सात आणि आठ मे च्या मध्यरात्रीत पाकिस्तानच्या आसिफ मुनीर याच्या नादान फौजेने बेभानपणा करून भारताच्या पंधरा शहरांजवळ असलेल्या सैन्याच्या तळांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये हल्ल्यापेक्षा कल्लाच जास्त होता. कारण पाकिस्तानने ड्रोन आणि मिसाईल द्वारे अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथाला, जालंदर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदिगड, नाल, फलोदी, उत्तरलाई आणि भूज या एकूण १५ शहरांवर केलेल्या हल्ल्याला भारताच्या एस- ४०० म्हणजेच सुदर्शन चक्राने पाकिस्तानच्या सर्व ड्रोनांना आणि मिसाइलांना हवेतच नष्ट करून टाकले. पाकिस्तान हा देश जन्मापासूनच खोटारडा आहे. आता इतके सगळे झाल्यावरही पाकड्यांचे खोट्या खोट्या पुड्या सोडणे सुरू होते. आपण भारताचे राफेल विमान पाडले असा दावा पाकडयांनी केला. भारताने आपले ऑपरेशन सिंदूर राबवताना जास्त सावधगिरीने तणाव वाढू नये. म्हणून पाकिस्तानची सैन्य स्थळे आणि सामान्य जनतेला कुठे क्षती पोहोचवली नव्हती. मात्र पाकिस्तानला विरत्वाचे स्फुरण चढल्यावर त्यांनी काल जो आतातायीपणा केला. त्याला भारताने असे काही प्रत्युत्तर दिले की, आता संपूर्ण पाकिस्तानात हाहाकार माजलेला आहे. लोक सैरावैरा पळत आहेत. जनतेचे रक्षण करण्याची जबाबदारी पाकिस्तानच्या ज्या भुरट्या सेनेची आहे. ती सेना सध्या शेण खात फिरत आहे. खरे तर पाकिस्तान जवळ चीनने दिलेली हवाई संरक्षक प्रणाली होती. पण चीनचा माल कसा असतो. हे तुम्ही आम्हीच नाही, तर आता साऱ्या जगाने जाणलेले आहे. भारताजवळ रशियाचे एस-४०० म्हणजे सुदर्शन चक्र होते. पण पाकिस्तानच्या राशीत सारेच ग्रह वक्र होते. त्या नंतर भारताने पाकिस्तानवर जे ड्रोन्स डागले. त्यात लाहोरच्या विमानतळाचे पार बारा वाजून गेलेले आहेत. पाकिस्तानच्या सेनेचे मुख्यालय रावळपिंडी येथे आहे. त्या रावळपिंडीतील क्रिकेटचे स्टेडियम भारताने पार उध्वस्त करून टाकलेले आहे. तिथेही विमानतळाची पार माती करून टाकलेली आहे. पाकडयांना आता पाकिस्तानातील जनताच वाकुल्या दाखवीत आहे. काही जन्मताच फेकूगिरी करण्यात पारंगत असतात. पाकिस्तान हे राष्ट्रही जन्मापासूनच या विषयात विशेष पारंगत आहे. पाठीवर व पोटावर कचाकचा लाथा खाऊन खाली पडल्यावर देखील, अभी मारा तो मारा, अब मार भला साले असे म्हणत एखादा दारुडा जसा हळूच पलायन करतो. अगदी तशीच पाकिस्तानी सेनेची अवस्था झालेली आहे. भारताने आता घोषितच करून टाकलेले आहे की, आता पाकिस्तानला क्षमा नाही. आमचे ऑपरेशन सिंदूर आता सुरूच राहणार आहे. पाकिस्तान काही दिवसांपूर्वी युद्धज्वरग्रस्त होता. आता पोटदुखीने त्रस्त आहे. पाकिस्तानचे राज्यकर्ते म्हणतात की पाकिस्तानात आतंकवादी नाहीत. मग आज मसूद अझरचा भाऊ रौफ अझर आणि इतर अनेक आतंकवाद्यांचा जनाजा ज्यावेळी निघाला. तेव्हा सर्व पाकिस्तानचे फौजी कसे काय हजर होते. भारताचे जाऊ द्या, चक्क अमेरिकेने ज्यांना आतंकवादी म्हणून घोषित केलेले आहे. अशा आतंकवाद्यांच्या जनाजाच्या मागे पाकिस्तानी सैन्य दलातील अनेक बडे बडे अधिकारी उभे होते. त्यातील एका लष्करी कमांडरचे नाव अब्दुल्ला रौफ होते. विशेष म्हणजे सर्वांनाच अमेरिकेने दहशतवादी म्हणून घोषित केलेले होते. शहाबाज शरीफ आपले भाऊ नवाज शरीफ यांच्याप्रमाणे विचार करणारे दिसत नाहीत. कारण त्याच्या उरावर अनेक आतंकवादी आणि पाकिस्तानच्या सेनेचा प्रमुख बसलेला आहे. त्याचे ऐकले नाही तर काय होईल, हे सांगता यायचे नाही. हे त्याला पक्के ठाऊक आहे. आता पाकिस्तानने काल रात्री आगळीक करून भारताला जी मोकळीक दिलेली आहे. त्याचा पूर्ण उपयोग करण्यासाठी भारत स्वतंत्र आहे. पाकिस्तानने काल तावातावात आपला पराक्रम दाखवण्याच्या प्रयत्न केला. तो त्यांचा बायलेपणा निघाला. आता मुनीर-शहाबाज किती दिवसात सत्ता सोडतात. हाच काय तो प्रश्न आहे. बाकी भारताने त्यांचे सर्व कपडे उतरवून टाकलेले आहेत. अशा या अवलक्षणी नंग्यांना आता जन्नत मुळीच मिळणार नाही. सध्या त्यांचे जहन्नूमची वाट पाहणे सुरू आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

ऑपरेशन सिंदूर



# लाहोर, कराची, रावळपिंडीसह ९ ठिकाणी ड्रोन हल्ले

### भारताने ३ हवाई संरक्षण प्रणाली नष्ट केल्या ▪ अमेरिकन नागरिकांना लाहोर सोडण्याचे फर्मान

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ८ :**
ऑपरेशन सिंदूरच्या दुसऱ्या दिवशी, भारताने पाकिस्तानविरुद्ध मोठी कारवाई केली आहे. गुरुवारी सकाळी भारताने केलेल्या हल्ल्यात, पाकिस्तानच्या तीन प्रमुख शहरांमध्ये, लाहोर, कराची आणि रावळपिंडीमध्ये स्थापित केलेली HQ-९ हवाई संरक्षण प्रणाली नष्ट झाली. वृत्तसंस्था एएनआयने ही माहिती दिली आहे. या हल्ल्यासाठी भारताने इस्त्रायली हार्पी ड्रोनचा वापर केला.

पाकिस्तानी लष्कराचे प्रवक्ते लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी गुरुवारी दुपारी सांगितले की, भारताने पाकिस्तानच्या ९ शहरांमध्ये ड्रोन हल्ले केले. पाकिस्तानी सैन्याने किमान ५० ड्रोन पाडण्यात यश मिळवले. शरीफ यांनी कबूल केले की एका ड्रोनने नुकसान केले. लाहोरमध्ये ४ पाकिस्तानी लष्करी जवान जखमी झाले आणि मियांपूरमध्ये २ जणांचा मृत्यू झाला.

दरम्यान, अमेरिकेने लाहोरमध्ये राहणाऱ्या आपल्या नागरिकांना आणि वाणिज्य दूतावासातील कर्मचाऱ्यांना सुरक्षित ठिकाणी जाण्यास सांगितले आहे.

भारतासोबत वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानच्या पंजाब सरकारने आणीबाणी जाहीर केली आहे. राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे रविवारपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले. लोकांना त्यांच्यासोबत एक आपत्कालीन किट घेऊन जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे, ज्यामध्ये प्रथमोपचाराच्या वस्तू, बाटलीबंद पाणी, नाशवंत अन्न, टॉर्च आणि पोर्टेबल चार्जर असावे.

दुसरीकडे, पाकिस्तानचे माहिती मंत्री अताउल्लाह तरार यांनी दावा केला आहे की नियंत्रण रेषेवर ४० ते ५० भारतीय सैनिक मारले गेले. तरार यांनी याला एक मोठी उपलब्धी म्हटले. ते म्हणाले की, पाकिस्तानला स्वसंरक्षणाच्या अधिकाराखाली प्रत्युत्तर देण्याचा अधिकार आहे. तथापि, भारतीय सैनिक मारले गेल्याचा दावा खोटा असल्याचे निष्पन्न झाले.

पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी दावा केला होता की त्यांच्या सैन्याने ५ राफेल विमाने पाडली आहेत. या विधानामुळे त्यांना पाकिस्तानच्या संसदेतच टीकेचा सामना करावा लागत आहे. एका खासदाराने सांगितले की जेव्हा सीएनएन न्यूजने ख्वाजा आसिफ यांनी राफेल पाडल्याचा पुरावा मागितला तेव्हा त्यांनी सांगितले की पुरावा सोशल मीडियावर आहे. ही खेदाची बाब आहे. त्यांनी अशी विधाने करायला नको होती.

सर्व पीएसएल सामने कराचीमध्ये भारतासोबत वाढत्या तणावामुळे पाकिस्तान सुपर लीग चे उर्वरित सामने कराची येथे हलवण्यात आले आहेत. आता सर्व सामने कराचीमध्ये होतील.भारतीय हवाई हल्ल्यानंतर कालचा पीएसएल सामना रद्द करण्यात आला. पाकिस्तानमध्ये सर्वत्र दहशतीचे वातावरण आहे.



*बुधवारी भारताने केलेल्या एअर स्ट्राईकमध्ये मारल्या गेलेल्या आतंकवाद्यांच्या अंत्ययात्रेपूर्वी पाकिस्तानी सैनिक सलामी देत आहेत.*

## ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरू

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी गुरुवारी सांगितले की, पाकिस्तानविरुद्ध ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरू आहे. म्हणजेच ७ मे रोजी पाकिस्तानातील ९ ठिकाणी झालेल्या हवाई हल्ल्यानंतरही कारवाई थांबलेली नाही.

दिल्लीतील संसदेच्या कक्षात बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत संरक्षणमंत्र्यांनी हे सांगितले. सुमारे दीड तास चाललेल्या बैठकीतून बाहेर पडल्यानंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनीही संरक्षणमंत्र्यांच्या विधानाचा पुनरुच्चार केला.

ऑपरेशन सिंदूरची माहिती देण्यासाठी बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे उपस्थित होते.

बैठकीपूर्वी काँग्रेसने पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीची मागणी केली होती. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, या संकटात आम्ही देश आणि सरकारसोबत आहोत. सरकारवर टीका करण्याची गरज नाही.

राहुल गांधी म्हणाले, 'आम्ही सरकारला पूर्ण पाठिंबा दिला आहे. मल्लिकार्जुन खरगे म्हणाले त्याप्रमाणे, त्यांनी (सरकारने) म्हटले की काही गोष्टी आहेत ज्यांवर आपण चर्चा करू इच्छित नाही.

एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी म्हणाले, 'ऑपरेशन सिंदूरसाठी मी आपल्या सशस्त्र दलांचे आणि सरकारचे कौतुक केले आहे. आपण रेझिस्टन्स फ्रंट या दहशतवादी संघटनेविरुद्ध जागतिक मोहीम सुरू केली पाहिजे.



## १५ लष्करी तळांवर पाकिस्तानचा रात्री हल्ला

ऑपरेशन सिंदूर नंतरच्या दिवशी, म्हणजे बुधवार-गुरुवारी रात्री, पाकिस्तानने १५ हून अधिक भारतीय लष्करी तळांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. रशियाकडून मिळालेल्या एस ४०० संरक्षण प्रणालीच्या माध्यमातून भारताने हा हल्ला हाणून पाडला.

संरक्षण मंत्रालयाने गुरुवारी सांगितले की, पाकिस्तानने उत्तर आणि पश्चिम भारतातील शहरांनाही लक्ष्य केले. या काळात अवंतीपोरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथला, जालंधर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदीगड, नल, फलोदी, उत्तरलाई आणि भुज येथे ड्रोन आणि क्षेपणास्त्रे डागण्यात आली. हे देखील उधळून लावण्यात आले. भारतीय लष्कराने एस ४०० हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली आधीच सीमेवर तैनात केली आहे आणि पाकिस्तानने क्षेपणास्त्रांनी हल्ला करताच ही प्रणाली सक्रिय करण्यात आली.

संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, आज सकाळी पाकिस्तानने केलेल्या हल्ल्यांनंतर, भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानमधील अनेक ठिकाणी हवाई संरक्षण रडार आणि प्रणालींना लक्ष्य करण्यासाठी हार्पी ड्रोनचा वापर केला. भारताची कारवाई पाकिस्तानच्याच क्षेत्रात आणि त्याच वेगाने करण्यात आली आहे. लाहोर, सियालकोट, कराची येथील हवाई संरक्षण प्रणाली नष्ट झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

एस-४०० ही एक हवाई संरक्षण प्रणाली आहे. हे हवेतून होणारे हल्ले रोखते. शत्रू देशांच्या क्षेपणास्त्रे, ड्रोन, रॉकेट लाँचर आणि लढाऊ विमानांचे हल्ले रोखण्यासाठी हे प्रभावी आहे. ते ६०० किमी अंतरापर्यंतच्या लक्ष्याचा मागोवा घेऊ शकते आणि त्याची लक्ष्य मारण्याची श्रेणी ४०० किमी आहे. हे रशियाच्या अल्माझ सेंट्रल डिझाईन ब्युरोने बनवले आहे आणि जगातील सर्वात आधुनिक हवाई संरक्षण प्रणालींमध्ये त्याची गणना केली जाते.

## ३ गावांमध्ये पडली क्षेपणास्त्रे

### स्फोट होण्यापूर्वी निष्क्रिय

■ **वृत्तसंस्था, अमृतसर, दि. ८ :**
भारताने पाकिस्तानवर केलेल्या ऑपरेशन सिंदूर हवाई हल्ल्यानंतर, पंजाबमधील अमृतसरमध्ये क्षेपणास्त्रे पडल्याचे आढळले आहे.

हे क्षेपणास्त्र अमृतसरच्या तीन गावांमध्ये पडलेले आढळले. अमृतसर ग्रामीण एसएसपी मनिंदर सिंग यांनी याची पुष्टी केली आणि सांगितले की याबद्दलची माहिती लष्कराला देण्यात आली आहे. त्यांच्या टीमला बोलावण्यात आले आहे.

या गोष्टी काय आहेत हे फक्त तेच सांगू शकतात. ही क्षेपणास्त्रे दुधाळा, जेठुवाल आणि पंधेर या गावात सापडली. त्यानंतर अमृतसरमध्येही ब्लॅकआउट करण्यात आले. हे असे क्षेपणास्त्र आहे जे भारत आणि पाकिस्तान दोन्ही देशांच्या सैन्याद्वारे वापरले जाते. पाकिस्तानच्या बाजूने यावर हल्ला झाला असण्याची शक्यता आहे, परंतु भारताच्या क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणेने त्यांना आकाशातच निष्क्रिय केले. त्यामुळे या क्षेपणास्त्रांचा स्फोट झाला नाही.



दरम्यान, धास्तावलेल्या पाकिस्तानकडून नियंत्रण रेषेवर सातत्याने गोळीबार आणि हल्ले केले जात आहेत.

## राष्ट्रवादीमधील गट दादांसोबत जाण्यास तयार

### शरद पवारांचा मोठा खुलासा



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी विशेष मुलाखतीत पक्षाच्या अंतर्गत राजकारणावर भाष्य करत मोठा खुलासा केला आहे.


पक्षातील एक गट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील ठउढ मध्ये सामील होण्याच्या मनस्थितीत असल्याचे त्यांनी सांगितले. यासोबतच, पक्षाने सत्तेत सहभागी व्हायचे की विरोधी बाकांवर राहायचे, हा निर्णय खासदार सुप्रिया सुळे यांनी घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शरद पवार म्हणाले, पक्षातील काही नेते आणि कार्यकर्ते अजित पवार यांच्यासोबत जाण्यास उत्सुक आहेत. पण अंतिम निर्णय सुप्रिया सुळे यांनी घ्यावा. त्यांच्यावर पक्षाच्या भवितव्याची मोठी जबाबदारी आहे. यामुळे अंतर्गत मतभेद चर्चेत आले आहेत.

## मालेगाव बॉम्बस्फोट खटल्याचा निकाल ३१ जुलैला?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**
महाराष्ट्रातील मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा निर्णय पुढे ढकलण्यात आला आहे. गुरुवारी, एनआयएच्या विशेष न्यायालयाने दोषींना शिक्षा सुनावण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाकडून ३१ जुलैपर्यंतचा वेळ मागितला. आता एनआयए न्यायालय ३१ जुलै रोजी निकाल देईल असे मानले जात आहे.

गुरुवारी सकाळी साध्वी प्रज्ञा सिंहसह सर्व आरोपी आणि पीडित न्यायालयात पोहोचले. या प्रकरणातील मुख्य आरोपी भोपाळच्या भाजपच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञा ठाकूर आहेत. साध्वींव्यतिरिक्त, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहितसह एकूण १२ आरोपी आहेत, ज्यांच्यावर दहशतवादी कट रचणे, खून करणे आणि धार्मिक उन्माद पसरवणे असे आरोप आहेत.



२९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगावमधील एका मशिदी जवळ स्फोट झाला होता. यामध्ये ६ जणांचा मृत्यू झाला आणि १०० हून अधिक जण जखमी झाले होते. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास महाराष्ट्र एटीएसने केला होता.

## सिएमआर मिलींग प्रकरणातील गंभीर त्रुट्या भोवणार?

### तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याच्या संपत्तीची चौकशी करा

■ **महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. ८ :**
बिड जिल्ह्यात २०२१ मध्ये भूसंपादन अधिकारी पदावर कार्यरत असतांना तब्बल पाच गुन्हे दाखल असलेल्या आणि गडचिरोली जिल्ह्यात जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून रुजु होऊन नुकतीच बदली करण्यात आलेल्या प्रकाश सौंदाजी आघाव पाटील हे गुन्हेगारी पार्श्वभूमीचे असल्याची कारकीर्द गाजली आहे.

गडचिरोली जिल्ह्यात सिएमआर मिलींग घोटाळ्यातील मुख्य सुत्रधाराच्या इशाऱ्यावर नाचत असल्याचे नुकतेच केलेल्या कारवाई वरून समोर येऊ लागले आहे.

यावरून प्रकाश पाटील यांनी या प्रकरणात शासनाची दिशाभूल करून कोट्यवधी रुपये कमावल्याची दाट शक्यता लक्षात घेता पाटिल यांच्या संपत्तीची चौकशी होणार का? असा प्रश्न आता उपस्थित केल्या जाऊ लागला आहे. देसाईगंज येथील एका कथित बड्या राईस मिलर्सकडुन सिएमआर मिलींग गैरव्यवहार प्रकरण संदर्भात आर्थिक देवाणघेवाण झाल्याच्या अनेक ऑडिओ व्हिडिओ रेकॉर्डींग संबंधित राईसमिलर्सकडे असल्याने पाटील यांनी दबावात येऊन देसाईगंज येथील चार राईसमिलर्सना बजावलेल्या आपल्याच नोटीसची अवहेलना केली असल्याचे सांगीतले जात आहे.

दरम्यान मोजक्याच राईसमिलर्सवर चुकीची कारवाई करण्याच्या प्रकरणातील गंभीर त्रुट्या प्रकाश पाटील यांना भोवणार आहेत. पाटील यांनी आरमोरी येथील जनता राईसमिल, देसाईगंज तालुक्यातील कुरुड येथील माँ शारदा फुड प्रॉडक्ट, सोनल पोहा उद्योग तसेच अजय राईसमिल यांचेवर जीवनावश्यक वस्तु अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. परंतु कुरुड येथील जय अम्बे राईसमिल मध्ये शासकीय तपासीत तब्बल ५६३१ क्विंटल धान कमी आढळून आले आहेत. तसेच भरडाईच्या तुलनेत वीजेचा वापर अत्यल्प झाल्याचे उघडकीस आले. बँक गॅरण्टीच्या तुलने ऐवजी जादा डिओ देणे, अशा गंभीर त्रुट्या आढळून आल्या. धान गायब करणाऱ्या राईसमिलर्सवर गुन्हा दाखल करणे आवश्यक असतांना पाटील यांनी जिल्हाधिकारी यांची दिशाभूल करून सदर राईसमिलवर गुन्हा दाखल करण्याऐवजी फक्त तीन वर्षाकरीता काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करून बचाव करण्याचा प्रयत्न केला आहे.

दरम्यान शासकीय धानाची अफरातफर झाल्याचे उघडकीस आले असतांना तसेच गडचिरोली जिल्ह्यात अनेक राईसमिलर्सनी धान भरडाईच्या तुलनेत वीज वापर केलेच नसल्याचे आदिवासी विकास महामंडळाच्या तपासणी पथकाने शासनाला सादर केलेल्या अहवालात नमूद केले होते. सदर गंभीर बाब हंगाम २०२२-२३ मध्ये उघडकीस आली असतांना सुद्धा संबंधित राईसमिलवर कोणतीही कारवाई न करता भरडाईचे काम देण्यात आले असुन आजमितीसही सुरु आहे.

विशेष म्हणजे जिल्ह्यात सिएमआर तांदूळ जमा करण्याकरीता शासकीय गोडाऊन उपलब्ध असतांना प्रकाश पाटील यांनी अयोग्य तांदूळ जमा जमा करणे सोयीचे होण्याकरीता खाजगी गोडाऊन घेणाऱ्या प्रकरणात नियमांना हरताळ फासल्याचे समोर येऊ लागले आहे.

यामुळे या प्रकरणात पाटील यांनी देसाईगंज येथील सिएमआर मिलींग गैरव्यवहाराचा सूत्रधार असलेल्या तंबाखु लाईनितील कुप्रसिद्ध छोटा बागडबिल्ल्याच्या माध्यमातून कोट्यवधीची कमाई केली असल्याचे सांगितले जात आहे.

प्रकाश पाटील हे आधिच गुन्हेगारी पार्श्वभूमी व भ्रष्ट अधिकारी म्हणून चर्चेत असतांना गडचिरोली जिल्ह्यात २०२०-२१ पासुन सिएमआर मिलींग प्रकरण चांगलाच गाजत असतांना जिल्हा पुरवठा अधिकारीचा प्रभार का देण्यात आला? कोणाच्या आशीर्वादाने पाटील यांनी गडचिरोली जिल्ह्यात सिएमआर मिलींग मध्ये प्रचंड घोटाळा करणाऱ्या घोटाळेबाजांना हाताशी धरून शासनाला चुना लावला,

याबाबत सखोल चौकशी करण्यात आल्यास अनेक घबाड उघडकिस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. तथापी पाटॅल यांच्या कार्यकाळात त्यांनी मिळवलेल्या चल अचल संपत्तीची चौकशी करण्यात यावी अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## नक्षल नेता जगन, रमेश ठार



■ **महासागर प्रतिनिधी गडचिरोली, दि. ८ :**
महाराष्ट्र, छत्तीसगड आणि तेलंगणा सीमेवरील करेगुट्टा टेकडीवर २२ नक्षलवाद्यांचा खात्मा केल्यानंतर आंध्रप्रदेश व ओडिशा सीमेवरील चकमकीत दोन जहाल नक्षलवादी नेत्यांना कंठस्नान घालण्यात सुरक्षा यंत्रणेला यश आले. आंध्रप्रदेश- ओडिशा सीमेचा विशेष झोनल कमिटी सदस्य काकुरी पंडान्ना उर्फ जगन (६०) व केंद्रीय समिती सदस्य रमेश उर्फ वागा पोडियामी (५१) यांचा मृतांत समावेश आहे.

करेगुट्टा येथे ७ मे रोजी जवान व नक्षलवाद्यांत चकमक झाली. या धूमश्चक्रीत २ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात जवानांना यश आले. याचवेळी तिकडे आंध्रप्रदेश व ओडिशा सीमेवरील अल्लूरी सीतारामराजू जिल्ह्यातील गुडेम कोठाविधी तालुक्याच्या दुमाकोंडा वनक्षेत्रात जवान व नक्षलवाद्यांत जोरदार चकमक उडाली. यात २० लाख रुपयांचर बक्षीस असलेला जगन व पाच लाखांचे बक्षीस असलेला रमेश या दोन जहाल नक्षल नेत्यांना जवानांनी बंदुकीचा निशाणा ठरवले. घटनास्थळावरुन एके- ४७ सारखी घातक शस्त्रे जप्त केली आहेत.

## हेलिकॉप्टर कोसळून पायलटसह ६ ठार



■ **वृत्तसंस्था, डेहराडून, दि. ८ :**
गुरुवारी उत्तराखंडमधील उत्तरकाशी येथे हेलिकॉप्टर कोसळले. हेलिकॉप्टरमध्ये ७ जण होते. ६ प्रवाशांचा मृत्यू झाला, तर १ जण गंभीर जखमी आहे.

हेलिकॉप्टर गंगोत्री धामला जात होते. प्रशासनाने सांगितले की, हेलिकॉप्टरमध्ये ४ पुरुष आणि २ महिला होत्या. कॅप्टन रॉबिन सिंग हे त्याचे पायलट होते. पर्यटकांना घेऊन जाणारे हेलिकॉप्टर डेहराडूनमधील सहस्त्रधारा हेलिपॅडवरून उड्डाण केले. हेलिकॉप्टरमध्ये चार मुंबईचे आणि दोन आंध्र प्रदेशचे यात्रेकरू होते. हे हेलिकॉप्टर एअरोट्रान्स सर्व्हिस या खाजगी कंपनीचे होते.

गेल्या काही दिवसांपासून उत्तराखंडमध्ये हवामान खराब आहे. हवामान खात्याने अनेक जिल्ह्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा जारी केला आहे. यात्रा मार्गावर अनेक ठिकाणी पाऊस पडत असून, मेघगर्जनेसह गारपीटही झाली आहे.

## देशाच्या अंतर्गत सुरक्षेकडे लक्ष देण्याची गृहमंत्रालयाची जबाबदारी...



■ **मुंबई :** ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आज सर्व पक्षीय बैठक बोलावली होती. या बैठकीत सरकारने सर्व पक्षांना ऑपरेशन सिंदूर बाबतची माहिती दिली. या बैठकीला ठाकरे गटाची उपस्थिती होती. बैठकीत ठाकरे गटाने आपले मत मांडले. याबाबत संजय राऊत यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत माहिती दिली आहे. संकटाच्या काळात आपण एक आहोत, अशी ग्वाही ठाकरे गटाने सरकारला दिली. तर आपल्या बहिणींचे सिंदूर नष्ट करणारे ६ दहशतवादी मारले जात नाहीत, तोपर्यंत ऑपरेशन सिंदूर पूर्ण होणार नाही, असेही ठाकरे गटाने म्हटले आहे.

आम्हाला भारतीय सैन्याचा अभिमान आहे. या संकटाच्या काळात आपण एक आहोत. आपल्या बहिणींचे सिंदूर नष्ट करणारे ६ दहशतवादी मारले जात नाहीत, तोपर्यंत ऑपरेशन सिंदूर पूर्ण होणार नाही. त्यांना दिल्लीतील इंडिया गेटसमोर आणा, त्यांची ओळख पटवा, त्यांना मारून पाकिस्तानात फेकून द्या, तरच बदला पूर्ण होईल, असेही मत ठाकरे गटाने मांडले आहे. पाकिस्तानचे स्लीपर सेल देशात सक्रिय आहेत, देशाच्या अंतर्गत सुरक्षेकडे लक्ष दिले पाहिजे. ही गृह मंत्रालयाची जबाबदारी आहे, अशी मागणीही ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आली.

## भावनिक फायदे मिळवण्यासाठी 'ऑपरेशन सिंदूर' हे नाव



■ **मुंबई :** भारत सरकारच्या वतीने पाकिस्तानमधील दहशतवादी केंद्र नष्ट करण्यासाठी विशेष मोहिम राबवण्यात आली. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला या माध्यमातून प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न भारतीय सेनेच्या वतीने करण्यात आला आहे. या मोहिमेला ऑपरेशन सिंदूर असे नाव देण्यात आले आहे. त्यावर काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी टीका केली आहे.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, सरकारने 'भावनिक फायदे' मिळवण्यासाठी 'ऑपरेशन सिंदूर' हे नाव निवडले होते, परंतु याचा प्रत्यक्ष परिणाम होणार नाही. त्यांच्या मतपेढीला खूश करण्यासाठी, ते पहलगाम विधवांच्या भावनांवर चिखलफेक करत आहेत. दररोज ते एका नवीन पातळीला जात असल्याची टीका देखील चव्हाण यांनी केली आहे. पहलगाममध्ये निष्पाप लोकांची कत्तल झाल्यानंतर जनतेच्या अपेक्षा पूर्ण केल्याबद्दल मी भारत सरकार आणि भारतीय लष्कराचे अभिनंदन करू इच्छितो. १५ दिवस झाले असल्याने, काय घडत आहे याबद्दल लोक चिंतेत होते.. हो, 'सिंदूर' या शब्दाशी अनेक भावना जोडल्या गेल्या आहेत, परंतु युद्ध भावनांनी जिंकता येत नाही. ते शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्याने जिंकले जाते. 'ऑपरेशन सिंदूर' हे नाव सरकारने 'भावनिक फायदे' मिळवण्यासाठी निवडले होते, परंतु याचा जमिनीवर काहीही फायदा होणार नाही.

## श्रीकांत शिंदेंकडून सरकारचे अभिनंदन



■ **मुंबई :** भारताच्या वतीने जे पाऊल उचलले जाईल, जी कारवाई केली जाईल, त्याच्या सोबत भारतातील सर्व पक्षीय नेते सरकार सोबत उभे आहेत. हा अतिशय सकारात्मक आणि कौतुकास्पद निर्णय असल्याचे शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी म्हटले आहे. इतर वेळी राजकारण सुरूच असते. मात्र आज सर्वांनी एकसंघ दाखवणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले.

केंद्र सरकारच्या वतीने आयोजित सर्वपक्षीय बैठकीनंतर ते वृत्तसंस्थेशी बोलत होते. राष्ट्रीय सुरक्षेच्या विषयावर सर्वच राजकीय पक्षांनी एकत्र येण्याचे काम केले. ज्या पद्धतीने ऑपरेशन सिंदूरची सरकारने अंमलबजावणी केली आहे, त्याबद्दल मी भारतीय सेना आणि केंद्र सरकारचे अभिनंदन करतो. पाकिस्तानच्या सर्वसामान्य नागरिकांवर हल्ला करण्यात आल्याचा दावा केला जात होता. मात्र, आज संरक्षण मंत्र्यांनी सर्व पक्ष बैठकीमध्ये केवळ दहशतवादी केंद्रांवर भारत सरकारच्या वतीने हल्ले करण्यात आले असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. केंद्र सरकारने ज्या पद्धतीने उत्तर द्यायला हवे होते, तसेच उत्तर सरकारने आणि भारतीय सेनेने दिल्याचे श्रीकांत शिंदे यांनी म्हटले आहे.

## मदरसे, मशिदीमध्ये कॅमेरे लावा



■ **मुंबई :** हाफिज सईदचे मदरसे जसे आहेत तसेच काही मदरसे आपल्या कोकणात सापडले आहे, राज्यातील मशिदी, मदरसे यामध्ये आवाज ऐकू येतील असे कॅमेरे लावले पाहिजे, अशी मागणी वकील गुणरत्न सदावर्ते यांनी केली आहे. तर राष्ट्रीय सुरक्षा ही सर्वात महत्त्वाची असून त्यापुढे काहीच नाही असेही त्यांनी म्हटले आहे.

सदावर्ते पुढे बोलताना म्हणाले की, राज ठाकरे सिंदूरचा अर्थ त्यालाच समजतो ज्याच्या घरी विचारामध्ये संस्कृती जिंवत आहे. राज ठाकरे कोण आहेत, त्यांच्या बोलण्याला काय किंमत द्यायची? असा सवाल करतानाच राज ठाकरेंची मती मारली गेली का? असा प्रश्न केला. राज ठाकरे सिंदूरचा अर्थ त्यालाच समजतो ज्याच्या घरी विचारामध्ये संस्कृती जिंवत आहे, ज्या आई-बहीण-मुलीचे सिंदूर पुसल्या गेले त्या वेदना कळण्यासाठी तुम्हाला हिंदुत्ववादी विचाराचे व्हावे लागते, डिफेन्सने जो निर्णय घेतला तो अतिशय योग्य घेतला. आज संपूर्ण देश मोदी आणि सैन्य दलासोबत असल्याचे ते म्हणाले.

# आश्रमशाळांच्या समस्या प्राधान्याने सोडवणार

### मंत्री अतुल सावे यांचा निर्धार



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :** विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिक्षण व सर्वांगीण विकास साधणाऱ्या निवासी आश्रमशाळांमध्ये निर्माण झालेल्या समस्या तातडीने सोडवण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले. स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या खाजगी अनुदानित निवासी आश्रमशाळांबाबत मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीला विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, वरिष्ठ अधिकारी व संस्थाचालक उपस्थित होते. मंत्री सावे यांनी स्पष्ट केले की, प्रलंबित अनुदानाचे वितरण टप्प्याटप्प्याने लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच संचमान्यता आणि वेतन अनुदानासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. संचमान्यता प्रक्रियेनंतरच रिक्त पदांची यादी तयार करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

सीएमश्री योजनेत आश्रमशाळांचा समावेश करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात यावा, विद्यार्थ्यांना आयुष्मान भारत कार्ड मिळावे आणि राज्य, विभाग व जिल्हास्तरावर क्रीडा स्पर्धांचे आयोजन व्हावे, यावर त्यांनी भर दिला.

या बैठकीत महिला अधीक्षकांची नियुक्ती, रिक्त पदांची भरती, सौरऊर्जेचा वापर, आश्रमशाळा संहिता आदी विषयांवरही सकारात्मक चर्चा झाली. आश्रमशाळा ही केवळ शिक्षणाचे माध्यम नसून, समाजातील वंचित घटकांच्या प्रगतीचा मजबूत पाया आहे, हे लक्षात घेऊन शासन सर्वतोपरी मदत करेल, असे आश्वासन मंत्री सावे यांनी यावेळी दिले.

याप्रसंगी संस्थाचालकांनी त्यांच्या समस्या मांडल्या.

## मुंबईत नालेसफाईचे काम बेभरवशाचे!

### पालकमंत्री आशिष शेलार यांचे ताशेरे



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :** मुंबईत पावसाळ्यापूर्वी सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामांची पाहणी करताना मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी नालेसफाईची कामे बेभरवशाची आणि अपूर्ण असल्याची गंभीर टिप्पणी केली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, काही ठिकाणी फक्त १० ते ३० टक्के काम झाले असून, ३५ दिवसांत अपेक्षित प्रगती दिसत नाही, हे धक्कादायक आहे.

शेलार यांनी आज सांताक्रूझ पश्चिममधील गझदरबांध येथून नालेसफाईच्या पाहणी दौऱ्याला सुरुवात केली. यानंतर एस.एन.डी.टी. नाला, ईरला, मोगरा, शाहिद भगतसिंग नगर आदी नाल्यांवरही प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी भाजपचे माजी नगरसेवक, स्थानिक पदाधिकारी आणि पालिका अधिकारीही उपस्थित होते.

नालेसफाईचा व्हिडिओ किंवा फोटो दाखवण्यास अधिकारी अयशस्वी ठरले. मिलेनियम नाल्यावर केलेल्या गाळ सफाईचं प्रत्यक्ष फुटेज किंवा रिकाम्या डंपरचा पुरावा अधिकाऱ्यांकडे नव्हता. स्मार्ट ॲप अद्ययावत नसल्याने तांत्रिक तपशीलही सादर होऊ शकला नाही. यामुळे तंत्रज्ञानाच्या वापराबाबत प्रशासन अपयशी ठरत असल्याची टीका शेलार यांनी केली.

**पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह**

गाळ काढताना नाल्यांची लांबी, रुंदी, खोली कशी मोजली जाते? कोणत्या मशीनचा उपयोग होतो? असे प्रश्न शेलार यांनी उपस्थित केले. मात्र यावर प्रशासनाकडे ठोस उत्तर नसल्याचे ते म्हणाले. फक्त टीका करून भागणार नाही, कामाची गुणवत्ता आणि वेळेवर पूर्णता आवश्यक आहे. आयुक्तांनी स्वतः रस्त्यावर उतरून पाहणी करावी, असा इशारा देत शेलार यांनी कंत्राटदारांना पाठीशी न घालण्याचे आदेश दिले. कामात हलगर्जीपणा केल्यास कठोर कारवाई होईल, असेही ते म्हणाले.

मुंबईकरांची सुरक्षितता आणि पावसाळ्यातील त्रास टाळण्यासाठी नालेसफाईची कामे वेळेत, पारदर्शक आणि दर्जेदार व्हावीत, यासाठी सरकारकडून यंत्रणा सज्ज केली जाणार असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

### घाटकोपर फलक दुर्घटना
## चौकशीचा अहवाल सादर

■ **मुंबई :** घाटकोपर येथे बेकायदा महाकाय फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करणाऱ्या माजी मुख्य न्यायाधीश दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखालील समितीने बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आपला सीलबंद अहवाल सादर केला. समितीने चौकशी सोबतच महाकाय फलकाच्या संदर्भात उपाययोजना सरकारला सुचवल्या आहेत.

१३ मे २०२४ रोजी घाटकोपरच्या छेडानगर परिसरात बेकायदा महाकाय फलक कोसळून १६ निष्पाप नागरिकांचा बळी गेला होता. या दुर्घटनेनंतर शहरातील जाहिरात फलक आणि त्यांची कायदेशीरता याबाबत प्रश्न निर्माण झाले होते. राज्य सरकारने या घटनेची चौकशी करण्यासाठी १० जून २०२४ च्या निर्णयान्वये चौकशी समिती गठीत केली होती.

घाटकोपरमध्ये महाकाय फलक उभारण्याची परवानगी देताना अटी, शर्तींचे उल्लंघन कसे झाले याचीही चौकशी या समितीने केली आहे. या समितीने नेमक्या काय शिफारशी केल्या?, याची स्पष्टता सरकारकडून केली जाण्याची शक्यता आहे.

## मराठवाड्यात भीषण पाणीटंचाई, महिलांची पायपीट

■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. ८ :** मराठवाड्यात पाण्याची स्थिती अत्यंत बिकट झाली आहे. जवळपास पावणेचारशे गावांना ४३३ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. त्यात छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक टँकरद्वारे पाणीवाटप करण्यात येत आहे. दरवर्षीपेक्षा लवकर मान्सून दाखल होणं हा शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा ठरणार आहे.

सध्या अनेक भागात पाण्याची बिकट अवस्था आहे. यामुळे पाण्याचा प्रश्न सुटू शकतो. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने ७५५ खासगी विहिरींचे अधिग्रहण केले आहे. २०२ गावांसाठी २३९ विहिरी टँकरसाठी वापरल्या जात असून, उर्वरित ५१६ विहिरी टँकरव्यतिरिक्त वापरण्यात येत आहेत.

छत्रपती संभाजीनगर शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने महापालिकेने ३५ पेक्षा जास्त मोफत टँकर नागरिकांच्या सेवेत लावले आहेत. पाण्याअभावी मनपाकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी येवू लागल्या आहेत.

## शिंदेंची ठाण्यात मोठी खेळी : राष्ट्रवादी काँग्रेसला 'दे धक्का'

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :** पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी ठाण्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला मोठा धक्का दिला आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघातील ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कळवा, खारीगाव, विटावा विभागातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या माजी नगरसेवकांनी शिंदेंचे नेतृत्व स्वीकारत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

एकनाथ शिंदे यांच्या मुक्तगिरी या निवासस्थानी हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. या पक्षप्रवेशामुळे संपूर्ण कळवा, विटावा, खारीगाव परिसर भगवा झाला आहे, अशी भावना एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

ठाणे महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते मिलिंद पाटील, माजी नगरसेविका मनाली पाटील, माजी नगरसेवक महेश साळवी, माजी नगरसेविका मनिषा साळवी,



माजी नगरसेविका आणि ठाणे महिला राष्ट्रवादी (शरद पवार) गटाच्या कार्याध्यक्षा सुरेखा पाटील, माजी नगरसेवक सचिन म्हात्रे यांनी भगवा झेंडा हाती घेत शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या माजी नगरसेवकांचा शिंदे सेनेतील प्रवेश शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या राजकीय वर्चस्वाला धक्का मानला जात आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येत असताना शिंदेंनी ठाण्यात केलेली ही खेळी महत्त्वपूर्ण मानली जात आहे. हा पक्षप्रवेश राजकारणात काय उलथापालथ घडवतो, हे येत्या काळात स्पष्ट होईल.

विशेष म्हणजे, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या जनसंपर्क विभागामार्फत पाठवलेल्या निमंत्रण मेसेजमध्ये पक्षप्रवेशासाठी १०:१० वाजताची वेळ ठरवण्यात आलेली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज टायमिंग साधत माजी नगरसेवकांचा पक्षप्रवेश घडवून आणलेला पाहायला मिळाला. शिंदे यांनी पक्षप्रवेशाचा कार्यक्रम अचून टायमिंग साधत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या वर्चस्वाला धक्का दिला आहे.

मिलिंद पाटील हे स्थानिक पातळीवर प्रभावी नेता असून ठाणे महापालिकेचे विरोधी पक्षनेतेही होते. ते जितेंद्र आव्हाड यांचे अतिशय जवळचे मानले जात होते. विधानसभा निवडणुकीच्या काळात मिलिंद पाटील यांनी कळवा मतदारसंघात जितेंद्र आव्हाड यांना लक्षणीय मताधिक्य मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.


## रेशनिंगचा तांदूळ भरलेला ट्रक सापडला

■ **महासागर प्रतिनिधी पनवेल, दि. ८ :** पनवेल तालुक्यातील पलस्पे येथील ओसियन गेट पार्किंगमध्ये एक संशयास्पद ट्रक आढळून आला असून, त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर फोटीफाईड तांदूळ भरलेला असल्याचे उघड झाले आहे.

विशेष म्हणजे, हा तांदूळ एक्स्पोर्टसाठी पाठवण्यात येणार असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. पनवेलचे पुरवठा निरीक्षण अधिकारी यांनी सदर ट्रकची तपासणी केली असता, हा तांदूळ फोर्टीफाईड असल्याचे स्पष्ट झाले . म्हणजेच हा तांदूळ सार्वजनिक वितरण प्रणालीत (रेशन दुकानांमध्ये) वितरित केला जाणारा आहे.

सरकारी योजनेंतर्गत लाभार्थ्यांना वितरित होणाऱ्या अन्नधान्याचा असा गैरवापर होणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. यामुळे संबंधित पुरवठा यंत्रणेतील गोंधळ, दुर्लक्ष किंवा मिलीभगतीचा संशय बळावला आहे.

सध्या अन्न व नागरी पुरवठा विभाग तसेच स्थानिक प्रशासनाने याप्रकरणी चौकशी सुरू केली आहे. ट्रक मालक, ट्रान्सपोर्ट एजन्सी आणि निर्यात कंपनी यांची चौकशी केली जात असून, दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले



आहे.

हा प्रकार उघड झाल्यानंतर नागरिकांतून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत असून, रेशन यंत्रणेतील पारदर्शकतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## आधुनिक भगीरथ : कर्मवीर भाऊराव पाटील



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड. जि. पुणे.**

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज पुण्यतिथी.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती.

अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्यामनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले.

शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली.

या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले.

बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली.

लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच.

कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली.

आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, (२७ मुलींसाठी ) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, (१ मुलींसाठी) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली.

रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डी. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला.

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची पुण्यतिथी. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन! ■ ■ ■

# मुज्जफराबाद आणि मुरिदके येथे कसाबचे प्रशिक्षण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :** भारतीय सैन्याने मंगळवारी मध्यरात्रीनंतर पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर केलेल्या हवाई हल्ल्यावर ज्येष्ठ वकील आणि भाजप नेते उज्वल निकम यांनीही प्रतिक्रिया दिली आहे.

दहशतवाद्यांचे पाकिस्तानातील अड्डे पूर्णपणे उद्धवस्त केल्याबद्दल त्यांनी भारतीय सैन्य आणि पंतप्रधान मोदींचे आभार मानले आहेत. जर पाकिस्तानने याचा बदला घेतला, तर त्यांना मोठी किंमत मोजावी लागेल, असेही ते म्हणाले. यासोबतच मुज्जफराबाद आणि मुरिदके या दोन ठिकाणी अजमल कसाबला ट्रेनिंग दिली होती. याबाबत त्याने चौकशीदरम्यान कबुली दिली होती, असे निकम यांनी सांगितले.

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबई मोठ दहशतवादी हल्ला झाला होता. १० पाकिस्तानी दहशतवादी समुद्रीमार्गे आले होते. त्यांनी मुंबईत अंधाधुंद गोळीबार करत नागरिकांचा जीव घेतला होता. या हल्ल्यातील अजमल कसाब या एकमेव दहशतवाद्याला जीवंत पकडण्यात यश आले होते.

ज्येष्ठ वकील उज्वल निकम यांनी त्यावेळी त्याच्याविरोधात खटला लढला होता. यादरम्यान, पाकिस्तानातील मुज्जफराबाद आणि मुरिदके या ठिकाणी आपल्याला प्रशिक्षण भेटले होते, असे कसाब याने पोलिसांच्या चौकशीदरम्यान सांगितले होते. भारताने दोन दिवसांपूर्वी केलेल्या एअर स्ट्राईकमध्ये दहशतवाद्यांचे हे तळ उद्धवस्त करण्यात आले.

मुज्जफराबाद आणि मुरिदके या दोन ठिकाणी अजमल कसाबला प्रशिक्षण दिले गेले. याबाबतची कबुली कसाबने चौकशीदरम्यान दिली होती. या दोन ठिकाणी आम्हाला कशाप्रकारचे ट्रेनिंग दिले जायचे याचा कसाबने स्पष्ट उल्लेख केला आहे.

माझ्या मते, मुरीदके आणि मुज्जफराबाद या दोन ठिकाणांची नावे त्याने सांगितले होती. त्यांना काही ठिकाणची नावे त्यांना माहीत नव्हती. कारण इतर ठिकाणी त्यांना गुप्तपणे नेले जात असे. ही सगळी माहिती आपल्याकडे संग्रहित होती. त्यामुळे दहशतवाद्यांना मुझफ्फराबाद, मुरीदके आणि भारताने नष्ट केलेल्या लपण्याच्या ठिकाणांमध्ये प्रशिक्षण देण्यात आले होते, असे उज्वल निकम म्हणाले.

भारताने केलेल्या कारवाईचा प्रतिशोध घेणार नाही, असे सांगत पाकिस्तानने शहाणपणा दाखवला आहे. कारण त्याने प्रतिशोध घेण्याचा प्रयत्न केला, तर पाकिस्तानला भारताची ताकद माहिती आहे. आपल्या देशाचे हवाई दल, सैन्य, आपली राजनीती यांची महत्त्वाची कामगिरी या कारवाईने यशस्वी झाली, असेही ॲड. उज्वल निकम म्हणाले.

### दहशतवाद्यांना प्रशिक्षण देण्यामागे पाकिस्तानी लष्करी ताकद

१९९३ चा मुंबई बॉम्बस्फोटाचा खटला देखील जेव्हा मी चालवला, त्यावेळी देखील टाइम पेन्सिल डिटोनेटर कसे चालू करायचे याचे प्रशिक्षण दिले होते. १२ मार्चला मुंबईत एकाच वेळी बॉम्बस्फोट झाले. त्या हल्ल्यात आरडीएक्स पहिल्यांदाच वापरण्यात आले. दहशतवाद्यांना जे प्रशिक्षण दिले जायचे, ते केवळ हाफिझ सईद किंवा त्यांच्यासारखेच देत नव्हते. तर त्यामागे पाकिस्तानची लष्करी ताकद देखील होती, असे उज्वल निकम यांनी म्हटले.



## कोल्हापुरात काँग्रेसमध्ये फूट?

■ **कोल्हापूर, दि. ८ :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजण्याच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूरमधील काँग्रेसमध्ये फूट पडण्याची शक्यता अधिकच बळावली आहे.

आमदार सतेज (बंटी) पाटील यांच्या गोटातील तब्बल दहा ते बारा माजी नगरसेवक, उपमहापौर, सभापती शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश करण्याच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

या घडामोडींमुळे कोल्हापुरातील काँग्रेस नेतृत्व अडचणीत येण्याची चिन्हं आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचा घटक म्हणून सत्ताधारी पक्षात सामील होण्याकडे अनेकांचा कल दिसून येतो आहे. परिणामी काँग्रेसमध्ये अस्वस्थतता पसरली आहे.

# अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींच्या शासकीय निवासी शाळेत प्रवेश प्रक्रिया सुरु.

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा , दि.०८ मे :** जवाहरनगर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत भंडारा तालुक्यातील राजेदहेगाव येथे अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलीच्या शासकीय निवासी शाळेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता इयत्ता ६ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यासाठी ऑफलाईन सेमी इंग्रजी माध्यमासाठी मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे.

इयत्ता ६ वी च्या ४० जागेसाठी आणि इयत्ता सातवी, आठवी, नववी व दहावीच्या प्रवर्ग निहाय रिक्त जागेकरिता प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

प्रवेशा करिता आरक्षण अनुसूचित जातो ८० टक्के, अनुसूचित जमाती १० टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमाती ५ टक्के, विशेष मागास प्रवर्ग २ टक्के, दिव्यांग प्रवर्ग ३ टक्के अशा प्रकारे प्रवेश करता येते.

प्रवेश घेण्यासाठी गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, महाराष्ट्र निवासाचे प्रमाणपत्र, विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, बँकेचे पासबुक, वैद्यकीय प्रमाणपत्र व पालकांचे समंतीपत्र आवश्यक आहे.

ज्या विध्यार्थीनिना शासकीय निवासी शाळेत प्रवेश घ्यावयाचा आहे. त्यांनी निवासी शाळा राजेदहेगाव (झिरी रोड) आयुध निर्माणी जवळ जिल्हा भंडारा येवून दिनांक १४ में पर्यंत अर्ज प्राप्त करून सादर करावे, असे आवाहन डॉ. सचिन मडावी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व मुख्याध्यापक नरेंद्र मेंढे या विभागानी कळविले आहे.

# जिल्हा पुरवठा विभागाला जडले रातांधळेपणा

*** चार शासकीय गोदाम रिकामे मात्र भाड्याने घेतले खाजगी गोदाम * शासकीय तिजोरीला लाखो रूपयाचा चूना**



**महासागर प्रतिनिधी**
**लाखांदूर , दि.०८ मे :** तालुक्यातील जिरोबा येथे १०८०० मे. टन म्हणजे प्रत्येकी १८०० मे. टनाचे सहा गोडाऊनचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मात्र गोडाऊनचे बांधकाम पूर्ण होऊन सुध्दा गेली अनेक दिवसांपासून जिरोबा गोडाऊन सुरू होणार असल्याच्या चर्चा रंगत असल्या तरी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या उदासिनतेमुळे अद्यापही गोडाऊनचे लोकार्पण केले गेले नाही.

परिणामी लाखांदूर तालुक्यात सीएमआरचा तांदूळ साठवणुकीसाठी चार गोडाऊन भाडेतत्वावर शासनाला घ्यावे लागले असल्याने गोडाऊन तयार असून सुध्दा शासनावर लाखो रुपयाचा भुर्दंड बसत असल्याचे वास्तव उघड झाले असल्याने जिल्हा पुरवठा विभागाला रातांधळेपणाचा आजार तर जडला नसावा ना असे समजने वावगे ठरणार नाही.

महाराष्ट्र सरकारने नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत सन २०२० मध्ये लाखांदूर तालुक्यातील जिरोबा येथे प्रत्येकी १८०० मे. टनाचे सहा असे एकूण १०८०० मे. टन क्षमतेच्या गोदाम बांधकामा करिता अंदाजपत्रकीय किंमत ही २९ कोटी १६. लक्ष ३८ हजार रुपये असून सुमारे २३ कोटी ६१ ल ६८ हजार रुपयांचा निधी यासाठी मंजूर करून बांधकाम पूर्ण करण्यात आले.

कंत्राटदाराच्या दिरंगाई मुळे गोडाऊन बांधकाम करण्यास सलग पाच वर्षाचा कालावधी लागला.

मात्र उशीरा का होईना पण गोदाम पुर्णत्वास येऊन तांदूळ साठवणूकीसाठी सज्ज दिसून येत आहेत.

* बाजार समिती गोदाम लाखंदुर क्षमता २००० मे. टन, भेंडारकर गोदाम विरली बूज क्षमता २००० मे. टन, भैव्या फुड्स गोदाम लाखादूर क्षमता २००० मे. टन, सविता इंचीलवार गोदाम सोनी क्षमता २००० मे. टन, असे लाखांदूर तालुक्यात चार गोडाऊन ९००० मे टन. क्षमतेचे खाजगी गोदामे भाड्याने घेण्यात आले. जिरोबा येथील गोडाऊन बांधकाम कंत्राटदाराकडून सार्वजनिक बांधकाम विभाग लाखांदूरने विहित वेळेत गोडाउनचे बांधकाम पूर्ण करून घेतले असते तर पणन हंगाम २०२४-२५ मध्ये सी.एम. आर साठवणुकी करिता खासगी गोडाऊन भाड्याने घेण्याची नामुष्की शासनावर ओढवली नसतीङ.

***खासगी गोडाऊन धारकांची मनमानी**

पणन हंगाम २०२४-२५ मध्ये आम्ही धान भरडाई करिता करारनामा केला आहे. त्यानुसार आम्हाला जिल्हा पणन कार्यालयाकडून धानाचे डी ओ दिले जातात. त्यानुसार आम्ही धानाची मिलिंग करून सी. एम. आर. चा तांदूळ जमा करण्याकरिता जिल्हा पुरवठा कार्यालया मार्फत तालुक्यातील खासगी गोडाऊनची उपलब्धता करून दिली जाते. परंतु त्या खासगी गोडाऊन चालकांकडून आम्हा मिलधारकांचा सी. एम. आर. चा तांदूळ संबंधित गोडाऊन मध्ये जमा करण्यास विरोध केला जातो. मात्र खासगी गोडाऊन धारकांची मनमानी सुरू असल्याने फक्त मर्जीतील राईस मिलर्स चे तांदूळ गोडाऊन मध्ये जमा करीत असल्याने शासनाने भाड्याने घेतलेल्या खासगी गोडाऊन मुळे छोट्या राईस मिलर्स धारकांना त्रास सहन करावा लागत असल्याने जिरोबा येथील गोडाऊन तत्काळ सुरू करावे.

**छोटे राईस मिलर्स, लाखांदूर**

# वादळामुळे पिकांचे नुकसान



**महासागर प्रतिनिधी**
**साकोली , दि.०८ मे :** तालुक्यात नुकताच पडलेला दुष्काळ आणि वादळामुळे शेतकऱ्यांची मेहनत उद्ध्वस्त झाली आहे.

विशेषत: भात पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, त्यामुळे शेतकरी कमालीचे अस्वस्थ व हताश झाले आहेत.

या नैसर्गिक आपत्तीचे गांभीर्य पाहून आमदार नानाभाऊ पटोले यांनी तहसीलच्या वांगी गाव व परिसरातील बाधित भागाला भेट दिली. त्यांनी शेतात जाऊन नुकसानीचा आढावा घेतला आणि बाधित शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. त्यांच्या समस्या ऐकल्या, त्यांच्या वेदना समजून घेतल्या आणि धीर दिला. या भेटीदरम्यान महसूल व कृषी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचनाही देण्यात आल्या.

## अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास २० मे २०२५ पर्यत मुदतवाढ

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा , दि.०८ मे :** अनुसूचित जाती , नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशामध्ये विशेष अध्ययन करण्यासाठी प्रवेश घेतलेल्या सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर विस्तृत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या शिष्यवृत्तीसाठी जाहिरातीद्वारे अर्ज स्विकारण्याची यापूर्वी अंतिम मुदत ३० एप्रिल २०२५ दिली होती.

त्याअनुषंगाने या जाहिरातीस आता अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदतवाढ २० मे २०२५ दिली आहे. तरी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात अनुसूचित जाती, नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी परदेश शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अर्ज तात्काळ आयुक्त, समाज कल्याण आायुक्तालय, ३, चर्चपथ, पुणे-०१ याचेस्तरावर अर्ज करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त सचिन मडावी यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी कोलते यांची परसटोला येथे सदिच्छा भेट



**महासागर प्रतिनिधी**
**साकोली , दि. ०८ मे :** भंडारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी संजय कोलते यांनी साकोली तालुक्यातील परसटोला गावाला सदिच्छा भेट दिली. यावेळी सरपंच हरिश्चंद्र दोनोडे यांनी ग्रामपंचायतच्या वतीने पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी अश्विनी मांजे तसेच तहसीलदार शामराव शेंडे आदी अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कोलते यांनी यावेळी विविध सुविधा कामे, तळ्यातील गाळ काढण्याचे काम तसेच गावातील इतर महत्वाच्या गोष्टींविषयी चर्चा केली व काही महत्वाच्या सुचना दिल्या. यावेळी सरपंच हरिश्चंद्र दोनोडे, ग्रामपंचायत अधिकारी धुर्वे, तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# मनोहर कनिष्ठ कला महाविद्यालयाचे सुयश



**महासागर प्रतिनिधी**
**लाखनी , दि.०८ मे :** उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून गुरढा येथील मनोहर कनिष्ठ कला महाविद्यालयातील ३७ विद्यार्थ्यांपैकी ३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम श्रेणीत ५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रथम निकिता गंगाधर कान्हेकर ६७.३३टक्के ,द्वितीय कावेरी राजू मोहतुरे ६६.३३टक्के, पायल भागवत तिजारे ६६.३३टक्के, तृतीय सेजल मोरेश्वर बावनथडे ६५.६७टक्के हे विद्यार्थी उत्तीर्ण तर द्वितीय श्रेणीत २२ विद्यार्थी तर तृतीय श्रेणीत ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन प्राचार्य योगराज मांडवटकर, चंद्रकिरण साखरे,उमेश सिंगनजुडे,उमेश रेहपाडे, जवाहर मुंगूसमारे,सुभाष गरपडे,शोभा अंडेल, नीलकंठ केरझरे यांनी अभिनंदन केले.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जांब येथील नवभारत साक्षरता अभियान



**जांब (लोहारा ), दि.०८मे :** आज दिनांक ६/५/२०२५ रोज मंगळवार ला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जांब येथील नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत २०२३-२०२४ मधील नवसाक्षर लाभार्थीना उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. याप्रसंगी संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती तुमसर किरण अतकरी सरपंच जांब .वसुंधरा अतकरी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चंद्रसेन उताणे, मुख्याध्यापक स्वाती होळंबे मॅडम तसेच ग्रामपंचायत सदस्य अनील बडवाईक, मोहित बांते, स्मिताताई साठवणे, भूपेश पवार आदी मान्यवर, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य ,आशा वर्कर उपस्थित होत्या. सर्व २७ लाभार्थींना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले व त्यांचे अभिनंदन करून पुष्पगुच्छ देण्यात आले.

# भटक्या कुत्र्यांची दहशत

**रात्रीच्या वेळी ग्रुपमध्ये फिरणे, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण**



**महासागर प्रतिनिधी**
**साकोली , दि.०८ मे :** साकोली येथे भटक्या कुत्र्यांचा वावर झपाट्याने वाढत आहे. या कुत्र्यांमुळे केवळ गुरेच नव्हे तर नागरिकांचे आरोग्य व सुरक्षितता धोक्यात आली आहे. शहरात किमान १० भटक्या कुत्र्यांचा सक्रिय पॅक दिसतो, जे दिवसा कमी आणि रात्री जास्त सक्रिय असतात. हे कुत्रे रात्रीच्या वेळी संपूर्ण गावात टोळक्याने फिरतात आणि तेथून जाणाऱ्या वाहनांवर हल्ला करण्याचा प्रयत्न करतात.

परिसरातील लोक आपल्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी पाळीव कुत्री पाळतात तसेच अनेकजण घरीही कुत्रे पाळतात.

या कुत्र्यांना पकडून त्यांचा बंदोबस्त करावा. नगरपरिषदेने यावर उपाययोजना करावी असे निवेदन फ्रीडम युथ च्या वतीने करण्याचे सांगितले व नागरिकांनी सतर्क राहून खबरदारी घ्यावी असेही आव्हान करण्यात आले.



'या कुत्र्यांच्या त्रास महिला व मुली रात्री उशिरापर्यंत व सकाळी मॉर्निंग वॉकला जातात त्यांच्यामध्ये भीतीचे वातावरण आहे विशेषता मुली व महिला जरी गाडीवर असतील तरी गाडीच्या स्पीड हा कमी असतो व अशा वेळेस समूहामध्ये कुत्रे एकत्रित येऊन गाडीवर हल्ला करतात त्यासाठी या बेवारस कुत्र्यांच्या बंदोबस्त नगरपरिषद प्रशासनाने करावा अशी मागणी केली आहे.'

***सौ वैशाली बनकर,***
***गृहिणी, साकोली.***

# बहुजन समाज पार्टीची संघटन समीक्षा बैठक यशस्वीरीत्या संपन्न

**सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यातील नव्या टप्प्यासाठी दृढ संकल्प**



**महासागर प्रतिनिधी**
**लाखांदूर , दि.०८ मे :** बहुजन समाज पार्टी भंडारा जिल्हा शाखेच्या वतीने आज सर्किट हाउस (विश्राम भवन), भंडारा येथे आयोजित करण्यात आलेली संघटनात्मक समीक्षा बैठक अत्यंत प्रेरणादायी व यशस्वी ठरली.

या बैठकीस बसपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. ॲड. सुनील डोंगरे साहेब प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासोबत प्रदेश महासचिव मंगेशजी ठाकरे आणि विदर्भ झोन प्रभारी हीवराज जगणे साहेब यांचीही विशेष उपस्थिती लाभली.

बैठकीला भंडारा जिल्ह्यातील सर्व विधानसभा क्षेत्रांतील बूथ, सेक्टर स्तरावरील कार्यकर्ते, बामसेफचे पदाधिकारी, तसेच बसपा हितचिंतक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

बैठकीच्या सुरुवातीस जिल्हाध्यक्ष आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि मागील संघटनात्मक कामाचा आढावा सादर केला.

या बैठकीत ॲड. सुनील डोंगरे साहेबांनी कार्यकर्त्यांना उद्देशून सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की,'बसपा ही केवळ एक राजकीय संघटना नसून, ती एक सामाजिक क्रांती आहे.

मान्यवर कांशीराम साहेब आणि बहन मायावतीजी यांनी दिलेल्या मार्गावर आपण निष्ठेने चाललो पाहिजे. समाज परिवर्तनासाठीच्या या लढ्यात कोणतीही अडचण किंवा पराभव आपली वाट रोखू शकत नाही.' त्यांनी जिल्ह्यातील संघटन रचना, बूथ मजबुतीकरण, स्थानिक प्रश्नांवर काम करण्याच्या रणनीतीवर भर दिला.

प्रदेश महासचिव मंगेशजी ठाकरे आणि झोन प्रभारी हीवराज जगणे यांनीही कार्यकर्त्यांशी संवाद साधत संघटनात्मक कामात नवचैतन्य आणण्याचे आवाहन केले. त्यांनी बूथ पातळीवर महिला, युवक आणि विद्यार्थ्यांना जोडण्याच्या गरजेवर भर दिला.

बैठकी दरम्यान अनेक नव्या कार्यकर्त्यांनी बसपामध्ये प्रवेश केला. बैठकीचा शेवट 'जय भीम' च्या घोषणांनी झाला. उपस्थित कार्यकर्त्यांनी सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात अधिक जोमाने सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला.

संघटन, विचार व कृती एकत्र आणून समाजात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवायचे असेल तर बसपाचा पाया मजबूत करणे हाच एकमेव मार्ग आहे, हा संदेश या बैठकीतून प्रभावीपणे सर्वांपर्यंत पोहोचवण्यात आला.

# कृषी विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या योजनेपासून शेतकऱ्यांना वंचित ठेवू नका - खा. डॉ.प्रशांत पडोळे

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा , दि.०८ मे :** उपविभागीय स्तरिय खरीप हंगाम पुर्व क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांची एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. महसूल विभाग, आणि कृषी विभाग यांचे शेतकऱ्यांचे शेतपिकाचे पंचनामे करतांनी कुठल्याही प्रकारचा ताळमेळ मात्र दिसून येत नाही. बरेच शेतकरी कृषी विभागाच्या योजनेपासून वंचित आहेत. अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतपिकाचे पंचनामा करण्यापासून तर मोबदला मिळेपर्यंत वंचित आहेत. आता आलेल्या अवकाळी पावसाने बऱ्याच शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. बऱ्याच शेतकऱ्यांच्या शेतावर आतापर्यंत महसूल आणि कृषी विभागाचे अधिकारी या कर्मचारी पोहचू शकत नाहीत. ही शोकांतिका आहे. शेतकऱ्यांसाठी तरी सरकारच्या दबाव देऊन काम करू नका. असे खडेबोल अधिकाऱ्यांना यावेळी सुनावले. आपल्या कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी शेतकऱ्यांपर्यंत योजना पोहोचत नाही. बऱ्याचदा कृषी विभागाचे अधिकारी,कर्मचारी, कृषी सहाय्यक, गावातील श्रीमंत शेतकरी यांच्या कडे जाऊन योजनेची माहिती देत असल्याची माहिती गावातील शेतकऱ्यांनी यावेळी दिली.



कमी शेती असलेल्या शेतकऱ्यांकडे आपल्या विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत असतात. त्यांच्या नुकसान झालेल्या शेतपिकाचे पंचनामे करण्यासाठी टाळाटाळ करीत असतात. हे किती योग्य आहे? शेतकऱ्यांच्या शेतपंचनामे नुकसान भरपाईचे कसे करता, ते सर्वांना माहिती आहे. पंचनामे करित करीत असताना शेतकऱ्यांना का वंचित ठेवले जाते. रब्बी पिक, आणि खरीप हंगामाच्या पिकाची वेळेत शेतकऱ्यांना त्या गावापर्यंत जावून माहिती द्या. गावागावात कार्यशाळा लावा. पुढची बैठक संयुक्त घ्या. महसूल, कृषी, पसुवर्धन या विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांनाही कार्यशाळेत बोलवा. असेही यावेळी सांगितले. जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क करणार असल्याचे यावेळी भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खा.डॉ. प्रशांत पडोळे यांनी सांगितले.

युरिया खताचा तुटवठा पडू देऊ नका. कृषी केंद्रावर लक्ष घाला. शासनाच्या योजनेपासून शेतकऱ्यांना वंचित ठेवू नका.

जिल्ह्यातील कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी, परिसरातील शेतकरी यावेळी उपस्थित होते.

**सार्वजनिक सूचना**
**सेवा गृह रिन लिमिटेड**

Sitara
A SEWA INITIATIVE

ही सूचना सर्वसामान्य जनता, ग्राहक, व्यावसायिक सहयोगी, ग्राहक, विक्रेते आणि सर्व संबंधित पक्षांना देण्यात येते की, सेवा गृह रिन लिमिटेडची शाखा, जे पहिला मजला, आसरा कॉर्पोरेट टॉवर, प्लॉट क्रमांक १, साई मंदिर रोड, टाकिया वॉर्ड, भंडारा, महाराष्ट्र- ४४१९०४ येथे स्थित आहे ते १ ऑगस्ट २०२५ पासून कायमची बंद केली जाईल.

आम्ही तुमची सेवा करण्यास वचनबद्ध आहोत आणि तुम्ही आमच्या सेवा www.sgrlimited.in या ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे मिळवू शकता किंवा कोणत्याही मदतीसाठी १८००-११-३९०९ वर आमच्याशी संपर्क साधू शकता.

प्रत्यक्ष मदतीसाठी, तुम्ही आमच्या जवळच्या पर्यायी शाखेला येथे भेट देऊ शकता: तिसरा मजला, ब्लॉक क्रमांक ३०३-बी, श्याम आर्केड, प्लॉट क्रमांक ५५, जुना बगडगंज लेआउट, टेलिफोन एक्सचेंज चौकाजवळ, दिघोरीकर चौक, नागपूर, महाराष्ट्र-४४०००८

कृपया लक्षात ठेवा की शाखा कार्यालये बंद करणे वगळता, कंपनीची इतर सर्व माहिती, ज्यामध्ये तिची कायदेशीर संस्था, व्यवसाय ऑपरेशन्स, संपर्क क्रमांक (टोल फ्री) ईमेल पत्ते आणि सर्व करारात्मक जबाबदाऱ्यांचा समावेश आहे, त्यात बदल नाही.

सर्व भागधारकांना विनंती आहे की त्यांनी या बदलाची नोंद घ्यावी आणि त्यानुसार त्यांचे रेकॉर्ड अपडेट करावेत.

तुमच्या सततच्या पाठिंब्याबद्दल आम्ही तुमचे आभारी आहोत आणि झालेल्या कोणत्याही गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

सेवा गृह रिन लिमिटेड
CIN: U65923DL2011PLC222491
कॉर्पोरेट कार्यालय: दुसरा मजला, श्री सावन नॉलेज पार्क, तुर्भे, नवी मुंबई, महाराष्ट्र - ४००७०५




# एक चुटकी सिंदूर की किमत' पाकीस्तानला समजली!

एक चिमूटभर कुंकवाची कींमत काय असते, हे पाकीस्तानला आता पुरेपूर समजले असेल. पाकला धडा शिकविणार असे बोलले जात होते, पण ते कधी? याचे उत्तर सरकारने अतिशय कठोरपणे दिले. भारतीय सैन्यदलाने अत्यंत नियंत्रित, योजनाबध्द, परिणामकारक हल्ले करून अतिरेक्यांना योग्य तो धडा शिकविला. यासाठी भारतीय लष्कराचे मनःपूर्वक अभिनंदन केलेच पाहिजे. संपूर्ण जगाला, सर्व माध्यमांना आणि देशालाही मॉक ड्रिल च्या बातमीत दंगवून ठेवून, कुठलीही पुसटशी शंका येऊ न देता ऑपरेशन सिंदूर यशस्वी करून दाखवले आहे. ज्या यंत्रणेला, व्यवस्थेला पहेलगामसाठी जबाबदार धरले, इंटलीजन्स फेल्यूर म्हणून टिका केली बहुतांश त्याच यंत्रणानी समन्वय साधून आत घुसून मारले आहे. अर्थात यातून पाकिस्तान धडा शिकेल असे होणार नाही. तसे असते तर फाळणी किंवा १९७१ च्या वेळीच पाकिस्तानने कारवाया थांबवल्या असत्या. मात्र, ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानसह पाक समर्थक देश ज्यात चीन आहे त्यांनाही सूचित केले आहे. विशेष म्हणजे रात्री एअर स्ट्राईक झालेल्या ऑपरेशन 'सिंदूर'च्या नावाचे लॉजिक बघा. पहेलगाम आतंकवादी हल्यात शहीद झालेले सर्व पुरुष होते. त्यामुळे आपल्या बहिणीचं सिंदूर पुसलं गेले. त्यामुळे या ऑपरेशनचं नावं 'सिंदूर' ठेवण्यात आलं. तसेच या ऑपरेशनला लीड केल ते म्हणजे विंग कमांडर आणि कर्नल ह्या दोघीही महिला अधिकारी. विंग कमांडर व्योमिका सिंह आणि कर्नल सौफिया कुरेशी होय. दिनांक सात मे बुधवार पहाट उजाडली ती ३घुसकर३ मारल्याच्या बातमीने. भारतीय वायूसेनेच्या शूर सैनिकांनी मध्यरात्री नंतर आणि पहाटेपूर्वी पाक व्याप्त काश्मीरसह पाकिस्तानात नऊ ठिकाणी जोरदार हल्ला केल्याची बातमी जगभर प्रसिद्ध झाली. पाकिस्तानातील भारत विरोधी कारवाया करणारी ठिकाण उध्वस्त करून जिहादी दहशतवादाविरुद्ध युद्ध असेच लढावे लागते असा संदेश जगाला दिला आहे. या हवाई हल्ल्याचे नाव ऑपरेशन सिंदूर ठेवून देशाच्या अंतर्गत आणि बाह्य शत्रूना नेमका इशारा दिलेला आहे. कपाळावर लावल्या जाणाऱ्या कुंकू, टिकलीचे अनन्य साधारण महत्व घुसून नऊ ठिकाणी हल्ले चढवून अधोरेखित केले आहे. पहेलगाम येथे पर्यटक म्हणून नव्हे हिंदू म्हणून गोळ्या मारून ठार करून कुंकू पुसले होते. ज्या हिंदू भगिनींचे कुंकू पुसले त्यांना ३मोदींना जाऊन सांगा३ असे सांगितले होते. दिनांक बावीस एप्रिल रोजी जिहादी हल्ला करून भारताला आव्हान दिले होते. दिनांक सात मे च्या पहाटे सुमारे शंभर किलोमीटर घुसून त्या आव्हानाला जोरदार प्रत्यत्तर दिले आहे. कुंकवाचे मोल पाकिस्तानसह जगाच्याही लक्षात आणून दिले आहे. सौभाग्यलंकार असलेले कुंकू ही हिंदूपणाची ओळख आहे. साजश्रृंगारत स्थान असलेल्या कुंकू ही अस्मिता आहे. त्या कुंकवार प्रहार करून जो कर सकते हो करो, उखाड लो असे सांगणाऱ्या जिहादला कुंकू कायमचे लक्षात राहिल असा तडाखा दिला आहे. या लढाईत दोषींना सोडायचं नाही आणि निरपराधांना मारायचं नाही ही भारतीय परंपरा आपल्या लष्करानं कायम राखली ही अभिमानास्पद बाब आहे. आपल्या छातीवर गोळ्या झेलून भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणा ?या भारतीय सैन्यदलावर प्रत्येक भारतीयाचा पूर्ण विश्वास आहे. आज तोच विश्वास सार्थ ठरवत, भारतीय हवाई दलाने मध्यरात्री दीडच्या सुमारास अतिरेक्यांच्या नऊ ठिकाणांवर यशस्वी एअर स्ट्राईक करून, पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला. या कारवाईत पाकिस्तानी नागरिक किंवा पाक लष्कराच्या कोणत्याही ठिकाणाला धक्का न लावता, अतिरेक्यांच्या नऊ लक्ष्यांवर अचूक आणि नियोजित हल्ला करण्यात आला. भारतीय सैन्याच्या या शौर्यपूर्ण कामगिरीचा संपूर्ण देशाला अभिमान आहे.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

भारताचे सार्वभौमत्व आणि नागरिकांची सुरक्षा अबाधित राखून तसेच पहलगाम हल्ल्याला योग्य प्रत्युत्तर देण्यात आले. ऑपरेशन सिंदूर हा भारतीय सेना आणि वायुसेनेच्या एकतेचा आणि सामर्थ्याचा दैदिप्यमान पुरावा आहे. कर्नल सोफिया कुरैशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांना पुढे आणून भारताने केवळ पाकिस्तानच्या द्वेष पसरवणाऱ्या शक्तींनाच नव्हे, तर देशातील मुस्लिम आणि शीख समाजाविरुद्ध द्वेष पसरवणाऱ्यांना सणसणीत उत्तर दिले आहे. ही खरोखर अभिमानास्पद आणि प्रेरणादायी घटना आहे, जी आपल्या देशाच्या अखंडतेचा आणि सर्वसमावेशकतेचा जयघोष करते.

देशातील जनता सरकारच्या पाठीशी ठाम उभी राहिली. सर्व राजकीय पक्ष देखील मतभेद विसरून मोदींच्या पाठीमागे उभे राहिले. केवळ माझा मुलगा नाही, तर कोणाचा मुलगा, भाऊ, पप्पा, काका किंवा नवरा इतर कोणीही नातेवाईक बॉर्डरवर देशाच्या रक्षणासाठी लढाईसाठी उभा असेल, तर त्यांना प्रोत्साहन मिळेल अशी वातावरण निर्मिती देशात उभी राहिली आहे. देश हितासाठी घेतलेल्या निर्णयाला समर्थन देतांनाच चुकीला चूक म्हणणं हे गरजेचे आहे. खरं तर अशाप्रकारे लपून-छपून केलेल्या पहलगाम हल्ल्याचे समर्थन कोणीही करू शकत नाही. खऱ्या अर्थाने हल्ल्यामध्ये शहीद झालेल्याना न्याय मिळणे गरजेचे होते.

भारत सरकारने घेतलेल्या निर्णयाचे स्वागतच केले पाहीजे. हे लक्षात ठेवावं की अशा प्रकारचे हल्ले किंवा अशा प्रकारे युद्ध हे देशांमध्ये पहिल्यांदा होत नाही. यापूर्वी सुद्धा युध्द झाले होते. त्यासाठी त्या त्या सरकारने सडेतोड उत्तर हे पाकिस्तानला प्रत्येक वेळा दिलेच? आहे. पण पाकिस्तान सुधारण्याचे नाव घेत नाही व त्याची किंमत त्यांना मोजावीच लागली. काहींनी या घटनेवरही राजकारण केले. कोण होते ते लोक? जे फेसबुक, ट्विटरवर बसून हिंदू-मुस्लिम करत होते, जे एका विशिष्ट धर्मावर बोट ठेवून समाजात जाणीवपूर्वक फूट पाडत होते, ते तुमच्या आमच्यातलेच आहेत. आपल्या कॉलनीत, व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये, ऑफिसमध्ये चेहऱ्यावर देशप्रेमाचा मुखवटा आणि मनात जातीय विखार ठेवणारे लोक देशाच्या दृष्टिकोनातून घातक ठरतात. आज आपल्यासारख्यांनी जर त्यांना ओळखलं नाही, तर उद्या आपलं मौनच देशासाठी घातक ठरेल.

धर्माच्या नावावर देश फोडण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना जोरात उत्तर दिले पाहिजे. कारण हल्ला दहशतवाद्यांनी केला होता, पण समाज तोडण्याचं काम या देशद्रोह्यांनी सुरू केलं होतं. परंतु जनतेनेच ओळखलं की, प्रथम देश व नंतर धर्माच्या बाता करू या. पाकिस्तानच्या विरोधात भारतीय विमानांनी घिरट्या घातल्या. पण आपल्या लेकीबाळी वैमानिक म्हणून काम करीत होत्या. त्यावेळी प्रचंड अभिमान वाटत होता. आपल्या भारताच्या लेकींनी कसे दिवस काढले, हे सर्वांनाच माहीत आहे.

जिला कपाळावर टिकली नाही म्हणून खिजवलं गेलं, जिला सर्वसामान्य जगणं, शिक्षण आणि समाजात काम करण्याची परवानगी देखील नाकारली गेलेली, जिला बायकांची अक्कल चुलीपुढेच म्हणून हिणवलं गेलं, जिला तिच्यावर होणाऱ्या बलात्कारासाठी तिलाच जबाबदार धरलं गेलं. आज त्याच लेकींनी रणांगणात भाग घेतला. महिलांनी जर का मनावर घेतलं तर त्या काहीही करू शकतात, या स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधींच्या प्रेरणेतून यापूर्वीच दिसले आहे.

भारतीय सेना दलाच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि विंगकमांडर व्योमिकासिंग यांनी ऑपरेशन सिंदूर बद्दल प्रेस कॉन्फरन्स घेतली. इंडियन एअर फोर्सने दहशतवादी अड्ड्यावर केलेल्या जाँबाज हल्ल्याची सविस्तर माहिती या दोघींनीच दिली, त्यावेळी संपूर्ण देशाला अभिमान वाटत होता.

पाकला जबरदस्त उत्तर देण्यासाठी केलेल्या हल्ल्याचे सिंदूर असे केलेले नामकरण वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे. समाज माध्यमातून व्यक्त होणारे पुरोगामी, सेक्युलर, लिबरल, न्यू - लेफ्ट, वोक माध्यमकर्मी, कलाकार, साहित्यिक आणि त्यांच्या नादी लागलेले या सिंदूर नावाची टिंगल करतील हे नक्की. युद्धसदृश्य हल्ल्याचे असे नाव असू शकते हे त्यांच्या बुद्धीला न झेपणारे आणि त्यांच्या विचारांना न पटणारे असल्यामुळे ते सिंदूर, कुंकू, टिकली याची खिल्ली उडवतील. पण, पहाटेच्या बातमीने सुखावलेले देशबांधव ऑपरेशन सिंदूरची उपयुक्तता जाणून आहेत.

आता देशातील नागरिक देखील जागृत झाले आहे. समाज माध्यमातून तेच एकमेकांना संदेश पाठवीत आहे व त्यात म्हणतात की, युद्धाच्या शक्यतेमुळे रजेवरचे सैनिक सीमेवर निघालेत. कोणत्याही प्रकारच्या वाहनात स्वतः उठून त्यांना बसू द्या. रिझर्वेशन म्हणजे मालकी नव्हे.

ते आहेत म्हणून मी आहे ही जाणीव असली तर हे नकळत घडेल. त्यांनी टॉयलेटजवळ, पायरीवर, दरवाजात वा पायदळी बसणं योग्य नाही. ते देशाचा अभिमान आहेत, रक्षक आहेत. तुम्ही बसायला द्या, ते तुम्हांला जगायला देतील. नंतर सीमेवर उभं रहायचंय म्हणून आत्ता बसू द्या. ट्रेन, बसपर्यंत जायला चालत असतील तर आपल्या गाडीत घ्या. तुम्हाला ते बसायला सीट देणार नाहीत. पण तुमच्यासाठी ते प्राण देतील. अशा प्रकारच्या संदेशाची देवाण-घेवाण सुरू झाली आहे.

■ ■ ■

## महाराजांचे ऑपरेशन सुरत आणि मोदिंचे ऑपरेशन सिंदूर

छ. शिवाजी महाराजांनी सुरतेवर केलेला हल्ला आणि आज भारताने सीमेजवळ पार पाडलेले ऑपरेशन सिंदूर या दोन्ही मध्ये विलक्षण साम्य आहे. मराठे सुरतेवर हल्ला करणार अशी आवई बहिर्जी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उठवून दिली आणि सुरतेत घबराट उडेल याची काळजी घेतली. या भीतीपोटी तेथील मोठ्या व्यापाऱ्यांनी त्यांची अफाट धनसंपत्ती सुरक्षिततेसाठी हलवून कुठे लपवून ठेवली आहे याची इत्यंभूत माहिती बहिर्जींनी गोळा करून ठेवली. त्यामुळे महाराजांच्या सैन्याने जेव्हा सुरतमध्ये प्रत्यक्ष प्रवेश केला, तेव्हा त्यांना हे धन कुठे लपवून ठेवले आहे हे अचूक माहिती होते आणि त्यांनी कमीतकमी वेळात आपले काम पूर्ण केले. गेले अनेक दिवस भारत हल्ला करणार या आवईने पाकिस्तानची भीतीने गाळण उडालेली संपूर्ण जगाने पाहिली, पण भारत प्रत्यक्ष हल्ला करतच नव्हता. मधल्या काळात या संभाव्य हल्ल्याच्या भीतीने बहुतेक सगळे दहशतवादी गट आणि बहुदा त्यांचे नेतेदेखील पाकिस्तानमधल्या त्यांच्या त्यांच्या मुख्यालयात पुढील तयारीसाठी जमा झाले. त्या सर्वांना तिथे पोहोचण्यासाठी पुरेसा वेळ देऊन मगच भारताने ऑपरेशन सिंदूर लॉन्च केले आणि कमीतकमी वेळात या दहशतवादी तळांचे जास्तीतजास्त नुकसान भारत करू शकला आहे. या सर्जिकल स्ट्राइकमध्ये काही कुप्रसिद्ध दहशतवादी गटांचे मुख्य तळ नष्ट झाले आहेत हे महत्त्वाचे. बाष्कळ बडबड करत, बढाया मारणाऱ्या असीम मुनीरचा इनायत खान झाला आहे. सुरतेचा सुभेदार आणि औरंगजेबाचा नातेवाईक असणाऱ्या इनायतखानाची तेव्हा जी अवस्था झाली होती, आज तीच गत पाकिस्तानची आणि मुनीरची झाली आहे. छत्रपतीशिवाजी महाराजांची रणनीती कोणाला अचूक कळली आहे हे सुज्ञांस सांगणे न लगे!

## भारतीय लष्कराला त्रिवार वंदन करायला हवं

ऑपरेशन सिंदूर या नावात निरपराधांच्या हत्येबाबतचा सगळा क्षोभ दडलेला आहे. जा, मोदीको बोल या दर्पोक्ती विरुध्दचा संताप लपलेला आहे. अतिरेक्यांनी ज्या निष्पाप महिलांचं जीवन उद्ध्वस्त केलं त्या महिलांच्या मनातला संताप त्यात आहे आणि त्यांच्या असीम दुःखावर एक हलकीशी फुंकरही त्यात आहे. ही कारवाई शस्वीपणे पार पाडणाऱ्या भारतीय लष्कराला त्रिवार वंदन करायला हवं.

या हल्ल्याच्या संदर्भात फेसबुकवरील एका पोस्टमध्ये अमिताभच्या दीवार चित्रपटातल्या एका डायलॉगची आठवण करुन देण्यात आली आहे. तुम मुझे धुंड रहे हो पीटर, ओर मै तुम्हारा यहां इन्तजार कर रहा हुं..... या अमिताभच्या बोलण्यातला सगळा राग, त्वेष आणि आत्मविश्वास लोकांना कमालीचा रुचला होता. भारतीय लष्काराने पाकिस्तानला गुंगारा देऊन जो हल्ला केला त्यात या संवादाची थोडी झलक नक्की जाणवेल.

मोदी, शहा, राजनाथ, डोवाल यांनी मॉक ड्रीलचं असं काही बेमालूम जाळं उभं केलं की त्यात पाकिस्तान सरकार आणि लष्कर साफ फसलं. अगदी आग्र्याच्या कैदेतून आजारपणाची बतावणी करत गोरगरिबांना फळं आणि मिठाई पाठवणा-या शिवरायांच्या राजनीतीची आठवण झाली. शत्रूला गुंगारा देणारं गेल्या अनेक वर्षातलं हे सर्वेत्तम उदाहरण ठरावं. रोजच्या हल्ल्याच्या भीतीने झोप उडालेल्या पाकिस्तानी सैनिकांचा मॉक ड्रीलच्या बातमीमुळे जरा कुठे डोळा लागला आणि भारतीय लष्कराने बरोबर डाव साधला. याला म्हणतात रणनीती आणि ती प्रत्यक्षात उतरवणाऱ्या जवानांचं कोशल्य! असाच, अमेरिकेसारख्या महाशक्तीला चकित करणारा हल्ला जपानने दुसऱ्या महायुध्दात केला होता. ७ डिसेंबर, १९४१ रोजी जपानच्या अनेक पाणबुड्या अचानक पर्ल हार्बर या अमेरिकेच्या नाविक तळासमोर जमल्या. जपानमधून निघून व संपूर्ण पॅसिफिक ओलांडून या पाणबुड्या व नौका तिथं पोहोचल्या होत्या. सकाळी सातच्या सुमारास या पाणबुड्यांनी व जपानी नौकांनी जोरदार हल्ला केला. या हल्यात अमेरिकेची १८० विमाने नष्ट झाली आणि २४०० सैनिक मारले गेले.

प्रत्यक्ष हल्ला होईपर्यंत अमेरिकेला त्याची थोडीही चाहुल लागली नव्हती. या हल्ल्यात पाकिस्तानी अतिरेक्यांचा म्होरक्या अझर मसूद याचं सगळं कुटुंब गारद झालं ही आणखी एक आनंदाची गोष्ट.

भारतात झालेल्या अतिरेक्यांच्या अनेक हल्ल्यांचा अझर हाच सूत्रधार होता. २४ डिसेंबर १९९९ रोजी झालेल्या IC 814 या इंडियन एअरलाईन्सच्या विमानाच्या अपहरणानंतर अतिरेक्यांनी ओलीसांच्या बदल्यात याच अझर मसूदची तुरुंगातून सुटका करुन घेतली होती. आज त्याच्या डोळ्यादेखत त्याच्या कुटुंबातले १४ जण हल्ल्यात ठार झाले. या नराधमाची अशीच अवस्था करीपर्यंत भारताने गप्प बसू नये हीच कोट्यवधी भारतीयांची इच्छा आहे. देशात काही विसंवादी सूर निघत असले तरी संकटाच्या काळात सगळा भारत एक होतो हा आपला नेहमीचा अनुभव आहे.

■ भगवान दातार

## कुंकवाचाचा आकार लहान, त्यातील शक्ती महान

आपली प्रतिकं, आपल्या अस्मिता, आपले भावविश्व याचे मोल जाणणारे ऑपरेशन सिंदूरचे स्वागत करून त्या सव्वीस जणांच्या सांडलेल्या रक्ताची बूज राखतील. ऑपरेशन सिंदूर हा युद्धज्वर नाही. ऑपरेशन सिंदूर हे पहेलगाम हल्ल्याने अस्वस्थ, दुःखी आणि संतापलेल्या संपूर्ण देशाच्या भावनांचे नियोजनबद्ध, संयमी आणि पिनपॉईंटेड असे प्रकटीकरण आहे.

या सगळ्यातून पुढे काय होणार? हे पहावे लागेल.

याचे परिणाम केवळ आशिया खंडापुरते मर्यादित रहाणार नाहीत. जगाला या ऑपरेशन सिंदूरचा अर्थ समजून घेऊन भारताने जिहादी दहशतवादाविरुद्ध मानवकल्याणासाठी दीर्घकाळ चालवलेल्या युद्धात सहभागी व्हावे लागेल. जगात शांतता, मानवता, विविधता, लोकशाही आणि प्रत्येकाची आपली प्रतिक, अस्मिता, मानचिन्ह टिकवायची असतील तर ऑपरेशन सिंदूरचे पूर्ण समर्थन याला पर्याय नाही.

एक चुटकी सिंदूर की किमत आता नऊ ठिकाणच्या हल्ल्यानंतर लक्षात आली असेल. कुंकू, टिकलीचा आकार लहान असला तरी, त्यात शक्ती आहे याचा प्रत्यय आला असेल. अर्थात, अखंड सावधान हवी. आपला परिसर सुरक्षित ठेवण्यासाठी यथाशक्ती पुढाकार हवा. सीमेवर लढणारे आणि घुसून मारणारे यांचे मनोबल उंचवण्याच्या प्रयत्नात आपला खारीचा वाटा हवा.

■ मकरंद मुळे

# घोड्यांच्या ट्रॅमचे युग समाप्त!

(कालच्या अंकावरून पुढे)

१९०७ साली ट्रॅमचे विद्युतीकरण झाले आणि ती किंग्ज सर्कल पर्यंत धावू लागली. तोपर्यंत ट्रॅमचे शेवटचे ठिकाण (टर्मिनस) दादरचे खोदादाद सर्कल होते. म्हणूनच ट्रॅम संपुष्टात येऊन इतकी वर्षे लोटली तरी खोदादाद सर्कलचे दादर टी. टी. हे नावं आजही कानावर येते; कारण दादर टी टी म्हणजे दादर ट्रॅम टर्मिनस होय. हे नाव आज ट्रॅम बंद पडली तरी वापरले जाते, नव्हे हेच नाव या भागाची ओळख आहे.

१२ डिसेंबर १९१० रोजी कुर्ला ते रे रोड दरम्यान हार्बर लाइन चालू झाली होती पण त्यात मुख्य त्रुटी म्हणजे ही लाइन रे रोड पर्यंतच होती, व्हिटी स्थानकाला जोडली नव्हती आणि विद्युतीकरणसुद्धा झाले नव्हते. तोपर्यंत प्रवाशांना रे रोड पासून बोरीबंदर अर्थात व्हिटीपर्यन्त अंतर कापण्यास याच ट्रॅम वापराव्या लागत.

३१ वर्षांत ससून डॉक, म्युझियम, वाडीबंदर, मध्य मुंबईत लालबाग, जेकब सर्कल, ताडदेव, ओपेरा हाऊस, ग्रॅंट रोड, जे.जे.हॉस्पिटल, धोबीतलाव, कर्नाक बंदर असे शहरभर ट्रॅमसेवेचे जाळे पसरले. आज जिथे माटुंग्याचे अरोरा चित्रपटगृह आहे, त्याच्यासमोर ट्रॅम संपत असे, तिथे एक अर्धवर्तुळाकार असा ट्रॅमचा मार्ग मुद्दाम ट्रॅमगाडीसाठी ठेवलेला असायचा, त्यावरून ट्रॅमचा चालक मोठ्या दिमाखाने ट्रॅम वळवून परतीच्या मार्गावर नेई आणि क्वचित आपल्या पायाखाली असलेला लोखंडी चकतीवजा टोल ठाण ठाण वाजवी.

ट्रॅमच्या या नव्वद वर्षांच्या इतिहासात मुंबई झपाट्यानं बदलली. वाढत्या औद्योगिकीकरणा बरोबरच विस्तारणाऱ्या मुंबई शहरात जलद प्रवासाच्या पर्यायाची मागणी पुढे येऊ लागली. ट्रॅमचा प्रवास वेळखाऊ आणि गैरसोईचा लोकांना वाटू लागला. ट्रॅम ताशी ५ किलोमीटर वेगाने धावत होती. शिवाय मोटारींसाठी ती अडचणीची ठरत होती. यामुळे जगभर ट्रॅमला पर्याय शोधण्याचे वारे वाहत होते. त्याऐवजी डिझेलवर चालणाऱ्या बस सेवेवर भर देण्यास सुरुवात झाली.

७ मे १९०७ रोजी सुरु झालेली विजेवर चालणारी ट्रॅम तारीख ३१ मार्च १९६४ पासून बंद करण्यात आली आणि जलद वाहतुकीसाठी बस गाड्यांना सर्वत्र रस्ते मोकळे झाले. पण तब्बल ९० वर्षं जिव्हाळ्याची ठरलेल्या ट्रॅमला मुंबईकरांनी वाजत गाजत निरोप दिला. शेवटची ट्रॅम बोरीबंदरहून दादरला रात्री दहा वाजता निघाली. तिला निरोप द्यायला प्रचंड गर्दी झाली होती. त्यामध्ये कंटक्टर होते बी.जी.घाटे. मुंबईकरांनी या कंडक्टरचे चक्क ऑटोग्राफ घेतले. एखाद्या कंडक्टरला असा मान पहिल्यांदाच आणि कदाचित शेवटचाच मिळाला असावा.

ट्रॅम बंद झाली आणि मुंबईकर हळहळला. ती अकरा नंबरची ट्रॅम तरी ठेवायला हवी होती. असं पुलं म्हणाले होते. सहा नंबरची ट्रॅम कुलाबा ते गिरगाव, फोरास रोडमार्गे धावत होती. खरंच ट्रॅमशी मुंबईकरांचं घट्ट नातं जोडलं गेलं होतं. एकेकाळी मुंबईची लाईफलाइन असलेल्या आणि पन्नास वर्षांपूर्वी इतिहासजमा झालेल्या ट्रॅमचे ट्रॅक हुतात्मा चौक परिसरात फेब्रुवारी २०१६ मध्ये खोदकाम करताना सापडले खरे, मात्र महापालिकेने नेमलेल्या कंत्राटदाराने सोमवारी सायंकाळी हे ट्रॅक सरळ उखडले.

हा प्रकार पाहून मुंबईचा जीव कळवळला. हे ट्रॅक आहे तिथेच जतन होऊ शकत होते, असे पुरातत्त्व विभागाचे म्हणणे असतानाही अत्यंत निर्दयीपणे हे ट्रॅक उखडून बेस्टच्या आणिक आगारातील म्युझियममध्ये जमा करण्यात आले. जगभरात नॅरो गेजच्या ट्रॅमसेवा आहेत, तर मुंबईत सापडलेले ट्रॅमचे ट्रॅक ब्रॉड गेजचे आहेत, जे जादा वीज खर्ची करणारे आणि प्रवासी क्षमता अधिकची असणारे असावेत. ट्रामचे हे रूळ १९६४ पूर्वीच उखडले जाणे अपेक्षित होते. मात्र काही कारणाने ते तसेच राहिले आणि मातीच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले, त्यावेळी ते जमिनीखाली गाडले गेले असावेत, असे मत या ठिकाणी उत्खनन करणाऱ्या निरीक्षकाने व्यक्त केले आहे.

ब्रिटिशकालीन मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे लोकप्रिय साधन म्हणून ट्रॅम ओळखली जायची. ससून डॉकपासून थेट किंग्ज सर्कलपर्यंत पसरलेल्या या ट्रामच्या जाळ्यापकी चार रूळ नुकतेच हुतात्मा स्मारक परिसरात रस्त्याचे काम चालू असताना सापडले. मात्र मुंबईतील ट्रॅमचे जाळे लक्षात घेता असे रूळ अनेक ठिकाणी आढळू शकतात.

यात ऑपेरा हाऊस, चनीरोड, गोल देऊळ, सीपी टँक, ताडदेव, बोरिबंदर- आत्ताचे मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस, जे.जे.रुग्णालय, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय आदी अनेक ठिकाणांचा समावेश आहे. येथील रस्त्यांवर खणल्यास तेथेही असे रूळ आढळू शकतात. मुंबईसारख्या शहरात सध्या वाहतुकीला पर्याय म्हणून ट्रॅम सुरू करणे शक्य नाही; पण ऐतिहासिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने संबंधित यंत्रणांनी पुढे यायला हवे. सध्या मुंबईतील बेस्टच्या आणिक आगारात जुन्या ट्रॅमचे मॉडेल आजही पहायला मिळते, हे उल्लेखनीयच!

---------------

एन. कृष्णकुमार जी. गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
9423714883.

■ ■ ■

वाचक लिहितात

## कॅटचा निर्णय स्वागतार्ह!

कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स( कॅट) या भारतातील व्यापाऱ्यांच्या एका प्रमुख संघटनेने पाकिस्तान सोबत व्यापार बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. देशभरातील ४०,००० पेक्षा अधिक व्यापारी संघटना आणि त्यांचे ९ कोटीहून अधिक सदस्य व्यापारी यांचे प्रतिनिधित्व करणारी कॅट ही अग्रगण्य संघटना आहे. त्यांनी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा निषेध व पाकिस्तान ला धडा शिकविण्याच्या उद्देशाने घेतलेला हा निर्णय स्तुत्य आहे. दहशतवादास खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तान ला सीमेवर उत्तर दिले जाईलच मात्र त्यासोबतच जनतेने त्यांच्या आर्थिक मुसक्या आवळणे हे देशांतर्गत प्रतिकाराचे नक्कीच प्रभावी पाऊल ठरेल, जेणेकरून कंगाल झालेला पाकिस्तान यापुढे भारतावर कोणताही हल्ला करण्याचा विचारही करणार नाही.

कॅट प्रमाणेच इतर क्षेत्रातही याचा विचार व्हायला हवा. सोबतच प्रत्येक नागरिकाने स्वतःचे वर्तमान सुरक्षित करण्यासाठी कट्टरपंथीयांसोबत चे सर्व आर्थिक व्यवहार बंद करणेच देशाच्याही सुरक्षेसाठी महत्वाचे पाऊल ठरेल. आतंकवादाला धर्म नसतो असे म्हणून क्रूर आतंकवादी आक्रमणाची पाठराखण करणाऱ्यांना खरेतर पोटातील भुकेला धर्म नसतो हे सत्य अनुभवायची वेळ आता आली आहे.

■ सौ. स्वाती हरेर, मुंबई.

## युद्धजन्य परिस्थितीत राजकीय पक्षांची जबाबदारी

सध्या देशात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपण सर्व भारतीय नागरिकांनी एकजूट दाखवण्याची गरज आहे. अशा संवेदनशील वेळी राजकीय पक्षांनी विशेषतः जबाबदारीने आणि संयमाने वागणं अपेक्षित आहे.

लोकशाहीमध्ये विरोधी मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे, पण जेव्हा देशाच्या सुरक्षेचा आणि जवानांच्या जीवनाचा प्रश्न उद्भवतो, तेव्हा पक्षभेद विसरून राष्ट्रहितासाठी एकसंघ भूमिका घेणं अत्यावश्यक ठरतं. माध्यमांमध्ये राजकीय पक्षांच्या काही निष्काळजी व उत्तेजक विधानांमुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण होतो व शत्रू राष्ट्रांना चुकीचा संदेश जातो.

राजकीय नेत्यांनी आपल्या वक्तव्यांमध्ये संयम बाळगावा, सोशल मीडियावर कोणतीही अपुरी किंवा अपप्रचार करणारी माहिती शेअर करू नये, आणि जनतेमध्ये विश्वास व शांती राखण्यासाठी प्रयत्न करावेत. या काळात पक्षीय राजकारण न करता, सरकारच्या आणि लष्कराच्या निर्णयांना पाठिंबा देणं ही खरी देशभक्ती ठरेल.

म्हणूनच विनंती आहे की सर्व राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या नेत्यांनी युद्धजन्य परिस्थितीत फक्त राजकीय नफा-तोटा न पाहता, देशाच्या एकात्मतेसाठी जबाबदारीने वागावं हेच सनातन परंपरा शिकवते.

■ हृषीकेश हरदास, वर्धा.

## भगवान नृसिंह अवतार म्हणजे अधर्मावर धर्माचा विजय!

भगवान विष्णूचा प्रत्येक अवतार हा दुष्ट प्रवृत्तींचा नाश करण्यासाठीच असतो. ११ मे रोजी भगवान विष्णूच्या चौथ्या अवताराची नृसिंह जयंती आहे. हिरण्यकश्यपूला वाटायचं,' मीच ईश्वर आहे ,सर्वांनी माझंच नाव घ्यावं ',पण त्याचाच मुलगा भक्त प्रल्हाद हा विष्णुभक्त होता. जळी, स्थळी,काष्ठि, पाषाणी ईश्वर आहे. अशी त्याची श्रद्धा होती. पण हिरण्यकश्यपूला ते मान्य नव्हते. त्याच्यातला अहंकार, राक्षसी प्रवृत्ती इतकी वाढली होती की, त्याने स्वतःच्याच मुलाचा छळ केला. त्यासाठी भगवंताला नृसिंह अवतार घेऊन त्याचा नाश करावा लागला. जेव्हा जेव्हा अधर्म वाढतो ,तेव्हा तेव्हा धर्माच्या स्थापनेसाठी आणि सज्जनांच्या रक्षणासाठी प्रत्येक युगात ईश्वर अवतार घेतो असे श्रीकृष्ण वचन आहे .आज सर्वत्र अनाचार, अत्याचार, अधर्म वाढलेला दिसतो आहे ,दुष्ट प्रवृत्तींची आक्रमणे वाढलेली आहेत. पहलगाम हे त्याचे उदाहरण आहे. यासाठी, 'हे ईश्वरा खरंच अवतार घे !आणि तुज्या वाचनाप्रमाणे धर्माची संस्थापना आणि सज्जनांचे रक्षण कर आणि नांदू दे शांती या भारत वर्षात'.

■ सौ. रमा देशमुख

## ॲव्होकॅडो व्यतिरिक्त अन्य सुपरफूड्स



आजच्या धावपळीच्या जीवनात स्वतःसाठी वेळ काढणे खूप कठीण झाले आहे. याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. आपले शरीर निरोगी ठेवण्यासाठी अनेक प्रकारचे फळं आणि भाज्या खात असतो. आजकाल ॲव्होकॅडोपासून बनवलेल्या गोष्टी खाण्याचा ट्रेंड खूप वाढला आहे. पण सर्वांनाच ॲव्होकॅडो आवडत नाही आणि ते महाग देखील असते. अहव्होकॅडो व्यतिरिक्त तुम्ही आहारात इतर फळांचा देखील समावेश करू शकता.

ॲव्होकॅडो हे असे एक फळ आहे ज्यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी, ई, बी6 आणि अँटीऑक्सिडंट्स तुमच्या त्वचेसाठी आणि केसांसाठी फायदेशीर ठरते. तुम्ही अहॅव्होकॅडो हे फळ टोस्टवर ठेवून किंवा त्यांचे सँडविच बनवून खाऊ शकता. जरी अहव्होकॅडो हे पोषक तत्वांचे भांडार असले तरी, काही पदार्थांमध्ये त्यापेक्षा जास्त पोषक तत्वे असतात.

जर तुम्हाला अहॅव्होकॅडो आवडत नसेल, तर काही सुपरफूड्स खावू शकता, जे ॲव्होकॅडोपेक्षा आरोग्यासाठी अधिक पौष्टिक आणि फायदेशीर असू शकतात.

### लिंबूवर्गीय फळे कोलेजन वाढवतील

१०० ग्रॅम ॲव्होकॅडोमध्ये फक्त १० मिलीग्राम व्हिटॅमिन सी असते, तर लिंबू, संत्री,मोसंबी, द्राक्षे आणि किवी यांसारख्या लिंबूवर्गीय फळांमध्ये ५३ ग्रॅम व्हिटॅमिन सी असते. लिंबूचे पौष्टिक मूल्य ॲव्होकॅडोपेक्षा जास्त आहे. म्हणून, आहारात लिंबाचा अनेक प्रकारे समावेश करू शकता. हे त्वचेसाठी देखील फायदेशीर आहेत आणि कोलेजन वाढवण्यास देखील मदत करतात.

### हिरव्या पालेभाज्या

१०० ग्रॅम ॲव्होकॅडोमध्ये १६० कॅलरीज असतात. तर हिरव्या पालेभाज्या पालकामध्ये २३ कॅलरीज असतात. ज्यामुळे वजन वाढण्याची समस्या कमी होते. पालक हा ॲव्होकॅडोपेक्षा स्वस्त आहे, म्हणून आहारात पालकाचा समावेश केला पाहिजे.

### दुग्धजन्य पदार्थ

१०० ग्रॅम ॲव्होकॅडोमध्ये सोडियमचे प्रमाण फक्त ७ ग्रॅम असते, तर दूध, दही, चीज यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांमध्ये ४४ ग्रॅम सोडियम असते जे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते.

### टोमॅटो कोलेजन वाढवण्यासाठी प्रभावी

१०० ग्रॅम टोमॅटोमध्ये १८ कॅलरीज असतात, जे कोलेजन वाढवण्यास मदत करते,

### चिया बियाणे

१०० ग्रॅम अळशीच्या बियांमध्ये १८ ग्रॅम प्रथिने असतात. आहारात अळशीच्या बियांचा अनेक प्रकारे समावेश करू शकता.

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### आता नाही थांबायचं!

मनात येईल तेंव्हा<br>
नक्षली घुसती सरहद्दीत<br>
जीव घेतलाय यांनी<br>
जवानांचे अगणित

संयमी शासन आमचे<br>
निषेध खलीता पाठवतयं<br>
शहीद म्हणुन जनतेच्या<br>
भावनेला खत पाणी घालतय..

बंदुकीची देतात सलामी<br>
विर पत्नीला रोख निधी<br>
रक्त यांचं खवळत नाही<br>
बदला हे घेणार कधी ?..

# भारतातील 30-गीगावॅट निवासी छतावरील सौर बाजारपेठ वेगाने वाढवण्यासाठी हस्क कंपनी BEEM ने सुरुवात केली

**मुंबई, ८ मे :** आज, हस्कने भारतासाठी समर्पित निवासी छतावरील सौर सेवा BEEM लाँच करण्याची घोषणा केली, जी अतुलनीय ग्राहक सेवा आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान देते. हस्कच्या पूर्ण मालकीचा व्यवसाय असलेला BEEM देशभरातील घरमालकांना लक्ष्य करेल, सौर यंत्रणेची रचना, तंत्रज्ञानातील नवोपक्रम, स्थापना आणि सेवेतील हस्कच्या जवळजवळ दोन दशकांच्या कौशल्याचा फायदा घेईल.

BEEM ची पूर्णपणे उत्पादनक्षम ऑफरिंग घरमालकांच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेली आहे. योग्य सिस्टम आकारमानापासून ते कस्टमाइज केलेल्या स्पेसच्या वापरापर्यंत, जनरेशन डेटापर्यंत, BEEM घरमालकांना त्यांच्या विशिष्ट वापरासाठी प्रीमियम ऑफरिंगची श्रेणी देते. ग्राहक त्यांच्या गरजा सहजपणे समजून घेऊ शकतात, उत्पादन अंतिम करू शकतात आणि खरेदी व स्थापना बुक करू शकतात - पूर्णपणे ऑनलाइन आणि पूर्णपणे दूरस्थपणे. BEEM दोन प्रारंभिक उत्पादने ऑफर करते, ऑरा आणि एटर्निया, ज्यामध्ये भारतातील बहुतेक भागात प्रचलित असलेल्या सपाट छतांसाठी उपाय समाविष्ट आहेत. याव्यतिरिक्त, त्याच्या भागीदारांद्वारे, BEEM आकर्षक कमी किमतीचे वित्तपुरवठा पर्याय ऑफर करते आणि अनुदान व नेट मीटरिंगसाठी व्यापक समर्थन देऊ करते.




पीएम सौर घर योजने अंतर्गत, भारत सरकारने (भारत) १ कोटी घरांसाठी सौरऊर्जेचे लक्ष्य ठेवले आहे, ज्यामध्ये २०२७पर्यंत एकूण ३० गीगावॅट (जीडब्ल्यू) स्थापना अपेक्षित आहे. २०२४ मध्ये योजना सुरू होईपर्यंत, लक्षणीय आगाऊ गुंतवणूक, विश्वासार्ह पुरवठादारांना सोर्स करण्यात अडचण, उत्पादनाच्या फिटिंगबद्दल निर्णय घेण्यातील जटिलता यामुळे निवासी सौरऊर्जा मंदावली होती, तर संभाव्य खरेदीदारांसाठी स्थापना, किंमत, प्रक्रिया आणि गुणवत्ता हमी असे कमी अडथळे आले.

पंतप्रधान सौर घर योजना वीज प्रकल्पांच्या स्थापनेसाठी अनुदान देण्यासाठी एक सोपी अर्ज प्रक्रिया प्रदान करते, जेणेकरून दरमहा पहिले ३०० किलोवॅट प्रति तास मोफत मिळेल, १५ दिवसांत लक्षित वितरणासह, तसेच क्रेडिट स्कोअरची आवश्यकता नसताना ७% पर्यंत बँक कर्जेदेखील मिळतील. भारत सरकारने आधीच जागरूकता मोहिमांमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे आणि निवासी सौरऊर्जेच्या वापराला पाठिंबा देण्यासाठी ती गुंतवणूक तिप्पट करण्याची अपेक्षा आहे.

BEEM चा एआय-सक्षम डिजिटल प्लॅटफॉर्म पूर्णपणे सौरऊर्जेकडे वळण्याचा घरमालकांचा प्रवास सुलभ करतो, ज्याप्रमाणे १५ वर्षांपूर्वी आयफोनने मोबाइल व्यवसायामध्ये क्रांती घडवली होती असे हस्कचे सीईओ आणि सह-संस्थापक मनोज सिन्हा म्हणाले. आणि हस्क तिथेच थांबत नाही. आम्ही भारतातील वितरित ऊर्जा क्षेत्राला व्हर्च्युअल पॉवर प्लांट्स (VPP) मध्ये विकसित करण्यासाठी BEEM चा वापर करू जे ऊर्जा परिसंस्थेचे लोकशाहीकरण करेल आणि ऊर्जा उत्पादन व व्यापार लोकांच्या हातात देईल.

## जगभरात ६४ दशलक्षाहून अधिक लोक हृदयविकाराने ग्रस्त आहेत



**अमरावती ८ मे :** जगभरात अंदाजे ६४ दशलक्ष लोक हृदयविकाराने ग्रस्त आहेत, ज्यामुळे ही एक गंभीर जागतिक आरोग्य समस्या बनली आहे. भारतात, जिथे दरवर्षी सुमारे १८ लाख लोक हृदयविकाराच्या झटक्याने रुग्णालयात दाखल होतात, तिथे परिस्थिती आणखी चिंताजनक आहे. अनेक लोकांना हे माहित नसते की त्यांना हृदयविकार आहे कारण त्याची अनेक सामान्य लक्षणे, जसे की थकवा जाणवणे आणि श्वास घेण्यास त्रास होणे, बहुतेकदा वृद्धत्वाची सामान्य लक्षणे समजली जातात. कधीकधी लोक ही लक्षणे टाळण्यासाठी त्यांची दैनंदिन दिनचर्या बदलतात - जसे की पायऱ्यांऐवजी लिफ्ट घेणे, जास्त उशा घेऊन झोपणे किंवा आवडत्या खेळांपासून दूर राहणे.

व्हेरिटास मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे वरिष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अक्षय ढोरे स्पष्ट करतात: हृदयविकाराने ग्रस्त असलेल्या अनेक रुग्णांना वेळेवर, अचूक निदान आणि उपचारांचा खूप फायदा होऊ शकतो. जेव्हा हृदय कमकुवत होते तेव्हा शरीराच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना अधिक काम करावे लागते - म्हणूनच असे रुग्ण अनेकदा थकव्याची तक्रार करतात. हृदयरोगतज्ज्ञ वेळेवर रोगाचे निदान करू शकतात आणि उपचार सुरू करू शकतात जेणेकरून रुग्ण चांगले जीवन जगू शकतील.

काही गंभीर प्रकरणांमध्ये रुग्णाला एका विशेष उपकरणाची आवश्यकता असते - कार्डियाक रीसिंक्रोनायझेशन थेरपी (CRT). सीआरटी हे एक असे उपकरण आहे जे हृदयाच्या खालच्या दोन भागांना (व्हेंट्रिकल्स) अशा प्रकारे कार्य करण्यास मदत करते की ते शरीराभोवती रक्त चांगले पंप करू शकतात आणि रुग्ण त्याचे दैनंदिन जीवन सामान्यपणे जगू शकतो. हे उपकरण हृदयाच्या ठोक्यांशी संबंधित माहिती देखील रेकॉर्ड करते. त्या माहितीच्या आधारे, डॉक्टर रुग्णाच्या गरजेनुसार उपकरणाच्या सेटिंग्ज समायोजित करू शकतात.

डॉ. अक्षय ढोरे स्पष्ट करतात: वैद्यकीय तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे, रुग्णांना आता योग्य उपचार सहज मिळू शकतात. सीआरटी लागू करण्याची प्रक्रिया फारशी क्लिष्ट नाही. उपकरणाच्या सेटिंग्ज योग्यरित्या समायोजित करून, हृदयाची पंपिंग क्षमता सुधारता येते, ज्यामुळे रुग्ण लवकर बरा होतो आणि तो सामान्य जीवन जगू शकतो. व्हेरिटास मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये, डॉक्टर रुग्णांची संपूर्ण तपासणी आणि समग्र उपचारांवर लक्ष केंद्रित करतात. ते खात्री करतात की रुग्णांना त्यांच्या थेरपीची पूर्ण समज आहे आणि ते स्वतःसाठी आणि त्यांच्या प्रियजनांसाठी योग्य निर्णय घेऊ शकतात.

## टायटन वर्ल्डच्या देशभरातील सर्व स्टोर्समध्ये मदर्स डेच्या निमित्ताने मिळवा परफ्यूम - मेकिंग अनुभव

**नागपूर, ८ मे :** आठवणींना उजाळा देण्याची शक्ती सुगंधामध्ये असते, अनेक व्यक्तींसाठी आईचा खास सुगंध सर्वात जास्त आल्हाददायक व मनाला निवांत करणारा असतो. यंदाच्या मदर्स डेच्या निमित्ताने टायटन वर्ल्ड तुम्हाला देत आहे एक अनोखी संधी, आपल्या आईसोबतचे नाते अधिक दृढ करण्याची, तिला असे गिफ्ट द्या जे तिच्या कायम स्मरणात राहील, असा परफ्यूम जो आईच्या प्रेमासारखाच कालातीत असेल. अतिशय विचारपूर्वक निवडलेल्या आणि निर्माण केलेल्या इन-स्टोर अनुभवाच्या माध्यमातून आईसोबतच्या नात्याचा आनंद साजरा करा. १० आणि ११ मे, २०२५ रोजी भारतभरातील १६३ पेक्षा जास्त टायटन वर्ल्ड स्टोर्समध्ये परफ्यूम-मेकिंग ॲक्टिविटीचे आयोजन केले जाईल. आपल्या ग्राहकांना त्यांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या व्यक्तीसोबत - आईसोबत संस्मरणीय क्षण निर्माण करता यावेत यासाठी ही ॲक्टिविटी डिझाईन करण्यात आली आहे.

या ॲक्टिवेशनबद्दल, टायटन कंपनी लिमिटेडचे वॉचेस अँड वेयरेबल्स विभागाचे व्हाईस प्रेसिडेंट आणि चीफ सेल्स अँड मार्केटिंग ऑफिसर, श्री राहुल शुक्ला म्हणाले, टायटनमध्ये आम्ही नेहमीच अशी नाती निर्माण करण्यावर भर देतो जी सर्वात जास्त महत्त्वाची असतात. या अनोख्या परफ्यूम-मेकिंग अनुभवातून आम्ही खऱ्या अर्थाने वैयक्तिक आणि हृदयस्पर्शी असे काही देऊ इच्छितो, आमच्या ग्राहकांना त्यांच्या आईसाठी फक्त गिफ्ट नव्हे तर संस्मरणीय आठवण निर्माण करण्याची संधी देत आहोत.

टायटन वर्ल्ड स्टोर्समध्ये विशेष झोन तयार केले जातील, याठिकाणी एक्स्पर्ट फॅसिलिटेटर्स ग्राहकांना सुगंध निर्माण करण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करतील. सेन्ट प्रोफाइल समजून घेण्यापासून स्वतःच्या अनोखी कॉम्बिनेशन्सचे मिश्रण करण्यापर्यंत सर्व गोष्टींचे मार्गदर्शन केले जाईल.

हे कस्टमाइज्ड परफ्यूम एका परफ्यूम बॉटलमध्ये भरून ग्राहक स्वतःसोबत नेऊ शकतील, मदर्स डेसाठी ही एक सर्वोत्तम भेट ठरू शकेल. सोमलवाडा स्टोरमध्ये या आणि इन-स्टोर सेलिब्रेशन्सचा आनंद अनुभवा.

## आचार्य उपेन्द्रजी यांच्या नेतृत्वाखाली भारताला विश्वगुरु बनविण्यासाठीचा ऐतिहासिक महासोहळा

**मुंबई, ८ मे :** अंतर योग फाउंडेशन एक पवित्र आणि परिवर्तनात्मक आध्यात्मिक चळवळ गणेश विद्या महायज्ञ आयोजित करत आहे. हा एक ऐतिहासिक महासोहळा असून भारताला विश्वगुरु बनविण्याच्या दिशेने टाकलेले एक महान पाऊल आहे. महायज्ञ सोहळा रविवारी, ११ मे २०२५ रोजी, सकाळी ७.३० ते रात्री १०.३० दरम्यान ,सिडको एक्झिबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे आचार्य उपेन्द्रजी यांच्या नेतृत्वाखाली तो संपन्न होत आहे. अंतर योग गणेश विद्या महायज्ञ कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे.

अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी भेट द्या:

https://ganeshvidya.antaryogfoundation.in

आयुष्यभरात कधीही न विसरण्यासारखा असा हा अत्यंत दिव्य असा अनुभव असून यामध्ये सामूहिक रित्या श्री गणेशाच्या ५ कोटी बीज मंत्रांचा जप आणि २ लाख वैयक्तिक जप साधना पूर्ण करून, आचार्य उपेन्द्रजी व जगभरातील अंतर योग साधकांनी येणाऱ्या काळातील संकटांपासून भारताचे रक्षण करण्याचा संकल्प केला आहे. या अद्वितीय यज्ञामध्ये आचार्यजी दुर्मिळ आध्यात्मिक साधनांच्या माध्यमातून उपस्थितांना त्यांच्या जीवनातील अडथळे दूर करण्यासाठी, अमाप धन व यश मिळविण्यासाठी आणि आजारांपासून त्वरित मुक्ती मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमात राजकारण, उद्योग, अध्यात्म या क्षेत्रातील मान्यवर पाहुणे आणि हजारो साधक उपस्थित राहणार आहेत. जगभरातील साधक ऑनलाइन स्ट्रिमिंगद्वारे या कार्यक्रमात सहभागी होऊ शकतील.

आचार्य उपेन्द्रजी यांच्या दृढ श्रद्धेनुसार आणि महर्षी अगस्त्यांनी २००० वर्षांपूर्वी नाडी ज्योतिषामध्ये केलेल्या भविष्यवाणीनुसार, हा कार्यक्रम उपस्थित आणि दूरदृष्टी असलेल्या आत्म्यांमध्ये गहन परिवर्तन घडवून आणणारा आहे.

साधकांना मानसिक व भावनिक स्वास्थ्यात सकारात्मक बदल, अंतर्गत धैर्य, कौटुंबिक सौहार्द, समृद्धीची अनुभूती मिळणार असून ४८ दिवसांत मनोकामना पूर्ण होण्याचा अनुभव येणार आहे.

कार्यक्रमात आचार्य उपेन्द्रजी लिखित, गणेश अथर्वशीर्षावरील जगातील सर्वात मोठ्या आणि सखोल विश्लेषणात्मक पुस्तकाचे प्रकाशन करणार आहेत. हे पुस्तक आयुष्यात एक शक्तिशाली मार्गदर्शक ठरेल.

विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्ती, लक्ष, सर्जनशीलता आणि शैक्षणिक यशासाठी तृतीय नेत्र जागृतीसाठी दुर्मिळ सरस्वती साधना केली जाणार आहे.

उपस्थितांना गणेश पूजा, अभिषेक, शक्तिशाली मंत्रजप व गणपती अथर्वशीर्ष सहस्रावर्तन अनुभवता येणार आहे. दुर्गा सप्तशती बीज मंत्र महायज्ञदेखील यावेळी पार पडणार आहे. तो शक्ती, संपत्ती व ज्ञान एकत्रितपणे आकर्षित करतो.

कार्यक्रमाचा समारोप शिव साधनेने होईल. ही दुर्लभ साधना स्वतःमधील रोगनिवारण शक्तीला जागृत करून मानसिक तणाव, चिंता आणि दीर्घकालीन आजारांवरसुद्धा त्वरित उपचार करते.



या कार्यक्रमाचे सहभागी होणारे भक्त निश्चितच एकाग्रता, स्मरणशक्ती व निर्णयक्षमता यामध्ये लक्षणीय वाढ अनुभवतील. त्यांना नकारात्मक ऊर्जा, अनपेक्षित अडथळे आणि ग्रहदोषांपासून दैवी संरक्षण मिळेल. शारीरिक आणि मानसिक आरोग्यातही ठळक सुधारणा दिसून येईल, असे आचार्य उपेन्द्रजी म्हणाले.

अंतर योग गणेश विद्या महायज्ञ हे एक वैश्विक निमंत्रण आहे. जीवनात आध्यात्मिक जागृती साधण्याचे, आगामी संकटांपासून संरक्षण मिळवण्याचे आणि यश व समृद्धीकडे वाटचाल करण्यासाठीचे हे आमंत्रण आहे. सर्वांना या जीवनात परिवर्तन घडवणाऱ्या अद्वितीय कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी हार्दिक आमंत्रण आहे.

## दम्याच्या ७० टक्के रुग्णांचे निदान होतच नाही

**नागपूर, ८ मे :** असंसर्गजन्य आजार (एनसीडी) शी संबंधित मृत्यूंमध्ये दमा आणि इतर जुनाट श्वसन रोग हे प्रमुख तीन कारणांपैकी एक आहेत, जे देशभरातील एकूण मृत्यूंपैकी निम्मे आहे. ४ तरीही, दम्याची गंभीर लक्षणे असलेल्या अंदाजे ७०% व्यक्तींचे निदान झालेले नाही, आणि २.५% पेक्षा कमी लोक दररोज इनहेल्ड कॉर्टिकोस्टिरॉईड्स वापरतात, जे सहसा व्यापक कलंक आणि गैरसमजांमुळे शिफारस केलेले उपचार आहे.या आव्हानांचा सामना करण्यासाठी दीर्घकालीन, सहयोगी दृष्टीकोन आवश्यक आहे जो जागरूकता, शिक्षण आणि उपलब्धता यांचे एकत्रीकरण करते. सिप्लाचा बेरोक जिंदगी हा गेल्या अर्ध्या दशकाहून अधिक काळापासून सुरू असलेला आणि टफीज यासारख्या सार्वजनिक कँपेन, कंपनीच्या ब्रीदफ्री उपक्रमासह - ज्याने आर्थिक वर्ष २४-२५ मध्ये १ कोटींहून अधिक लोकांचे जीवन जगले आहे, दम्याबद्दल माहितीपूर्ण संभाषणे वाढविण्यास मदत करत आहेत तसेच रुग्णांना सतत आधार देत आहेत.

इनहेलेशन थेरपीचे महत्त्व आणि सुलभ उपचारांच्या गरजेवर जोर देऊन, जागतिक दमादिनी सल्लागार पल्मोनोलॉजिस्ट डॉ. विक्रम एम. राठी, नागपूर, म्हणाले की, दम्याच्या व्यवस्थापनाची प्राथमिक उद्दिष्टे म्हणजे लक्षणे नियंत्रित करणे, बचाव औषधांवरील अवलंबित्व कमी करणे, रुग्णालयात दाखल होण्यापासून रोखणे आणि फुफ्फुसांचे कार्य राखणे - शेवटी जीवनाची गुणवत्ता सुधारणे हे उद्दिष्ट आहे. हे परिणाम साध्य करण्यासाठी वेळेवर निदान करणे, योग्य इनहेलरचा वापर आणि सातत्यपूर्ण अनुपालन आवश्यक आहे.

डॉ राठी म्हणाले की, भारतात दम्याबद्दल मोठ्या प्रमाणात गैरसमज आहेत. इनहेलरच्या वापराविषयीच्या गैरसमजांमुळे आणि त्या आजाराचे नाव न सांगण्याची अनिच्छा यामुळे अनेकदा निदान आणि उपचारांमध्ये विलंब होतो. अशावेळी डॉक्टरांना उपचार करणेही कठीण होते. बेरोक जिंदगी सारख्या जागरूकता कँपेन आणि टफीज की स्कूल यात्रा यासारखे उपक्रम राबवून तळागाळातील प्रयत्न अचूक माहिती देण्याचे काम केले जात आहे.

## गौरव चोप्राचे ५ वर्षांनी टीव्हीवर पुनरागमन

**मुंबई, ८ मे :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेतील हृदयस्पर्शी आणि आपल्या जीवनाशी सुसंबद्ध कथानकामुळे प्रेक्षकांना ही मालिका भावली आहे. या मालिकेत आता सुपरिचित अभिनेता गौरव चोप्राची एंट्री होणार आहे. प्रोफेसर राजवीर शास्त्री या चाणाक्ष, काहीशा विक्षिप्त कायद्याच्या प्राध्यापकाच्या रूपात तो दिसणार आहे. कोर्टात दमदार स्वरूपात वकिली करण्याबद्दल तो ओळखला जातो. एका नवीन लक्षवेधी अध्यायात, प्रोफेसर राजवीर शास्त्रीच्या एंट्रीने कथानकाला एक नाट्यमय वळण मिळते.एकेकाळचा कायद्यात तज्ज्ञ असलेला प्रोफेसर शास्त्री आता कडवट आणि शंकेखोर झाला आहे. कोर्टात उत्कृष्ट युक्तिवाद करणाऱ्या आणि आकर्षक व्यक्तिमत्वाच्या राजवीरची कारकीर्द एका घोटाळ्यामुळे नष्ट झाली आहे. त्याचा व्यावसायिक नावलौकिक तर त्यात धुळीचा मिळालाच, पण त्याच्या व्यक्तिगत जीवनाला देखील त्याची झळ लागली. त्याचा विवाह आणि मुलीशी असलेला बॉन्ड देखील संपुष्टात आला. फसवणुकीचा आणि पश्चात्तापाचा बळी ठरलेला राजवीर राग आणि दारूच्या मागे आपल्या मनातील वेदना लपवत असतो. आपली माणसे आणि कायदा प्रणाली या दोन्हीवरून त्याचा विश्वास उडालेला आहे. पण, जेव्हा पुष्पा त्याच्या आयुष्यात येते, तेव्हा परिस्थिती बदलू लागते. पुष्पा ही अढळ सकारात्मकता आणि आशेचे मूर्तिमंत रूप आहे. पुष्पाची अपार ऊर्जा राजवीरच्या हरलेल्या उत्साहाला आव्हान देते आणि या दोन विसंगत दिसणाऱ्या व्यक्तींमध्ये एक दमदार आणि भावनात्मक नात्याचा मार्ग खुला होतो.

# ॲक्सिस मॅक्स लाइफ इंडिया प्रोटेक्शन कोशंट ७.०

**नागपूर, ८ मे :** ॲक्सिस मॅक्स लाइफ इन्शुरन्स लि. पूर्वीची मॅक्स लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ने कंटार या जगातील आघाडीच्या मार्केटिंग डेटा आणि विश्लेषण कंपनीच्या मदतीने पार पाडलेल्या आपल्या मालकीच्या इंडिया प्रोटेक्शन कोशंट सर्व्हे (आयपीक्यू) च्या सातव्या सर्वेक्षणाचे निकाल जाहीर केले आहेत. या सर्वेक्षणाद्वारे २५ भारतीय शहरांमधील ६३६० घरांमध्ये सर्वेक्षण केले असून त्यातून आर्थिक संरक्षणाबाबत शहरी भारताची नस समजून घेतली गेली आहे.

ॲक्सिस मॅक्स लाईफ भरोसा टॉक्स या कथेअंतर्गत इंडिया प्रोटेक्शन कोशंट ७.० आणत आहे. यातून भारताच्या विकसित होत असलेल्या आर्थिक आणि संरक्षण मानसिकतेवर प्रकाश टाकला जाईल. या प्लॅटफॉर्मद्वारे ॲक्सिस मॅक्स लाईफचे उद्दिष्ट शहरी, ग्रामीण, पगारदार, गिग कामगार आणि निवृत्त लोकसंख्येतील खरे आवाज समजून घेणे हे आहे. ते भारताची जनता संरक्षण, नियोजन आणि दीर्घकालीन सुरक्षिततेकडे कोणत्या दृष्टीकोनातून पाहते याबद्दल प्रामाणिक माहिती देते. काळाच्या ओघात आर्थिक चिंता बदलत असताना आणि आकांक्षा विकसित होत असताना भरोसा टॉक्स उद्योग, नियामक आणि धोरणकर्त्यांसाठी ग्राहकांचे बदलते प्राधान्यक्रम समजून घेण्यासाठी एक महत्त्वाचा आधार म्हणून काम करेल.

आयपीक्यू ७.० नुसार, शहरी भारतातील संरक्षण गुणांक ४८ वर पोहोचला आहे, जो २०१९ मध्ये ३५ होता, जो देशाच्या आर्थिक तयारीत सतत प्रगती दर्शवितो. जीवन विम्याची मालकी सर्वकालीन उच्चांकावर पोहोचली आहे, ७८% शहरी भारतीयांकडे एक किंवा अधिक उत्पादने आहेत, तर ज्ञान निर्देशांक दोन अंकांनी वाढून ६३ वर पोहोचला आहे, जो जीवन विम्याबद्दल जागरूकता आणि समज वाढल्याचे दर्शवितो.

आयपीक्यू ७.० मध्ये महानगरांमध्ये जीवन विम्याच्या मालकीमध्ये तीन गुणांनी वाढ (आयपीक्यू ६.० मधील ८३ वरून आयपीक्यू ७.० मध्ये ८६) आणि आर्थिक सुरक्षिततेची भावना सुधारल्यामुळे (आयपीक्यू ६.० मधील ६९% वरून आयपीक्यू ७.० मध्ये ७१%) संरक्षण निर्देशांकात ३-अंकी वाढ दिसून आली आहे. टियर-१ शहरांमध्ये नॉलेज इंडेक्स (आयपीक्यू ६.० मधील ५८ वरून आयपीक्यू ७.० मध्ये ६२), लाइफ इन्शुरन्स ओनरशिप (आयपीक्यू ६.० मधील ७३% वरून आयपीक्यू ७.० मध्ये ७७%) आणि सुरक्षा पातळी (आयपीक्यू ६.० मधील ६३% वरून आयपीक्यू ७.० मध्ये ६७%) अशा निकषांमध्येही लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे.

## झी टीव्हीवरील आगामी मालिका सरूमध्ये शगुन पांडे साकारणार नायक वेद बिर्लाची भूमिका

**मुंबई, ८ मे :** भारतात छोट्या शहरांमधून असंख्य स्वप्नाळू लोक आपल्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहत असतात. शिक्षण, खेळ आणि कला ह्या स्वप्नांसाठी आपले दरवाजे खुले करतात, पण मोठ्या शहरात जाण्याचा प्रवास मात्र अनेकदा असंख्य आव्हाने येतात, जी चिकाटीची परीक्षा पाहतात. प्रेरणादायी आणि आपल्याशा वाटणाऱ्या कथा सांगण्याच्या आपल्या समृद्ध वारशासाठी मानली जाणारी झी टीव्ही वाहिनी अशीच एक नवीन मालिका सरू घेऊन येत आहे. ही कथा आहे एका तरूण मुलीची जी आपल्या छोट्या शहराच्या मर्यादेपलीकडील स्वप्न पाहण्याचे धाडस करते.

सरूचे जग हे तिच्या गावातच वसलेले आहे, ही अशी जागा आहे जी तिच्यासाठी अतिशय प्रिय आहे. पण तिथे उच्च शिक्षणाची सोय नसल्यामुळे तिच्यासाठी तिथून बाहेर निघण्यावाचून आणि शहरात जाऊन आपल्या आकांक्षा पूर्ण करण्याशिवाय काहीही पर्याय नाहीये. यात सगळ्या मोठी अडचण म्हणजे तिच्या आईचे मन वळवणे, कारण सरूला मोठ्या शहरात पाठवायला त्यांचा अतिशय विरोध आहे. ह्या भूमिकेबद्दल उत्साहात असलेला शगुन पांडे म्हणाला, सरू सारख्या मालिकेचा हिस्सा बनणे हा माझा सन्मानच आहे कारण ही मालिका अतिशय प्रेरणादायी आणि उभारी देणारा संदेश देते. झी टीव्हीसोबत पुन्हा काम करण्याची आणि वेद बिर्लाची भूमिका जीवंत करण्याची संधी माझ्यासाठी अतिशय उत्साहजनक आहे. सरूचा प्लॉट महत्त्वाकांक्षा आणि उद्देश यांवर लक्ष केंद्रित करतो आणि हे कथानक प्रेक्षकांपर्यंत आणताना मी खूप उत्साहात आहे.

## भरत अहलावत जीवंत करत आहे आपल्या आतील रॉकस्टारला जाने अनजाने हम मिलेच्या सेटवर ऑफस्क्रीन आणि ऑनस्क्रीनही!

**मुंबई, ८ मे :** झी टीव्हीवरील जाने अनजाने हम मिलेमध्ये आता प्रेम केंद्रस्थानी येत असून भरत अहलावतची व्यक्तिरेखा राघव आपली पत्नी रीत आयुषी खुराणाला प्रभावित करण्यासाठी गिटार वाजवायला शिकत आहे. आता हा ट्रॅक आणखी खास बनणार आहे कारण खऱ्या आयुष्यातही भरतला गिटार वाजवता येते. रॉकस्टार चित्रपट पाहिल्यानंतर त्याच्या मनात ही आवड निर्माण झाली. आपल्या व्यक्तिरेखेमध्ये थोडेसे स्वतःलाही आणत त्याने स्वतःच ह्या दृश्यासाठी परफॉर्म केले आणि त्या क्षणाला खरे आणि भावस्पर्शी बनवले.

ऑफस्क्रीनसुद्धा भरतने आपल्या संगीताची आवड सर्वांसोबत वाटून घेणे चुकवले नाही. ब्रेक्सच्या दरम्यान त्याने आपल्या अचानक जॅम सेशन्ससह सेटला मस्त, जीवंत बनवत खूप साऱ्या हास्य आणि बॉन्डिंगसह संगीताने भरून टाकले आणि आपल्या सहकलाकारांचे मनोरंजन केले.

भरत म्हणाला, मला गिटार वाजवायला नेहमीच आवडले आहे आणि माझ्या मालिकेत हे करायला मिळणे अतिशय उत्साहजनक आहे. त्यामुळे मला माझ्या व्यक्तिरेखेमध्ये थोडी स्वतःची छबीही उतरवता आली. रॉकस्टार चित्रपट पाहिल्यानंतर मला गिटारचे बेसिक्स शिकण्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळे माझ्या मनावर खोल प्रभाव पडला. मी प्रोफेशनल नाहीये, पण तरीही मी अनेक वर्षांपासून हा सराव करत आहे. जेव्हा माझ्या सहकलाकारांना हे कळलं तेव्हा मी त्यांच्यासाठीही वाजवावं अशी गळ त्यांनी मला घातली. आमच्या ब्रेक्समध्ये संगीतासोबत आम्ही बॉन्डिंग करत आहोत आणि काही ट्रॅक्स वाजवून मीसुद्धा मूड हलका करण्याची संधी हातची जाऊ दिली नाही. त्यामुळे सेटवर अगदी ताजी ऊर्जा निर्माण झाली. अभिनेते म्हणून हेच छोटे छोटे क्षण सीन्स पूर्ण झाल्यानंतरही आमच्यासोबत दीर्घकाळ राहतात.

## आज का अंदाज

शुक्रवार ९ मे २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ५ | ९ | २ | ५ | ६ | ९ |
| २९० | २३९ | १४० | १८० | ११० | २३० | १५० | १४४ |
| ३८० | ३४७ | ३४८ | ३६० | २०० | ३३९ | ३३० | २३४ |
| ४७० | ४०० | ६९० | ४५० | ४८० | ५०० | २४० | २७० |
| १२ | ४१ | ५१ | ९१ | २१ | ५१ | ६२ | ९२ |
| १३ | ४२ | ५२ | ९३ | २४ | ५२ | ६३ | ९३ |
| १८ | ४८ | ५७ | ९७ | २७ | ५७ | ६८ | ९७ |

**९ मे : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ५१ | ६२ |
| २५ | ३५ | ५६ | ६४ |
| २७ | ३७ | ५८ | ६७ |

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्हाला नोकरीसाठी दिलेल्या मुलाखतीत किंवा परीक्षेत यश मिळेल. नोकरी मिळवण्याची तुमची जुनी इच्छा पूर्ण होईल. व्यवसाय वाढवण्याच्या योजनांना प्रियजनांकडून मान्यता मिळेल.

**वृषभ :** आज तुम्हाला तुमच्या भावंडांकडून पाठिंबा आणि साथ मिळेल. ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. तुमच्या घरी जुन्या नातेवाईकाचे आगमन आनंद घेऊन येईल. कामातील अडथळे दूर होतील.

**मिथुन :** साधारणपणे तुमचे आरोग्य चांगले राहील. मानसिक आरोग्य शारीरिक आरोग्यापेक्षा थोडे कमकुवत असू शकते. थोडी विश्रांती घ्या, काळजी घ्या. आज कुणालाही उधार रक्कम देवू नका.

**कर्क :** तुम्हाला एखाद्या शुभ कार्यक्रमाचे आमंत्रण मिळेल. पैशाच्या व्यवहारात सावधगिरी बाळगा. कामाच्या ठिकाणी वरिष्ठांशी अनावश्यक वाद होऊ शकतात. त्यामुळे सामोपचाराने वागा.

**सिंह :** आज तुमचा दिवस तणावाने सुरू होईल. कामाच्या ठिकाणी तुम्ही केलेल्या चांगल्या कामाचे श्रेय दुसरे कोणीतरी घेण्याचा प्रयत्न करेल. तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागू शकते.

**कन्या :** कामासाठी भटकणाजयांना आज रोजगार मिळेल. तुम्ही ज्या व्यक्तीवर प्रेम करता त्याच्याकडून काही कारणामुळे मन दुखावले जावू शकते. अपेक्षित पाठिंबा आणि कंपनी न मिळाल्याने अंतर वाढेल.

**तुळ :** आज व्यवसायात अपेक्षेनुसार पैसे न मिळाल्याने तुम्ही नाराज असाल. घरे आणि व्यावसायिक ठिकाणी आग लागू शकते. ज्यामुळे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** आज अनावश्यक धावपळ शारीरिक आणि मानसिक त्रास देईल. जुन्या मित्राला भेटल्याने तुमचा ताण काही प्रमाणात कमी होऊ शकतो. आरोग्याशी संबंधित समस्यांकडे दुर्लक्ष करू नका.


**धनु :** सुखसोयी आणि सुविधांमध्ये वाढ होईल. व्यवसायात केलेले बदल फायदेशीर ठरतील. तुम्हाला नवीन कपडे मिळतील. नोकरीत बदल होऊन पदोन्नती मिळेल. तुम्हाला अचानक प्रवासाला जावे लागू शकते.

**मकर :** आज, कोणत्याही मौल्यवान वस्तू अज्ञात व्यक्तीला दान करणे टाळा. व्यवसायात समाधानकारक उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. कामगारांना रोजगारासोबत चांगले आर्थिक फायदे मिळतील.

**कुंभ :** मुलांच्या आनंदात वाढ झाल्यामुळे मन प्रसन्न राहील. दूरच्या देशातील एखाद्या प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल. वैवाहिक जीवनात, पती-पत्नीमध्ये परस्पर आनंद आणि सुसंवाद वाढेल.

**मीन :** आज वातावरणाचा तुमच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. म्हणून, सतर्क आणि सावध रहा. अनावश्यक मानसिक त्रास होऊ शकतो. बिघडत्या तब्येतीमुळे तुम्हाला अधिक वेदना होतील.

## शब्दकोडे क्रमांक २१०६



**आडवे शब्द:-**
१) स्वातंत्र्यवीरांचे संपूर्ण नाव
११) कागदी चलन
१२) झाडाभोवतीचा कट्टा
१३) रममाण, निमग्न
१४) शिखराच्या छताचा मध्यभाग
१६) वाकलेला
१९) वारा
२०) हिंदीत सर्व
२१) दुसरे लग्न करणारी स्त्री
२२) दहावी रास
२४) पगारपत्रक
२७) नगरवासी
२८) सांभाळणारा, एक पालेभाजी
२९) पत्र
३२) विशेष
३३) एक चर्मवाद्य
३५) वयाने जास्त असलेला
३७) कलावंत
३९) दुधाच्या वड्या
४१) कडक
४२) नूतन
४३) मालाचा पुरवठा
४४) कल्लोळ, गोंधळ
४६) एखाद्या कामात सतत अडथळा येणे या अर्थाची म्हण
५०) रेशमी धोतर
५१) शिवसेनेचे पहिले मुख्यमंत्री मनोहर **
५२) पाताळ
५५) घागरा
५८) वार्ताहर
६१) बूड
६३) बाज विणण्याची सुती पट्टी
६५) मला
६६) वरच्या टरफलासह तांदूळ
६७) गोव्याची राजधानी
६८) आश्चर्याची गोष्ट, आश्चर्य
६९) काम, नशीब
७०) चाफा

**उभे शब्द:-**
१) भूदान यज्ञाचे प्रणेते
२) रंगमंचावर सादर होणारे नाट्य
३) खबदाडी
४) दरवाजा
५) उग्र वास
६) शेणामातीने जमीन गुळगुळीत करणे
७) देश, जमीन
८) कमळाचे तळे
९) दात
१०) जेमतेम
१५) फोडातील द्रव
१७) वणवा
१८) त्रासाची भुणभुण, बडबड
१९) परीक्षा देण्याची जागा
२१) भांडे
२२) सुसर
२३) जिनसांची यादी
२५) तपासणी करणारा
२६) धर
३०) अग्नी
३१) संगीतातील एक राग
३२) पणजोबांचे वडील
३४) मोटरसायकल
३६) रमापती
३७) श्रम मेहनत
३८) कर्णेंद्रिय
४०) सुळे, मोठे दात
४४) येणारा जाणारा, पै पाहुणा
४५) बोबडी वळाल्यानंतरची भाषा
४७) कदर करणारा
४८) लोचट, कोडगा , अतिशय बोलणारा
४९) पायजमा
५२) सांडलेले भाताचे कण
५४) उंट हाकणारा
५६) रत्न
५७) वेदनेची उसळी, खटका
५९) ठाणवई
६०) तास
६२) बांबू
६४) आवाज, ध्वनी
६६) सर्प

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# महसूल विभागाने पकडला अवैध वाळूचा टीप्पर

**महासागर प्रतिनिधी**
**मोहाडी , दि.०८ मे :** तालुक्यातील निलज (बुज) येथील वाळू घाटात डेपोच्या नावावर मोठ्या प्रमाणात लूट सुरू असून सोमवारला महसूल विभागाने वाळू भरलेला टिप्पर पकडून करडी पोलीस स्टेशन मध्ये जमा केला आहे.

मोहाडी तालुक्यातील निलज (बुज) व तिरोडा तालुक्यातील घाटकुरोडा या वाळू घाटातून डेपोच्या नावावर विनापरवाना क्षमतेपेक्षा जास्त वाळू भरून विनापरवाना विकली जात आहे . महसूल विभाग वेळोवेळी कारवाई करून रेतीचे टिप्पर पकडून कारवाई करते. परंतु करडी पोलिस स्टेशनचे कर्मचारी हप्ता वसुली साठी अवैध वाळूचे टीप्पर पकडत नाही.

सोमवारला महसूल विभागाने करडी येथे टिप्पर क्रमांक. एम एच.३६ ए ए ३७८५ सायंकाळी ५.३० च्या सुमारास पकडून चौकशी केली असता सदर टिप्पर हा निलज (बुज) वाळू घाटातून रेती भरून निघाला होता.

सदर टिप्पर चालकाकडे रेती वाहून नेण्याचा परवाना मागितला असता रेती वाहून नेण्याचा परवाना त्यांच्याकडे नव्हता यावरून सदर गाडी चोरीची रेती नेत असल्याचे दिसून आले. सदर टिप्पर पोलीस स्टेशन मध्ये जमा करण्यात आला .

**‘ घाट बंद करण्याची मागणी ’**

तालुक्यातील बेटाळा व निलज वाळू घाटात डेपोच्या नावावर अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने मोठ्या प्रमाणात रेतीची चोरी होत असल्याने दोन्ही वाळू डेपो बंद करण्याची मागणी होत आहे .




# गोसे प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी आ. डॉ. परिणय फुके यांचा पुढाकार

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा , दि. ०८ मे :** गोसेखुर्द धरण प्रकल्पामुळे बाधित झालेल्या नागरिकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्या सोडवण्यासाठी आमदार डॉ. परिणय फुके यांनी पुढाकार घेतला आहे. नागपूर येथील सिंचन भवनात त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत पुनर्वसन, कालवा कामे, उपसा सिंचन योजना आणि संपादन विषयक अनेक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.



भंडारा तालुक्यातील खैरी व संगम या गावांतील शेतकऱ्यांची शेती गोसे धरणात गेल्यामुळे ते नुकसान भरपाईपासून वंचित आहेत. या बाबतीत तात्काळ तोडगा काढण्याची गरज असल्याचे आमदार फुके यांनी स्पष्ट केले. मोहाडी तालुक्यातील मुंढरी गावाचे पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणीही बैठकीत मांडण्यात आली. भोजापूर येथील अपूर्वा कॉलनीत बॅक वॉटरमुळे काही घरे धोकादायक स्थितीत आली असून ती संपादित करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

लाखांदूर तालुक्यातील ओपरा, राजनी, डांबेवीरली, गवराळा, मोहरणा, कुडेगाव, विरली/खुर्द या गावांमध्ये डाव्या कालव्याचे काम अर्धवट राहिल्यामुळे शेती पाण्यात गेली आहे व मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे कालवा कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश आमदार फुके यांनी दिले.

पिपरी, चिचोली, लोहारा (मौदा तालुका), भंडारा व मोहाडी तालुक्यातील एकूण ७० गावांसाठी कन्हान नदीवरील गोसे प्रकल्पाच्या थांबलेल्या पाण्यावरून उपसा सिंचन योजना राबवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. यामुळे या गावांमध्ये शेतीला पाणी मिळू शकेल. तसेच मुख्य कालव्यालगतच्या आथली, आसोला, परसोडी (नाग), कुडेगाव, खैरी (पट), गवराळा, मांदेड, सावरगाव आदी गावांमध्ये लहान पाटचऱ्यांचे काम पूर्ण करावे, अशी सूचना झाली.

गोसे प्रकल्पातील गट क्रमांक २०५/३ मधील ९२८.३१ चौ. मीटर आणि गट क्रमांक २४१ मधील अकृषिक जमिनी संपादित करण्याचे प्रस्तावही शासनाकडे आहेत. या प्रस्तावांना लवकरच मंजुरी देण्यात येईल, असे आश्वासन आमदार फुके यांनी दिले.

धारगाव उपसा सिंचन योजनेच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी देऊन भंडारा जिल्ह्यातील ४९ गावांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी बैठकीत झाली.

या बैठकीला व्हीआयडीसीचे कार्यकारी संचालक श्री. सोनटक्के, गोसेखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता आर. जी. पाटील, अंबाडी विभागाचे अधीक्षक अभियंता विश्वकर्मा, डावा कालवा विभागाचे कार्यकारी अभियंता सुहास मोरे, नेरला उपसा सिंचन योजनेचे कार्यकारी अभियंता अंकुश कापसे, गोसे विभागाचे कार्यकारी अभियंता जितेंद्र तुरखेडे, गोसे धरण विभागाचे कार्यकारी अभियंता ढुमने यांच्यासह प्रकल्पग्रस्त भागातील अनेक नागरिक व स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. मात्र, आमदार डॉ. परिणय फुके यांच्या पुढाकारामुळे या समस्या मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# वनविभागाने नाली खोदून बंद केला रस्ता

### देव्हाडा खुर्द येथील प्रकार



**महासागर प्रतिनिधी**
**मोहाडी , दि.०८ मे :** तालुक्याच्या शेवटच्या टोकावर वसलेल्या देव्हारा खुर्द एलोरा पेपर मिल या गावाजवळून गोंदिया जिल्ह्यातील घाटकुरोडा , पाटील टोला या गावांकडे जाणारा रस्ता हा वन विभागाच्या गट क्रमांक ३१२ मधून गेला असून वनविभागाने तो रस्ता नाली खोदून बंद केल्यामुळे वाहतुकीचा घोळ निर्माण झाला आहे.

मोहाडी तालुक्याच्या शेवटच्या टोकावर देव्हाडा खुर्द हे गाव आहे , या गावानंतर गोंदिया जिल्ह्याची सीमा सुरू होत असून हायवे रस्त्याने तिरोडा तालुक्यातील नवेगाव व देव्हाडा खुर्द गावांमधून पाटीलटोला , घाटकुरोडा या गावावरून तिरोडा कवलेवाडा धरणा कडे रस्ता जातो .

परंतु एलोरा पेपर मिल अस्तित्वात आली व त्या पेपर मिलने आपल्या सोयीसाठी आपल्या स्वतःच्या जागेतून रस्ता तयार केला त्याचबरोबर वनविभागाने गट क्रमांक ३१२ या जागेतून सुद्धा रस्ता तयार केला ३१२ गट क्रमांक नंतर नाला आहे , देव्हाडा खुर्द येथून हाकेच्या अंतरावर नाला आहे नाल्यानंतर गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यातील पाटील टोला या गावाची सीमा सुरू होते परंतु सदर रस्ता हा गट क्रमांक ३१२ मधून गेला असून यावर देव्हाडा खुर्द येथील सरपंच यांनी पत्र देऊन वन विभागाच्या जागेतून गेलेला रस्ता बंद करण्यात यावा , असे पत्र वन विभागास दिले . त्यानुसार वन विभागाने त्या पत्राची दखल घेऊन सदर रस्ता जेसीपी द्वारे नाली खोदून बंद केला.

**‘वाळू तस्करांचा होता त्रास ’**

देव्हाडा खुर्द नंतर गोंदिया जिल्ह्यातील सीमा चालू होते त्या सीमेत नाल्यालगत वैनगंगा नदीच्या पात्रातून मोठ्या प्रमाणात रेतीचे उत्खनन करून नाला ओलांडून मोहाडी तालुक्यातील करडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत ट्रॅक्टर व टीप्पर प्रवेश करतात व हे टिप्पर देव्हाडा खुर्द गावातून याच रस्त्याने ये - जा करतात . या वाहनांचा त्रास गावकऱ्यांना होत असल्याने देव्हाडा खुर्द येथील सरपंच कांबळे यांनी वन विभागास पत्र देऊन वन विभागाच्या गट क्रमांक ३१२ मधून जाणारा रस्ता बंद करण्यास भाग पाडले.

**‘वाहतुकीची झाली कोंडी ’**

देव्हाडा खुर्द एलोरा पेपर मिल येथून कवलेवाडा , घाटकुरोडा या गावाकडे जाणारा हा रस्ता कमी अंतराचा व सोपा होता मात्र हा रस्ता बंद झाल्यामुळे आता वाहतुकीची कोंडी निर्माण झाली आहे.

# पंडित जवाहरलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाचे सुयश

**महासागर प्रतिनिधी**
**सानगडी , दि. ०७ मे :** संत नरहरार्पी शिक्षण संस्था साकोली द्वारा संचालित सानगडी येथील पंडित जवाहरलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाने यावर्षीही निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे.नुकताच फेब्रुवारी -मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. यावर्षी विद्यालयाचा निकाल ८१.७५ टक्के लागलेला आहे.या परीक्षेत एकूण १३७ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ठ होते. त्यापैकी ११२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



विद्यालयातील विज्ञान शाखेचा ९८.६४ टक्के तर कला शाखेचा ६२.९० टक्के निकाल लागलेला आहे. विज्ञान शाखेतून हर्षा अरविंद गायकवाड हिने ६८.६७ टक्के गुण प्राप्त करून विद्यालयातून प्रथम क्रमांक, श्रावणी पृथ्वीराज वासनिक हिने ६५.५० टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक तर आरती रविंद्र रोकडे हिने ६५ टक्के गुण संपादन करून तृतीय क्रमांक पटकावलेला आहे.

तसेच कला शाखेतून प्रणव मुरलीधर तरोणे याने ८० टक्के गुण प्राप्त करून विद्यालयातून प्रथम क्रमांक, पायल खुशाल खडके हिने ६२.८३ टक्के घेऊन द्वितीय क्रमांक तर कुणाल नीलकंठ रुखमोडे ह्याने ६१.६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. इयत्ता १२ विच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व गुणवंत, यशवंत विद्यार्थ्यांचे संस्था सचिव प्रशांत डोमळे, मुख्याध्यापक प्रमोद वंजारी, प्राध्यापक प्रीती डोमळे, प्राध्या. हिरालाल मेश्राम, प्राध्या. नरेश मेंढे, प्राध्या. विलास संग्रामे, प्राध्या. कमलेश लांजेवार, प्राध्या. नरेंद्र कापगते, सहाय्यक शिक्षक माणिकराव खर्डेकर, नंदेश्वर बांगळकर, वरिष्ठ लिपिक अभय घुले, प्रयोगशाळा सहाय्यक अशोक रोकडे इत्यादिंनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या गृहभेटी घेऊन पालकांसह गुणवंतांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# माडगी येथे मुला - मुलींसाठी सुसंस्कार शिबीर

**महासागर प्रतिनिधी**
**लाखनी , दि.०८ मे :** अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या तत्व प्रणालीतून तुमसर तालुक्यातील माडगी येथे वैनगंगा नदीच्या तिरावर दिनांक ११ ते २५ मे पर्यंत श्री गुरुदेव सर्वांगीण संस्कार शिबिर भजन प्रशिक्षण वर्गाचे आयोजन श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबीर समिती तुमसर /मोहाडीच्या वतीने १२ ते १८ वर्ष वयोगटातील मुला -मुलींसाठी निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज संस्थापित अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या तत्त्वप्रणालीतून ग्रामगीतेचा जीवन शिक्षणाचे धडे आजच्या नवयुकांना देऊन देश, धर्म, संस्कृती व राष्ट्रीय एकात्मतेला पोषक असा तरुण घडावा या उद्देशाने नियमबद्ध दिनचर्या ठेवून विद्यार्थ्यांमध्ये सद्गुण संवर्धन होण्याचा दृष्टीने मुला मुलींसाठी निवासी सुसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. माडगी येथील संत तुकाराम महाराज आश्रमात मुले -मुली यांना सूर्यनमस्कार, योगासने प्राणायाम, लाठी काठी, संगीत, ज्ञानसाधना सामुदायिक प्रार्थना, मौन साधना, योगासने, मैदानी खेळ, जुडो कराटे, बौद्धिक व वक्तृत्व कला, दांडपट्टा, तलवार आणि सुंदर हस्ताक्षर या संदर्भात प्रशिक्षण कालावधीत मार्गदर्शन आणि प्रशिक्षण दिले जाणार आहे. संस्कार, शिस्त आणि आत्मविश्वास विद्यार्थ्यांत निर्माण व्हावे म्हणून वैकुंठवासी गुरुवर्य आचार्य रत्नाकर महाराज संत तुकाराम महाराज आश्रम माडगी यांच्या प्रेरणेने सुसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराचे प्रमुख मार्गदर्शक गुरुकुंज आश्रम चे प्रकाश महाराज वाघ, शिबिर प्रमुख केंद्रीय उपाध्यक्ष सुशील बुरडे, मुख्य शिक्षक ह भ प जय महाराज चव्हाण, गायक रोहित तरोणे, निकिता राऊत, कीर्ती गियंकर, परेड शिक्षक पी. के. सरकार, तबलावादक अनुराग ठाकरे, विनीत देशमुख, ओम हिवसे, प्रणय मोटघरे, जयेश नंदुरकर, अरुण इंगोले, तलवार किरण मेश्राम व अन्य प्रशिक्षक प्रशिक्षण देणार आहेत.

या शिबिरात मुला -मुलींसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून या शिबिरात सहभागी होण्यासाठी ९९२३८७६४१९ या नंबरवर संपर्क करावा असे आवाहन शिबीर प्रमुख सुशील बुरडे यांनी केले आहे

# ११५लोकसेवापैकी वाहन परवाना व ३२, वाहन नोंदणी

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा , दि.०८ मे :** महाराष्ट्र राज्यात प्रात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचीत लोकसेवा देण्याकरिता आणि तत्संबधित व तदानुषंगिक बाबीकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अनिधनियम, २०१५ पारीत करण्यात आला असून तो दि. २८ एप्रिल, २०२५ पासून अमलात आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत परिवहन विभागाच्या अधिसूचित सेवा आपले सरकार सेवा केंद्रावर तासाचा parivahan.gov.in या संकेत स्थळावरुन देण्यात येतात.

परिवहन विभागाच्या एकुण ११५ लोकसेवापैकी वाहन परवाना संबंधित ३२, वाहन नोंदणी संबंधित २४ तसेच अनुज्ञप्ती संबंधित २० सेवाचा लाभ आपले सरकार सेवा केंद्राच्या https://aaple-sarkar.mahaonline.ov.in या संकेतस्थळावरुन नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, भंडारा विभागानी कळविले आहे.

# कोर्टाच्या आदेशाचा अपमान ; गौशाळेतून जनावरे देण्यास टाळाटाळ

### शेतकऱ्यांनी घेतली पत्रकार परिषद ; अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा ; जनावरे रात्रभर होती बिना चारा पाण्याची

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली , दि. ०८मे :** गोरेगाव ( गोंदिया ) येथून रितसर बैल खरेदी करीत बाजार समितीची पावती सोबत घेऊन पायदळी येत असलेल्या ३५ बैलांना डुग्गीपार पोलीसांनी अडवून ठाण्यात आणले.



रात्रभर विना चाऱ्या पाण्याने ठेवून दूसऱ्या दिवशी गौशाळेत रवाना केले. शेतकऱ्यांनी सविस्तर न्यायालयातून बैल परत करा असा आदेश देऊनही गौशाळा मालक शेतकऱ्यांना बैल देण्यास टाळाटाळ केली आहे.

या संतापजनक प्रकारावर शेतकऱ्यांनी साकोली येथे ( बुध. ०७ मे ) ला पत्रकार परिषद घेऊन आरोप केला की, सर्व आमचे बैल परत करावेत अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा देत आमची ३५ बैल कुठे आहेत.? कत्तलखानात विकली तर नाही.? की मरण पावले यांचे उत्तर द्या.? असा इशारा दिला आहे.

सविस्तर की, २६ मार्च २०२५ ला सायं. ६ दरम्यान गोरेगाव जि. गोंदिया बैल बाजारातून साकोली तालुक्यातील शेतकरी निलकंठ कुंभारे - सासरा, चोपराम ठाकरे - वडद, भास्कर खंडाईत - झाडगांव, अनमोल गडपायले - सोनमाळा, भिमराव लांजेवार - झाडगांव, परसराम वाढई, महेश खंडाईत, समिर कुंभारे, प्रभाकर खंडाईत, दूयीधन हेमणे, जितेंद्र बावनकुळे, शामराव राखडे, परसराम चुटे, रामा भोयर, गंगाधर सोनवाने हे बैल हाकणारे रामेश्वर सिडाम, हेमराज परशुरामकर व चेतन सिडाम यांसह गावाकडे पायदळ येत असता डुग्गीपार पोलीसांनी रस्त्यावर थांबवले.

सर्व ३५ बैल कोहमारा चौकात आणले व रात्रभर त्या सर्व जनावरांनी चारा पाणी सुद्धा खाल्लेला नव्हता. सकाळी डुग्गीपार पोलीस ठाणे येथे सर्व जनावरांना आणून ध्यान फाऊंडेशन गौशाळा - गराडा तह. लाखनी येथे पाठविले. या शेतकऱ्यांनी बैल परत मिळावे म्हणून दिवाणी न्यायालय सडक अर्जूनी येथे सुपूर्दनामा पेश करून न्यायालयाने दि. ११ एप्रिल २०२५ ला याचिकाकर्त्यांना त्यांचे बैल परत करा असा आदेश दिला. परंतू हा कोर्टाचा आदेश न जूमानता गौशाळा संचालक अश्विनी गिरी यांनी शेतकऱ्यांना बैल देण्यास नकार दिला आहे.

याबाबत शेतकऱ्यांनी साकोली येथे काल ता. ०७ मे रोजी पत्रकार परिषद घेतली व आरोप केला आहे की, कोर्टाचा आदेश असतानाही हा न्याय व्यवस्थेचा अपमान का.? आम्ही शेतकरी आज दिड महिना लोटला व आमची जनावरे मिळाली नाहीत. गौशाळा मालकांची ती जनावरे आहेत का.? की त्यांनी कोर्टातून थांबा का आणला.? आमची सर्व जनावरे जर परत मिळाली नाही तर आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबला जाईल. या शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाविरुद्ध आम्हाला तातडीने न्याय मिळवून द्यावा, आमची जनावरे जिवंत आहेत की कोणत्या कत्तलखाना मालकांना विकली तर नाही अशी आम्हाला दाट शंका उपस्थित होत आहे.

असा आरोप या शेतकऱ्यांनी झालेल्या पत्रकार परिषदेत केला व याची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

# लॉर्ड्सच्या विद्यार्थ्यांनी बारावी बोर्डात फडकवला यशाचा झेंडा

*** नागपूर बोर्डात वाणिज्य शाखेतील झोयब अकबानीने अकाउंट्समध्ये पहिला क्रमांक पटकावला. * शुभदा शेंडे विज्ञानात जिल्ह्यात चौथी**

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा , दि. ०८ मे :** महाराष्ट्र उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने नुकताच बारावीचा निकाल जाहीर केला आहे. उदयन बहुउद्देशीय विकास संस्थेअंतर्गत येणाऱ्या भंडारा येथील सिंधी कॉलनी येथील लॉर्ड्स पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजने १००टक्के निकाल देऊन उच्चस्तरीय ज्ञान आणि उत्कृष्ट निकाल देण्याची आपली परंपरा कायम ठेवली आहे.




लॉर्ड्सच्या विद्यार्थ्यांनी अनेक विषयांमध्ये नागपूर बोर्ड आणि भंडारा जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. वाणिज्य शाखेतील झोयब अकबानीने अकाउंट्समध्ये प्रथम क्रमांक मिळवून मंडळाचे नाव उंचावले.

त्याला ९४टक्के गुण मिळाले आणि तो जिल्ह्यात तिसरा आला.

रूपिका शर्माने ९२टक्के गुणांसह प्रवीणता मिळवली. विज्ञान शाखेत शुभदा शेंडे हिने ९१.५०टक्के गुण मिळवून भंडारा जिल्ह्यात चौथा क्रमांक पटकावला. श्रुती वसंता मेश्राम हिने ८९.३३टक्के गुणांसह सहावा आणि आदीबा शेख हिने ८९.१७टक्के लॉर्ड्सच्या गुणांसह सातवा क्रमांक पटकावला.

परीक्षेच्या निकालानंतर, शाळेत आयोजित भव्य सत्कार समारंभात, शाळेचे सीईओ डॉ. आशिष सुभाष पालीवाल, ॲडमिन राजेश जगनिक, प्राचार्या सुनंदा साठे, प्रणिता लाहोटी, पर्यवेक्षिका अरुणा उपरकर, शर्मा आणि सर्व कर्मचारी आणि उपस्थित मान्यवरांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मिठाई, शाल आणि नारळ देऊन स्वागत केले.

यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. परीक्षेच्या निकालांची खास गोष्ट म्हणजे ६ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत आपली नावे नोंदवली.

३५ मुलांनी ८५टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले. ३५ मुलांनी ८५टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले. ६६ मुलांनी ७५टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले. १४४ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी मिळाली. श्रावणी वहाणे ८८.६७ टक्के , शगुन शर्मा ८७टक्के , मोहम्मद अझीम काझी ८६टक्के , रोहन बोरकर ८४.६७ऋ यांनीही विशेष कामगिरी केली.

विषयानुसार, भंडारा येथील सिंधी कॉलनी येथील लॉर्ड्स पब्लिक स्कूल आणि ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बोर्डात सर्वाधिक गुण मिळवले.

अनुष्का वाघायेने संगणक विज्ञान विषयात १८१ गुण मिळवून जिल्ह्यात पहिला क्रमांक पटकावला. एंजल सायमनने मत्स्यव्यवसाय विषयात १९७ गुण मिळवून बोर्डात पहिला क्रमांक पटकावला. रुपिका शर्मा आणि अर्पित तलमले यांनी इंग्रजीमध्ये ९५ गुण, श्रुती मेश्राम यांनी भौतिकशास्त्रात ९४, तनुश्री उईके यांनी रसायनशास्त्रात ९०, आलोक पराते यांनी गणितात ९६, समाधान थुलकर यांनी जीवशास्त्रात ९६, चैतन्य नान्हे यांनी माहिती तंत्रज्ञानात ९८, श्रावणी वहाणे यांनी ९५, रूपिका शर्मा आणि जोएफ एकबानी यांनी अर्थशास्त्रात ९७, ओसीएम रुपिका शर्मा यांनी मुख्य परीक्षेत ९६, शगुन शर्मा यांनी सचिवीय सरावात ८४, विपुल भासरकर यांनी हिंदीत ८७ आणि जय तुपाटे यांनी ८१ गुण मिळवून संपूर्ण बोर्ड आणि भंडारा येथे विशेष प्राविण्य श्रेणीत यश मिळवले आणि त्यांच्या पालकांना, शिक्षकांना आणि महाविद्यालयाला गौरव दिला.

सत्कार समारंभात हुशार विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले आणि त्यांना पुरस्कार देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांची मोठी उपस्थिती होती. शाळेतील वातावरण उत्साह आणि आनंदाने भरलेले होते.

RNI No.- MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा मालक, मुद्रक, प्रकाशक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर - १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. संपादक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक- सुरेश लक्ष्मण कोटगले, फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

# असिमता



## घरीच बनवा स्वादिष्ट मिठाई

रुचिरा

विशेष प्रसंगी एखादं मिष्ठान्न बनवायचं असेल तर ठराविक पर्याय समोर येतात. मात्र झटपट होणारे इतरही बरेच पदार्थ आहेत. त्यापैकी एक म्हणजे ॲपल कोकोनट बर्फी. ही स्वादिष्ट बर्फी सगळ्यांना नक्कीच आवडेल.

**साहित्य:** सफरचंदाचा कीस चार कप, किसलेलं खोबरं दीड कप, अक्रोडचे तुकडे पाऊण कप, अर्धा चमचा वेलची पूड, दीड कप साखर, पिस्त्याचे काप

**कृती:** एका कढईत खोबरं, सफरचंदाचा कीस आणि साखर घालून मंद आचेवर दहा मिनिटं परतून घ्या. मग यात वेलची पूड आणि अक्रोड घालून दोन ते तीन मिनिटं परता. सर्व पदार्थ मऊ झाल्यानंतर गॅस बंद करा. हे मिश्रण एका ट्रेमध्ये किंवा खोलगट ताटात काढून घ्या. थोडं थंड होऊ द्या. मिश्रण थंड झाल्यावर त्यावर पिस्त्याचे काप घालून हलक्या हातांनी दाब द्या. यानंतर सुरीने वड्या कापून घ्या. साधारण तीन तासांनी वड्या घट्ट होतील. नंतर त्या खाता येतील.

## स्वत:चा ब्रँड तयार करा



स्कील डेव्हलपमेंट

प्रत्येक जण करिअरमध्ये पुढे जाण्याच्या उद्देशाने काम करत असतो. प्रत्येकीला यशाची एक एक पायरी चढायची असते. मात्र काही कारणांमुळे आपण ठराविक भूमिकेत अडकून पडतो. स्वाभाविकच करिअरमध्ये प्रगती होत नाही. इच्छा असूनही पुढे जाता येत नाही. तेव्हा करिअरमधली यशाची पायरी चढण्यासाठी काय करता येईल यावियषी...

✽ कामाचं समाधान मिळत नसेल तर आजवरच्या कारकिर्दीचा आढावा घ्या. आजवर तुम्ही वापरलेल्या कौशल्यांची यादी करा. यानंतर पुढे काय करायचं आहे हे ठरवा. पुढची पायरी चढण्यासाठी लागणारी कौशल्यं तुमच्याकडे आहेत का, हे जाणून घ्या. नसतील तर ती आत्मसात करण्याचा प्रयत्न करा.

✽ तुमचं नेमकं उद्दिष्ट काय हे ठरवा. भरपूर पैसे मिळवणं, फिरणं, नव्या संधींचा शोध घेणं यापैकी तुम्हाला नेमकं काय करायचं आहे हे जाणून घ्या. त्यानुसार पुढे जा.

✽ करिअरमध्ये नेमकं काय करायचं आहे याबाबत मनात गोंधळ असेल, पुढची दिशा मिळत नसेल तर समुपदेशकांची मदत घेता येईल.

✽ मिटिंगमध्ये तुमचे मुद्दे मांडा, नव्या जबाबदाऱ्या स्वीकारा. स्वत:चा ब्रँड तयार करा. यामुळे तुम्ही पुढे जाऊ शकाल. आपल्या कामाने वरिष्ठांना प्रभावित करण्याचा प्रयत्न करा.

✽ एखाद्या संस्थेत म्हणावी तशी प्रगती होत नसेल, कौशल्याला वाव मिळत नसेल तर नोकरी बदलण्याचा विचार करा. उगाचंच गुंतून पडू नका. स्वत:ची प्रगती करून घ्या. गुणवत्तेला वाव द्या.

## यशस्विनी ऋतुजा

मानिनी

देशातच नाही तर जगात पुण्याची वेगळी ओळख आहे. हे शहर विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. अनेक बुद्धिवंतांनी ही भूमी संस्कारित केली आहे. म्हणूनच 'पुणे तिथे, काय उणे...' असे म्हटले जाते. त्याची प्रचिती आपल्याला विविध माध्यमातून येतच असते. पुणेकर कशातच कमी नसून सर्वच क्षेत्रात ते अव्वल पाहायला मिळतात. मग ते शिक्षण असो की पुणेरी टोमणे असो... प्रत्येक क्षेत्रात पुणेकर पुढे असल्याचे पाहायला मिळतील. अशातच अलिकडेच पुणेकरांसाठी एक अभिमानाची गोष्ट घडली आहे. पुण्यातील ऋतुजा व्हराडे हिने राष्ट्रीय संरक्षण अकादमीतर्फे (एनडीए) घेण्यात आलेल्या परीक्षेत मुलींमध्ये देशात पहिला क्रमांक पटकावला असून, ऑल इंडिया रँक ३ मिळवत इतिहास रचला आहे. तिच्या या यशाबद्दल सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. तेव्हा आज या मानिनीचा परिचय करून घेऊ या.

देशातील विविध परीक्षांमध्ये एनडीएची परीक्षा अत्यंत कठीण समजली जाते. यंदाच्या वर्षी ९० जागांसाठी जवळपास दीड लाख मुली परीक्षेच्या रिंगणात उतरल्या होत्या. या सगळ्या मुलींमध्ये ऋतुजाने वेगळेपण सिद्ध करत मुलींमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. ऋतुजाचे वडील संदीप व्हराडे वेब डिझाइन प्राध्यापक असून आई जयश्री व्हराडे गणिताच्या शिक्षिका आहेत. भारत सरकारने राष्ट्रीय संरक्षण अकादमीचे दरवाजे मुलींसाठी उघडले तेव्हाच ऋतुजाने या क्षेत्रामध्ये जाण्याचा निश्चय केला होता. त्यानंतर कठोर मेहनत करत तिने हे अपूर्व यश मिळविले आहे.



यापूर्वी तिने विज्ञान ऑलिम्पियाड आणि राज्यस्तरीय गणित स्पर्धांमध्येदेखील उत्कृष्ट कामगिरी केली आहे. ऋतुजाने या क्षेत्रात प्रवेश केल्यावर दोन वर्ष कठोर मेहनत केली. यात तिला पुण्यातील एका मान्यवर अकॅडमीचे मार्गदर्शन लाभले. एनडीए परीक्षेत यश मिळवण्यासाठी सुरुवातीला लेखी परीक्षा उत्तीर्ण होणे, त्यानंतर पाच दिवस चालणाऱ्या तोंडी परीक्षेत यश संपादन करणे सोपे नव्हते. मात्र ऋतुजाने हे करून दाखवलं आहे. ऋतुजा लहानपणापासूनच शिक्षणात हुशार असून दहावीत ९८ टक्के मिळाले असल्यामुळे सगळ्यांचीच तिच्याकडून चांगली शैक्षणिक कारकीर्द घडवण्याची अपेक्षा होती. आनंदाची बाब म्हणजे तिने सगळ्यांच्या अपेक्षांचा मान राखला आहे.

अकरावी आणि बारावीमध्ये असतानाच तिने एनडीए प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी एका अकादमीमध्ये प्रवेश घेतला आणि एसएसबी तयारीसाठी स्वत:ला झोकून दिले. ऋतुजा आपल्या या यशाचे श्रेय पालकांना आणि शिक्षकांना देते. ऋतुजाने पहिल्याच प्रयत्नात हे यश संपादन केले आहे. ऋतुजाची बंगळुरू बोर्डकडून भारतीय सैन्यासाठी शिफारस करण्यात आली. त्यानंतर म्हैसूर बोर्ड कडून सीपीएसएस परीक्षेसाठी पात्रता मिळवली. आता ती एअरफोर्स फ्लाइंग ब्रांचसाठी देखील वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त आहे. त्यायोगे ती नवी यशोगाथा रचण्यास सिद्ध असल्याचेही आपण म्हणू शकतो.

## गुंता नक्की सुटेल

काय करू?

माझं दोन वर्षांपूर्वी लग्न झालं. आम्हाला एक मूलही आहे. मी सध्या भलत्याच कोंडीत सापडले आहे. पती घरी नसल्यावर सासूसासरे माझ्याशी विनाकारण वाद घालतात. काही ना काही वाद उकरून काढतात. या बद्दल पतीला सांगितल्यावर त्याला हे सगळं खोटं वाटतं. मला मुलाची काळजी वाटते. त्याच्यावर या भांडणांचा, वादाचा वाईट परिणाम होईल का, असे विचार सतत मनात येत रहातात. मला घर तोडायचं नाही. पण या परिस्थितीचा मुलावर परिणाम होऊ नये, अशी इच्छा आहे. मी काय करू?



– एकत्र कुटुंबांमध्ये वर्चस्ववादाचा मुद्दा नेहमीच उभा रहातो. आता या भांडणांकडे आपण वेगळ्या दृष्टीने पाहू. फक्त तुझे सासूसासरे वाद घालतात की तुझाही यात सहभाग असतो हे एकदा बघ. तुझाही सहभाग असेल तर तू कोणत्या मुद्यांचा आग्रह धरतेस, त्यांचं काय म्हणणं असतं, या भांडणातले नेमके मुद्दे कोणते याचा आधी विचार कर. दुसरं म्हणजे त्यांना तुझ्या कोणत्या गोष्टी खटकतात हे जाणून घे. त्या कागदावर उतरवून काढ. या सगळ्याबाबत अजिबात भावनिक होऊ नकोस. या सगळ्या मुद्यांची पतीसोबत चर्चा कर. चर्चेतून सगळ्या समस्यांवर काही मार्ग निघू शकतो का, याचा विचार कर. यानंतरही वाद सुरूच राहिला तर शांत रहा. स्वत:चं मानसिक आणि शारीरिक आरोग्य धोक्यात येऊ देऊ नकोस. तू नाती जपायला, घर जोडायला आली आहेस. त्यामुळे आपलं काही चुकतंय असा विचार करू नकोस. तू तुझ्या बाजूने पूर्ण प्रयत्न कर. गरज पडल्यास समुपदेशकांची मदत घे.

## प्रभावी पपई फेस पॅक

स्किन केअर

उन्हाळ्याच्या त्वचेची काळजी घेणे थोडे कठीण असते कारण तीव्र सूर्यकिरण, धूळ आणि घामामुळे त्वचेचे सौंदर्य बिघडण्याचा मोठा धोका असतो. पण पपईद्वारे तयार होणारी प्रसाधने हा यावरुन उत्तम नैसर्गिक उपाय असून यामुळे केवळ त्वचा चमकदार होत नाही तर त्याचे अन्य फायदेदेखील मिळतात. पपईमध्ये एंजाइम (पपेन),व्हिटॅमिन सी आणि ॲंटीऑक्सिडंट्स असल्यामुळे त्वचेची खोलवर स्वच्छ होते तसेच उजळा मिळतो. तेव्हा आज पपईच्या दोन सर्वोत्तम फेस पॅकबद्दल जाणून घेऊ या.



**पपई आणि मधाचा फेस पॅक**

साहित्य: दीड कप पपई (मॅश केलेले), एक चमचा मध

**पद्धत:** सर्वप्रथम, पपई मॅश करून घ्या. आता त्यात मध घाला आणि चांगले मिसळा. तयार मिश्रण चेहऱ्यावर आणि मानेवर लावा. ते १५–२० मिनिटे चेहऱ्यावर राहू द्या. नंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा.

**फायदे:** पपई त्वचेतील मृत पेशी काढून टाकत असल्यामुळे त्वचा उजळ होते. मध त्वचा हायड्रेट करते आणि त्यातील ओलावा टिकवून ठेवते. हा फेसपॅक त्वचेला खोलवर पोषण देतो आणि चेहरा चमकदार बनवतो.

**पपई आणि दह्याचा फेस पॅक**

**साहित्य:** दोन टेबलस्पून पपई (मॅश केलेले), एक टेबलस्पून दही

**पद्धत:** सर्वप्रथम पपई चांगली मॅश करा. त्यात दही घाला आणि चांगले मिसळा. हे मिश्रण चेहरा आणि मानेवर लावा. १५–२० मिनिटे चेहऱ्यावर राहू द्या. नंतर कोमट पाण्याने धुवा.

**फायदे:** दह्यामधील लॅक्टिक ॲसिड त्वचेची चमक वाढवत असल्यामुळे ती उजळ दिसते. पपई त्वचेला मऊ आणि चमकदार बनवते. हा फेस पॅक त्वचेवरील डाग हलके करण्यास मदत करतो. थोडक्यात उन्हाळ्यात त्वचा चमकदार ठेवण्यासाठी पपई हा अतिशय प्रभावी आणि नैसर्गिक उपाय आहे. तुम्ही दिनचर्येत हे सोपे आणि प्रभावी फेस पॅक समाविष्ट करून त्वचेचे सौंदर्य आणि आरोग्य जपू शकता. उन्हाळ्यातही त्वचा ताजीतवानी ठेवू शकता.

## लग्न उन्हाळ्यात आहे?

सेलिब्रेशन

उन्हाळी लग्नाचा हंगाम रोमांचक असतो तितकाच आव्हानात्मकही असतो. विशेषत: लग्नासाठी लेहेंग्याची निवड करणे ही कसोटी असते. जड भरतकाम आणि जाडसर कापडामुळे वधू घामेघूम होण्याची दाट शक्यता असते. म्हणूनच उन्हाळ्यात लग्न असेल तर नववधूंनी हलके, आरामदायी पण स्टायलिश लेहेंगा निवडायला हवा. आज आपण उन्हाळ्यातही उत्तम लूक देणाऱ्या, हलक्या लेहेंग्याबाबत जाणून घेऊ या.

**पेस्टल शेड्समध्ये ऑर्गेन्झा किंवा जॉर्जेट लेहेंगा**

ऑर्गेन्झा किंवा जॉर्जेटसारखे हलके आणि मऊ कापड उन्हाळ्यासाठी योग्य आहे. या ऋतूत गुलाबी, हिरवा, ब्लू, लॅव्हेंडर यासारख्या रंगांना प्राधान्य दिले जाते. खेरीज या प्रकारच्या लेहेंग्यावरील बारीक धाग्याचे काम किंवा सिक्विन भरतकाम खूपच आकर्षक दिसते. वधू यावर पारदर्शक दुपट्टा आणि मोत्याच्या जडवलेल्या दागिन्यांसह साजिरी दिसते.

**कॉटन सिल्क किंवा चंदेरी लेहेंगा**

या कापडामुळे उन्हाळ्यात घाम येत नाही तसेच शाही लूकही अबाधित राहतो. त्यावरील हलके जरीकाम किंवा सोनेरी प्रिंट आकर्षक दिसते. यामध्ये पीच, ऑफ-व्हाइट, ग्रीन गोल्ड अशी रंगसंगती सर्वोत्तम दिसते.



**फुलांचा प्रिंटेड लेहेंगा**

तुम्हाला ट्रेंडी आणि मॉडर्न लूक हवा असेल तर फ्लॉवर डिझाइन सर्वोत्तम आहे. दिवसाच्या लग्नात ही शैली खूपच सुंदर दिसते. ताज्या आणि फंकी लूकसाठी तुम्ही क्रेप, सॅटिन किंवा जॉर्जेट असे कापड निवडा. फक्त पोल्की किंवा ऑक्सिडाइझ्ड सिल्व्हर सेट यावर शोभून दिसेल.

**स्ट्रेट कट लेहेंगा**

तुम्हाला मिनिमलिस्ट लूक हवा असेल तर स्ट्रेट कट लेहेंगा किंवा पॅनल लेहेंगा निवडा. फक्त बॉर्डरवर वर्क असणारा आणि इतरत्र सॉलिड किंवा लाईट प्रिंट असणारा लेहेंग्याचा हा प्रकार सध्या ट्रेंडमध्ये आहेत. त्यात कच्चे रेशीम, मटका रेशीम, लिनेन फॅब्रिक असे प्रकार सहज उपलब्ध असतात.

**आयव्हरी वा ऑफ-व्हाइट शेड्समध्ये लेहेंगा**

अलिकडे हे रंग वधूंच्या पसंतीचे बनले आहेत. यामध्ये थोडेसे सिक्विन वर्क किंवा मोत्यांची सजावट असेल तर ते अधिक ग्लॅमरस दिसते. यावर जांभळ्या, मरून किंवा ब्लश गुलाबी दुपट्ट्याचे कॉन्ट्रास्ट करू शकता. उन्हाळ्यात, ब्लाउज साधे ठेवावेत. त्यासाठी हॉल्टर नेक, डीप बॅक किंवा स्लीव्हलेस ब्लाउज योग्य ठरतात. या काळात लग्न असेल तर दुहेरी दुपट्टा टाळा. एकच हलका दुपट्टा घ्या. उष्णतेमुळे थकवा जाणवू नये म्हणून मुख्य विधींना लेहेंगा घालणे टाळा. मेकअप लाईट आणि ताज्या फुलांच्या केशरचना निवडा.

## अन्न विषबाधा टाळण्यासाठी...

वाचा तर खरं

उन्हाळ्यात अन्नपदार्थ लवकर खराब होतात. अशा परिस्थितीत थोडेही निष्काळजीपणा झाल्यास विषबाधा होण्याचा धोका वाढतो. खराब झालेले किंवा संक्रमित अन्न खाल्ल्यास पोट आणि पचनसंस्थेवर परिणाम होतो. लक्षणे वेळीच समजली नाहीत तर ही समस्या गंभीर आजाराचे रूप धारण करू शकते. म्हणूनच विषबाधा टाळण्यासाठी काही बाबींची माहिती घेणे गरजेचे ठरते.

**अन्न विषबाधा म्हणजे काय?**

बॅक्टेरिया, विषाणू, बुरशी किंवा विषारी पदार्थ असणारे अन्न किंवा पेये घेतो तेव्हा अन्न विषबाधा होते. या दूषित गोष्टी पचनसंस्थेवर परिणाम करतात आणि उलट्या, जुलाब, पोटदुखी यासारख्या समस्या निर्माण करतात. उन्हाळ्यात जास्त तापमानामुळे अन्न लवकर खराब होते. म्हणूनच या ऋतूत अन्नातून विषबाधा होण्याचे प्रमाण झपाट्याने वाढते.

**अन्न विषबाधेची सामान्य लक्षणे**

दूषित अन्न पोटात गेल्यानंतर दोन ते सहा तासांमध्ये अन्न विषबाधेची लक्षणे दिसू लागतात. जसे की, पोटदुखी किंवा पेटके, उलट्या होणे हा त्रास जाणवतो. अतिसार, मळमळ, ताप, थकवा आणि अशक्तपणा यासारखी लक्षणे दिसतात. शरीरात पाण्याची कमतरता भासते. रुग्णाला तीव्र डोकेदुखीचा सामना करावा लागतो. ही लक्षणे २४ तासांपेक्षा जास्त काळ टिकून राहिली किंवा खूप गंभीर झाली तर ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधणे गरजेचे असते. उदाहरणार्थ, शरीरातून जास्त घाम येत असेल, चक्कर येत असेल आणि व्यक्तीला खूप थकवा जाणवत असेल तर ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधावा. विशेषत: मुले, गर्भवती महिला आणि वृद्धांना तातडीने उपचार मिळणे गरजेचे असते. बऱ्याचदा रेफ्रिजरेटरमध्ये अन्न व्यवस्थित साठवले न गेल्यामुळे ते लवकर खराब होते. तसेच अन्नामध्ये साल्मोनेला, ई.कोलाई किंवा नोरोव्हायरस यासारख्या हानिकारक जीवाणूंचा संसर्ग झाला तर पोट खराब होण्याची शक्यता अनेक पटींनी वाढते. म्हणूनच विषबाधा टाळण्यासाठी उन्हाळ्यात फ्रिजमधील अन्न खाऊ नये. अगदीच नाईलाज असल्यास ते पुन्हा गरम केल्यानंतरच खावे. अन्न विषबाधेची लक्षणे सौम्य असतील तर काही घरगुती उपायही कामी येतात. जसे की, ओआरएस किंवा मीठ-साखर द्रावण प्यावे. याने डिहायड्रेशनचे धोके दूर होतात. रुग्णाला लिंबू पाणी आणि नारळ पाणी दिल्यास त्वरित ऊर्जा मिळते. आल्याचा चहा किंवा पुदिन्याचे पाणी पिल्यास उलट्यांचा त्रास कमी होतो.



## काळजी कोरड्या केसांची

हेअर केअर

कुरळे, विस्कटलेले केस सतत गुंततात. अशा केसांची काळजी घेणं खरं तर मोठं आव्हानच. अशा केसांची रचना कशी करायची हा प्रश्नही महिलांना सतावणारा असतो. विशेषत: समारंभांमध्ये असे केस सावरणं जिकीरीचं ठरतं. तेव्हा तुम्हालाही सतत विस्कटणारे केस छान मऊ व्हावेत असं वाटत असेल तर या टिप्स फॉलो करा. अनेकदा शँपूमुळे केस कोरडे होऊन विस्कटतात. त्यामुळे सर्वप्रथम शँपू बदलून बघा. कंडिशनर आणि सीरममुळे केस मुलायम होतात. त्यामुळे केस खूपच कोरडे होत असतील तर कंडिशनर थोडं जास्त लावा. केस धुतल्यानंतर नियमित सीरम लावा. यासोबतच केसांना खोबरेल, बदाम, ऑलिव्ह किंवा जोजोबा ऑईलचं पोषण द्या.



## कृत्रिम पापण्या खरेदी करताय?

मेक अप

लांब आणि दाट पापण्यांमुळे डोळे आकर्षक दिसतात. पण प्रत्येकालाच अशा पापण्यांचं नैसर्गिक वरदान लाभलेलं नसतं. मग बाजारातल्या कृत्रिम पापण्या लावाव्या लागतात. मात्र या पापण्या खरेदी करताना काही गोष्टींची काळजी घ्यायला हवी. तुमच्या पापण्या कृत्रिम वाटता कामा नयेत. त्या अतिशय वाईट दिसतात आणि तुम्हीही आत्मविश्वास हरवून बसता. त्यामुळे नैसर्गिक लूक देणाऱ्या पापण्यांची निवड करा. छोट्या आकाराच्या पापण्या विकत घ्या. इतकंच नाही तर कधीही नैसर्गिक पापण्यांवर गम लावू नका. कृत्रिम पापण्यांवर गम लावून त्या नैसर्गिक पापण्यांवर चिकटवा.



## फळं ठेवा ताजी

किचन टिप्स

उन्हाळ्यात फळे खाण्यावर भर दिला जातो. थंडगार आणि रसदार फळांचे सेवन आनंददायी तसेच आरोग्यदायी असते. मात्र कापलेली फळं फार काळ ठेवता येत नाहीत. त्यामुळेच दुपारी कापून ठेवलेली फळं संध्याकाळी खायची असतील किंवा मुलांना डब्यात द्यायची असतील तर ती काळी पडू नयेत यासाठी काही उपाय करता येतील. कापलेली फळं थंड पाण्यात ठेवल्याने त्यांचा रंग बदलणार नाही. साधारण तीन ते चार तास ही फळं टिकून रहातील. थोडं लिंबू पिळून फळांचा दर्जा टिकवून ठेवता येईल. कापलेली फळं वेगवेगळ्या बाउलमध्ये ठेवा. त्यावर थोडा लिंबाचा रस घाला. फळांचे बाउल फ्रीजमध्ये ठेवा. आता ही फळं सात ते आठ तास चांगली रहातील.



# विधानभवनाच्या विस्तारीत बांधकामासाठी शासकीय मुद्रणालयाचा बळी?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ : प्रस्तावित विधानभवनाच्या विस्तारासाठी शासकीय मुद्रणालयाची जागा घेण्याचे निश्चित झाले असून, अनेक वर्षापासून येथे उभ्या असलेल्या या शासकीय मुद्रणालयाला आता नवी जागा शोधावी लागणार आहे.



दरवर्षी विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात होते. अधिवेशना दरम्यान विधानसभा आणि विधान परिषदेसाठी लागणारे प्रश्नउत्तराचे संच, लक्षवेधी सूचना, त्यावरील मंत्र्यांची निवेदने, नियम ९३ च्या सूचना, त्यावरील सरकारी निवेदने, कामकाज पत्रिका आणि इतरही अधिवेशनासंबधीचे कागदपत्रे छपाईचे काम या सरकारी मुद्रणालायत होते. अधिवेशन काळात मुद्राणलय चोवीस तास सुरू राहते. अत्यंत काळजीपूर्वक ही छपाई केली जाते. उद्योग मंत्रालयाच्या अखत्यारित हे मुद्राणालय येते.

विधानभवनाच्या लागूच त्याची इमारत आहे. विधानभवनाचा विस्तार करण्याचा निर्णय विधानसभा अध्यक्षांनी घेतला आहे. त्यासाठी जागेची गरज आहे. त्यामुळे शासकीय रुग्णालय आणि शहर पुरवठा विभागाच्या कार्यालयाची जागा घेण्याचे निश्चित झाले आहे. त्यामुळे या दोन्ही कार्यालयांना नव्या जागेचा शोध घेण्यास सांगण्यात आले आहे.

शासनाच्या दोन विभागातील वादात अडकलेल्या नागपूर विधान भवन विस्ताराचा तिढा सोडवण्यात पालकमंत्री व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुढाकार घेतला असून शासकीय मुद्रणालय आणि पुरवठा विभागाच्या कार्यालयांना शहरात नवीन जागेचा शोध घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

नागपूर येथील शासकीय मुद्रणालयाच्या तसेच शहर पुरवठा विभागाच्या कार्यालयाची जागा नागपूर विधानभवनाच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक आहे. मात्र जागा देण्यावरून दोन्ही विभागांनी ताठर भूमिका घेतली होती. यासंदर्भात मुंबईत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यात बावनकुळे यांनी पुरवठा विभाग आणि शासकीय मुद्रणालय कार्यालयांना पर्यायी जागा शोधून प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश दिले. विधानभवनाचा विस्तार करताना याच परिसरात असलेले झिरो माईलही विकसित करण्यात येणार असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

बावनकुळे म्हणाले, शासकीय मुद्रणालय आणि पुरवठा विभागाला नवीन जागा उपलब्ध करून देण्यात येईल. त्यांनी पुढील दोन दिवसात जागांचा शोध घेऊन त्याबाबत प्रस्ताव सादर करावा. पुरवठा विभागाला गोदामासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येईल. त्या ठिकाणी बांधकाम करून दिल्यानंतरच संबंधित जागा ताब्यात घेण्यात येईल. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, महसूल उपसचिव अश्विनी यमगर, एमएसआयडीसीचे मुख्य अभियंता रणजीत हांडे, उद्योग विभागाचे सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, एमएसआयडीसीच्या कार्यकारी अभियंता आकांक्षा मेश्राम, एमएसआयडीसीचे व्यवस्थापक ब्रजेश दीक्षित उपस्थित होते. दरम्यान, शासकीय मुद्रणालयाची ही इमारत विधान भवनाच्या विस्तारीकरणासाठी वापरली जाणार असल्याने काही वर्षात इतिहासजमा होणार असल्याचे स्पष्ट आहे.

# माय-लेकासह तिघांचा अपघातात करूण अंत

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ८ :
मोर्शी-अमरावती महामार्गावर सावरखेडनजीक झालेल्या रस्ता अपघातात माय-लेकासह तिघांचा करुण अंत झाला. हायड्रा क्रेन आणि अल्टो कारच्या अपघातात तिघे मृत्यूमुखी पडले.



यातील मृत दोन तरुणांपैकी एकाचा विवाह नुकताच आटोपला होता, तर दुसऱ्याचा उंबरठ्यावर होता. त्याच्या विवाहाचा बस्ता खरेदी करून अमरावतीहून परतताना ही दुर्घटना घडली. या अपघातात त्या तरुणाची आईही हिरावली गेली. निलेश बुधराव गव्हाळे (वय २८), वैभव सुरेश खासदेव (वय २६) आणि आई गीता सुरेश खासदेव (वय ५२) अशी मृतांची नावे आहेत.

हे तिघेही महाराष्ट्राच्या सीमेवरील मध्यप्रदेशच्या बिसनूरचे रहिवासी होते. अपघाताच्या वेळी निलेश कार चालवत होता. त्याचे लग्न गेल्या ३० एप्रिल रोजी पार पडले होते आणि निलेश आगामी २६ मे रोजी विवाहबंधनात अडकणार होता. त्याच्याच लग्नाचा बस्ता खरेदी करण्यासाठी तीन नातेवाईकांसह हे तिघे अमरावतीत आले होते. बस्ता खरेदी करून परतताना सायंकाळी हा अपघात झाला. अपघात एवढा भीषण होता की कार पूर्णतः चक्काचूर झाली होती. ती हायड्रा क्रेनमध्ये जाऊन अडकल्याने कारचालक निलेशच्या डोक्यासह त्याच्या शरीरावर गंभीर जखमा झाल्या. त्यामुळे तो घटनास्थळीच मृत झाला.

दरम्यान, गीता खासदेव यांना रुग्णालयात नेताच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले, तर त्यांचा मुलगा वैभव उपचारादरम्यान मृत्यू पावला. नीताशा सुभाष गव्हाळे (वय २८), मीना यशवंत खोसे (वय ३१) आणि दिलीप केशवराव कडोकार (वय ५०) जखमी असून त्यांच्यावर अमरावती येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती शिरखेड पोलीस स्टेशनला मिळताच तेथील ठाणेदार सचिन लुले यांनी आपल्या टीमसह घटनास्थळी धाव घेऊन कारवाई केली. अल्टो कारमध्ये असलेले सहाही जण पूर्णतः दबले होते. कारचा पत्रा कापून त्यांना बाहेर काढावे लागले. घटनेनंतर हायड्रा क्रेनचा चालक घटनास्थळाहून पसार झाल्याची माहिती काहींनी दिली.

## सोमनाथ सूर्यवंशी कोठडीत मृत्यू प्रकरण
# विजया सूर्यवंशीच्या याचिकेवर ९ जून रोजी सुनावणी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ : परभणी येथील दंगलीच्या घटनेनंतर मृत्यूमुखी पडलेले सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मातोश्री विजया सूर्यवंशी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या याचिकेला पुढची तारीख देण्यात आली आहे.

या प्रकरणात आता पुढची सुनावणी ९ जून रोजी होणार आहे. या प्रकरणात आज न्यायालयात तिसरी सुनावणी होती. या प्रकरणात वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर याचिकाकर्त्यांची बाजू मांडत आहेत.

परभणी हिंसाचार प्रकरणात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या सोमनाथ सूर्यवंशीचा न्यायालयीन कोठडी मृत्यू झाला होता. सुरुवातीला हा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगण्यात आले होते. परंतु, सोमनाथ मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे शवविच्छेदन अहवालातून समोर आले होते.

आता सोमनाथ सूर्यवंशींच्या मृत्यू प्रकरणाचा तपास सीआयडी कडे वर्ग करण्यात आला आहे. सोमनाथ सूर्यवंशींच्या कुटुंबीयांनी न्यायाची मागणी केली असून उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सोमनाथ सूर्यवंशी याचा १६ डिसेंबर २०२४ रोजी न्यायालयीन कोठडीत असताना मृत्यू झाला होता. त्याच्या शवविच्छेदन अहवालात मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे समोर आले होते. तसेच सोमनाथचा मृत्यू मारहाणीत झाल्याचे न्यायदंडाधिकाऱ्यांच्या अहवालात म्हटले आहे.

# प्रीती बंड अखेर शिंदे गटात

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ८ : ठाकरे गटाच्या माजी नेत्या आणि अमरावतीच्या राजकारणातील प्रमुख चेहरा प्रीती बंड यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश केला. आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह त्यांनी हा पक्षप्रवेश केला, ज्यामुळे पश्चिम विदर्भातील शिंदे गटाची ताकद वाढली आहे. ठाकरे गटासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

प्रीती बंड या दिवंगत माजी आमदार संजय बंड यांच्या पत्नी आहेत. त्यांनी २०१४ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटाकडून रवी राणा यांच्याविरोधात निवडणूक लढवली होती, परंतु त्यांना पराभव पत्करावा लागला. नुकत्याच झालेल्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटाने त्यांना तिकीट नाकारले. यामुळे नाराज होऊन त्यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली, परंतु पक्षाने त्यांना निलंबित केले. आता, शिंदे गटात प्रवेश करत त्यांनी नव्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली आहे.

# लढण्याची संधी द्या..
## कारगिल योद्धा संदेश सिंगलकर यांचे हवाई दल प्रमुखांना पत्र

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :
पाकिस्तानविरोधात संभाव्य लढ्यात मला सहभागी होऊ द्या, असे भावनिक पत्र निवृत्त सार्जेंट संदेश सिंगलकर यांनी थेट हवाई दल प्रमुखांना पत्र पाठवले आहे. देशावर संकट असताना आपण घरी बसून राहणं माझ्या मनाला पटत नाही असेही त्यांनी म्हटले आहे.



दरम्यान सिंगलकर यांनी भारतीय हवाई दलात १६ वर्ष सेवा बजावली असून, ते मिसाईल तंत्रज्ञानाचे प्रशिक्षित तज्ज्ञ आहेत. त्यांनी कारगिल युद्धातही सहभाग घेतला होता. मात्र, देश पुन्हा एका युद्धाच्या उंबरठ्यावर उभा असल्याची जाणीव होताच त्यांनी सेवा पुन्हा सुरू करण्याची तयारी दर्शवली आहे.

संदेश सिंगलकर म्हणाले की, नियमानुसार मला सेवेत पुन्हा घेता येणार नाही. पण मी भावनिक मुद्द्यावर वायुदलाच्या प्रमुखांना पत्र लिहले आहे की मला या युद्धात सहभागी व्हायचे आहे. रशियन बनावटीच्या इग्ला मिसाईल तंत्रात मी निष्णात असून माझी गरज भासल्यास मला पुन्हा सेवेची संधी द्या, मी हाय अल्टीट्युड रणक्षेत्रात लढण्यास तरबेज असून पाकिस्तान सोबत लढण्यास तयार आहे. २००४ मध्ये कौटुंबिक कारणांमुळे मी स्वेच्छानिवृत्ती घेतली. मला देशासाठी काहीतरी करायचे आहे ही भावना जवानांमध्ये कायमस्वरुपी असते. आम्ही निवृत्त झालो असलो तरी आजही आमच्या मनामध्ये डिफेन्सबद्दल तेवढंच प्रेम आहे. आता देशावर संकट असताना आपण घरी बसून राहणं माझ्या मनाला पटत नाही, म्हणून हवाईदलाचे आमचे चीफ यांना पत्र पाठवत काही स्कोप असेल तर मी पुन्हा देशाची सेवा करण्यासाठी तयार असल्याचेहवाई दलातील निवृत्त सार्जेंट संदेश सिंगलकर यांनी म्हटले आहे.

# डंपरची एसटीला धडक
# ४ ठार, २० जखमी



■ वृत्तसंस्था, रायगड, दि. ८ : रायगड जिल्ह्यातील तारणे येथील वळणावर भीषण अपघात झाला. डंपर आणि एसटीबसची जोरदार धडक झाली असून या अपघातात ४ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर २० प्रवासी जखमी झाले आहेत. गुरुवार ८ मे रोजी दुपारी ही घटना घडली. या अपघातात बसची एक बाजू अक्षरशः चिरली गेली.

रहाटाड येथून तळाकडे बस येत होती. तर डंपर तळाकडून मांदाडकडे जात होता. भरधाव वेगाने आलेल्या डंपरने तारणे येथील तीव्र वळणावर एसटीला जोरदार धडक झाली. अपघात एवढा भयानक होता की, एसटी बसचा एक बाजूचा पत्रा कापला गेला. अपघातानंतर डंपर पुढे जाऊन कलंडला. पोलिसांनी घटनास्थळ गाठून जखमींना रुग्णालय दाखल करण्यात केले आहे. जखमी मधील अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती वर्तवण्यात आली आहे.

या अपघातात तृप्ती विजय खुटीकर, (वय २२), लक्ष्मण राया ढेबे (३८), अनन्या कपेश गमरे (७), विठ्ठल धोंडु कजबते (५५) या चौघांचा मृत्यू झाला. या अपघातात २९प्रवासी जखमी असून, अनेक गंभीर आहेत. जखमींना तळा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

: सिनेरंग :

# 'मंगलाष्टका रिटर्न्स' मधून उलगडणार सुलट प्रेमाची उलट गोष्ट!




प्रेमकथा हा चित्रपटसृष्टीचा सर्वाधिक आवडता विषय... त्यामुळे अनेक प्रेमकहाण्या आजवर पडद्यावर आल्या आहेत. मात्र, सुलट प्रेमाची उलट गोष्ट ही अनोखी टॅगलाइन असलेला 'मंगलाष्टका रिटर्न्स' हा नवा चित्रपट २३ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. याआधी घटस्फोट सोहळ्याचे एक अनोखे टीजर पोस्टरही सोशल मीडियावार चांगलेच चर्चेत आले होते. दमदार स्टारकास्ट असलेल्या या चित्रपटाचं पोस्टर सोशल मीडियावर लॉंच करण्यात आलं आहे.


शारदा फिल्म्स प्रोडक्शनच्या वीर कुमार शहा यांनी निर्मिती केलेल्या मंगलाष्टका रिटर्न्स या चित्रपटाचं दिग्दर्शन योगेश पांडुरंग भोसले यांनी केलं आहे. डॉ. भालचंद्र यांनी कथा आणि संवादलेखन, पी. शंकरम यांनी संगीत दिग्दर्शन, विकास सिंह यांनी छायांकन, एस. विक्रमन यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे.

चित्रपटात वृषभ शाह, शीतल अहिरराव ही नवी जोडी पाहायला मिळणार आहे. त्यांच्यासह प्रसाद ओक, आनंद इंगळे, सक्षम कुलकर्णी, सोनल पवार, कमलेश सावंत, सुनील गोडबोले, प्रसन्न केतकर, प्राजक्ता नवले, भक्ती चव्हाण, शीतल ओसवाल, श्वेता खरात, समीर पौलस्ते यांच्याही भूमिका आहेत.

राजकीय विरोधाची पार्श्वभूमी असलेल्या दोन कुटुंबातील तरुण-तरुणी एकाच कॉलेजमध्ये एकत्र येतात. मात्र, त्यानंतर त्यांच्या आयुष्यात काय काय घडामोडी घडत जातात याची रंजक कहाणी मंगलाष्टका रिटर्न्स या चित्रपटात पहायला मिळणार आहे.चित्रपटाच्या पोस्टरचा लुकही अगदी फ्रेश आहे. त्यामुळे ही गोष्ट अनुभवण्यासाठी २३ मेपर्यंत प्रेक्षकांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.

लोकरंजन

■ ■ ■




# आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट चिडिया प्रदर्शनासाठी सज्ज

आजवर आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविलेल्या आगामी चिडिया या हिंदी चित्रपटाचे पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर लॉंच करण्यात आले आहे. की मीडिया वर्क्स, उदाहरणार्थ निर्मित या संस्थेअंतर्गत या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली असून स्मायली फिल्म्स यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. मेहरान अमरोही लिखित आणि दिग्दर्शित, 'चिडिया' ही एक आठवण आहे, मुंबईतील चाळीच्या घरात राहणाऱ्या शानू आणि बुआ या दोन उत्साही भावांची हृदयस्पर्शी गोष्ट आहे. केवळ कल्पनाशक्ती, आशा, त्यांची आई आणि समाजातील लोकांच्या मदतीने ते त्यांच्या परिस्थितीपेक्षा खूप मोठ्या स्वप्नाचा पाठलाग कसा करतात? मुले त्यांची स्वप्ने जिवंत ठेवण्यासाठी ज्या अदृश्य लढाया लढतात त्याची एक रंजक गोष्ट या चित्रपटात दाखविण्यात आली आहे.

जवळजवळ एक दशकापूर्वी पूर्ण झालेला, चिडियाने आधीच जागतिक स्तरावर लोकप्रियता मिळवली आहे, चेक रिपब्लिक (ज्लिन आयएफएफ), द नेदरलँड्स (सिनीकिड), द यूएसए (एसएआयएफएफ), रशिया (स्पिरिट ऑफ फायर आयएफएफ), इराण (मुलांसाठी आणि प्रौढांसाठी आयएफएफ) आणि त्यापलीकडे असलेल्या महोत्सवांमध्ये मने जिंकली आहेत.

■ ■ ■

# व्हेअर द वाइल्ड मेन आर विथ बेन फोगले सोनी बीबीसी अर्थवर

सोनी बीबीसी अर्थ आपल्या व्हेअर द वाइल्ड मेन आर विथ बेन फोगलेच्या नवीन सीझनसह प्रेरणादायक प्रवास करण्यासाठी प्रेक्षकांना आमंत्रित करत आहे. या सीझनच्या १२ वेधक एपिसोड्समध्ये बेन फोगले जगातील अत्यंत निर्जन ठिकाणी जातो आणि अशा ठिकाणी स्वखुशीने रहात असलेल्या काही विलक्षण लोकांच्या जीवनाची एक झलक प्रेक्षकांना देतो.

व्हेअर द वाइल्ड मेन आर विथ बेन फोगलेचा दहावा सीझन प्रेक्षकांना नक्कीच विलक्षण कहाण्यांमध्ये गुंतवून ठेवेल. या शो मध्ये बेन फोगल काही काळजीपूर्वक निवडलेल्या निर्जन स्थानांचा प्रवास करतो, जेथे तो अशा लोकांसोबत राहतो, ज्यांनी जाणूनबुजून समाजापासून दूर राहणे पसंत केले आहे. बेन फोगल प्रेक्षकांना व्हिज्युअल मोहिमेवर आपल्यासोबत घेऊन जातो, ऑस्ट्रेलियातील सुदूर लँडस्केपचा शोध घेतो, कॅलिफोर्नियाच्या खडतर पर्वतीय प्रदेशात कोणत्याही सुविधांशिवाय राहणाऱ्या आणि एका तरंगत्या स्ट्रक्चरवर ओरेगोनियन आयुष्य जगणाऱ्या एका कुटुंबाशी आपली गाठ घालून देतो. या प्रवासात टस्कनी येथे राहणाऱ्या, पर्यावरणाशी निष्ठावान अशा एका ब्रिटिश जोडप्याशी आपला परिचय होतो, तसेच झांबिया येथे सफारी व्यवसाय चालवणाऱ्या एका कुटुंबाचे आकर्षक जीवन देखील आपल्याला जवळून बघता येते. म्हणूनच बघायला विसरू नका, व्हेअर द वाइल्ड मेन आर विथ बेन फोगलेच्या दहाव्या सीझनचा प्रीमियर सोमवारी रात्री ९:०० वाजता फक्त सोनी बीबीसी अर्थवर! ■ ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# अंगाला लागलेल्या हळदीसह नवरदेव जवान सीमेवर हजर

■ वृत्तसंस्था, जळगाव, दि. ८ : गत सोमवारी लग्न झालेल्या एका जवानाला बॉर्डरवरून फोन आल्यानंतर अंगाला लागलेल्या हळदीसह पाकिस्तान विरोधात मोर्चा उघडण्यासाठी सीमेवर जावे लागण्याची वेळ आल्याची घटना जळगाव येथे घडली आहे. यावेळी नववधूने ऑपरेशन सिंदूरसाठी आपले कुंकू पाठवत असल्याची भावुक प्रतिक्रिया व्यक्त केली.

## नवरी म्हणाली.... माझे कुंकू पाठवते



जळगावच्या पाचोरा तालुक्यातील खेडगाव येथील लष्करी जवान मनोज पाटील यांचे नाचणखेडे येथील रामचंद्र पाटील यांची कन्या यामिनी हिच्याशी लग्न ठरले होते. या लग्नासाठी ते सुटी घेऊन गावी आले होते. त्यांचे गत ५ तारखेला लग्न झाले. पाचोरा येथे हा लग्नसोहळा पार पडला. पण हा लग्न समारंभ आटोपत नाही, तोच मनोज यांना कर्तव्याच्या ठिकाणी तत्काळ हजर होण्याचे आदेश आले.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने मंगळवारी मध्यरात्री ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकवर हवाई हल्ले केले. यामुळे दोन्ही देशांत युद्धसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर पाककडून होणाऱ्या संभाव्य हल्ल्याच्या भितीमुळे लष्कराने आपल्या सर्वच जवानांच्या सुट्या तत्काळ प्रभावाने रद्द केल्या आहेत. त्यानुसार लग्नासाठी गावी आलेल्या मनोज पाटील यांनाही तत्काळ आपल्या कर्तव्याच्या ठिकाणी हजर होण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार, ५ तारखेला लग्न झालेले मनोज पाटील दोन दिवसांतच कर्तव्यावर रवाना झाले.

कुटुंबासोबत लग्नाचा आनंद साजरा होत असताना देशसेवेसाठी कर्तव्यावर जावे लागल्याचा मनोज यांना अभिमान आहे. आपल्यासाठी देशापेक्षा दुसरे काहीही मोठे नाही, अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे. मनोज यांच्या पत्नी यामिनी म्हणाल्या, ओल्या हळदीसह व हातावर रंगलेल्या मेहंदीसह ते आता आघाडीवर आपला मोर्चा सांभाळत आहेत. ऑपरेशन सिंदूरसाठी मी माझे कुंकू पाठवत असल्याची भावुक प्रतिक्रिया तिने दिली.

# यंदा मान्सून एक आठवडा लवकर



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :
यंदाचा मान्सून नियोजित वेळेपेक्षा जवळपास आठवडाभर आधी महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. येत्या १३ मे रोजी अंदमान-निकोबारमध्ये मान्सून पोहोचेल, असा अंदाज असून, त्यानंतर केरळमध्ये मेच्या शेवटच्या आठवड्यात आणि महाराष्ट्रातही जूनच्या सुरुवातीला मान्सूनचे आगमन होण्याची शक्यता आहे. यंदा मान्सून १०५ टक्के म्हणजेच सामान्यपेक्षा जास्त असण्याचा अंदाजही देण्यात आला आहे.

तज्ज्ञांच्या मते, यावर्षी देशात ५० पेक्षा अधिक दिवस उष्णतेची लाट जाणवली. त्यामुळे हिंदी महासागर व बंगालच्या उपसागरातील पाणी तापले असून, बाष्पीभवनाचा वेग वाढला आहे.

परिणामी, बाष्पयुक्त ढगांची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाल्याने मान्सून लवकर येण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. उन्हाळ्याच्या कडाक्यातही राज्यात काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. यामुळे तापमानाचा पारा खाली आल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, मान्सून लवकर येणार असल्याने शेतकरी वर्गानेही समाधान व्यक्त केले आहे.

## किरायाने देणे

नागपूर मध्ये गिरीपेठ येथे आर टी ऑफिस जवळ पहिल्या मजल्या वर 1 बी एच के ब्लॉक भाड्याने देणे आहे.

भाडे - 13000/-

संपर्क : ढोक - 8275044857